ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास.

लेखक

रा. भा. ठोसर, एम्. ए.

ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास.

लेखक व प्रकाशक

रा. भा. ठोसर, एम्.ए.

शिक्षक, ट्रे. कॉ. फॉ. वु. पुणें.

आवृत्ति १ ली.

१९२८.

किंमत ८ आणे.

मुद्रक—दत्तात्रय गणेश खांडेकर, 'लॉ प्रिंटिंग प्रेस,'
५३० शनवार पेठ, पुणें.

प्रकाशक—रा. भा. ठोसर, शिक्षक ट्रे. कॉ. फॉ. बु.
पुणें.

ग्रंथकर्त्याचे चार शब्द.

ब्रिटिश साम्राज्यासंबंधीं माहिती मिस्. नवलकर यांच्या प्रोत्साहनानें कन्याशिक्षक मासिकांत क्रमशः प्रसिद्ध करण्यांत आली होती. पण आज ते अंक सर्वांना मिळण्यासारखे नसल्यामुळें, ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत असे; ती अल्पांशानें दूर करण्याच्या उद्देशानें, तोच भाग पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला आहे. या पुस्तकांत टयूडर घराण्याच्या वेळेपासून पुढें साम्राज्य-विस्तार कां व कसा होत गेला, हें दिग्दर्शित केलें आहे. यांत साम्राज्यांतील ठळक घटकांचीच हकीगत देऊन, बाकीच्या लहान वसाहतींसंबंधीं शेवटीं एक भाग जोडला आहे. शिवाय, साम्राज्यपारिषद व राष्ट्रसंघ यांचीहि थोडक्यांत रूपरेषा दिली आहे. पुस्तकाचे शेवटीं साम्राज्याचे भाग दाखविणारा एक नकाशा जोडला असून, आतांपर्यंत प्रश्नपत्रिकांत वेळोवेळीं आलेल्या प्रश्नांपैकीं, ठळक प्रश्न दिले आहेत. त्याचा आवृत्तीचे वेळीं विद्यार्थ्यांना उपयोग होईल.

हें पुस्तक छापण्याचें काम, लॉ प्रिंटिंग प्रेसचे मालक, रा० रा० दत्तात्रय गणेश खांडेकर, यांनीं अत्यंत अल्पावधींत पार पाडलें, याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. याशिवाय, ज्या माझ्या मित्रमंडळींनीं हें पुस्तक छापण्यास प्रोत्साहन दिलें व मदत केली, त्यांचाहि मी फार आभारी आहें.

ता० १ डिसेंबर, १९२८
५१० शनवार पेठ, पुणें.

रा. भा. ठोसर, एम्. ए.

अनुक्रमणिका.

ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास

ब्रिटिश साम्राज्य

' **साम्राज्य** ' हा शब्द उच्चारला कीं, जित व जेते, श्रेष्ठ व कनिष्ठ हा भाव मनांत उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीं. एका देशानें जगांतील अनेक देशांवर प्रभुत्व स्थापन करण्यानें साम्राज्यें बनत असतात, ही जरी गोष्ट खरी आहे, तरी त्या नियमास ब्रिटिश साम्राज्य कांहीं बाबतींत अपवाद आहे असें दिसून येईल.

प्राचीन काळीं ग्रीस, रोम, इराण, बॅबिलोनिया, खाल्डिया, इजिप्त वगैरे देशांनीं साम्राज्यें स्थापन केलीं; पण त्यांनीं तीं साम्राज्यें तरवारीच्या जोरावर टिकविलीं होतीं. त्या जित लोकांच्या मनांत राज्यकर्त्यांबद्दल आदर वाटत असेल असें वाटत नाहीं. न्याय-अन्याय न पाहतां आपला अनावर अधिकार व धनतृष्णा शमन करण्याकरतांच फक्त हीं राज्यें स्थापन झालीं. पण ब्रिटिश साम्राज्याकडे पाहिलें तर त्यांत केवळ स्वार्थैकदृष्टि नाहीं. अमेरिकन वसाहतींच्या बाबतींत स्वार्थपरता दाखविली गेली. पण तिचे अनिष्ट परिणाम दिसूं लागल्याबरोबर इंग्लंड सावध झालें व त्यानें उदारपणाचें धोरण स्वीकारलें. नंतर जे देश इंग्लंडनें जिंकले अगर वसविले त्या देशांपैकीं पुष्कळांना इंग्लंडनें स्वायत्त राज्य-व्यवस्थेचें हक्कदान केलें आहे व बरेचसे इतर देशहि त्याच मार्गाचें आक्रमण करीत आहेत. हिंदुस्तान देशाची स्वराज्याची मागणी इंग्लंडला पटली असून त्या मार्गावरील दोन हप्ते आज पदरांत पडले आहेत. सारांश, सनदशीर चळवळ करून व आपल्या योग्यतेची जाणीव करून देऊन पुढील हप्ते मिळविण्याची संधी हिंदुस्तानास

ठेविली आहे. सीलोनसारख्या लहान देशासहि आज ' द्विदल पद्धति ' दिली आहे. यावरून एक गोष्ट निदर्शनास येते ती ही कीं, हें साम्राज्य पूर्वींच्या साम्राज्यांहून थोडें निराळ्या धोरणावर स्थापन झालें आहे.

आजपर्यंत वर सांगितलेलीं जीं साम्राज्यें अस्तित्वांत आलीं त्यांपैकीं आशियांत चंगीझखानाचें मोंगल साम्राज्य व युरोपांत रोमन साम्राज्य हीं फार मोठीं होतीं. मोंगल साम्राज्यांतील प्रदेश ५,०००मैल लांब व ३,००० मैल रुंद पसरला होता. चंगीझखानाला आणखी आयुष्य लाधलें असतें तर त्यानें सर्व आशिया व युरोप पादाक्रांत केलें असतें असें वाटतें. रोमन साम्राज्याची ३,००० मैल लांबी व २,००० मैल रुंदी होती. या मानानें आजचें ब्रिटिश साम्राज्य फारच मोठें आहे. त्यानें पृथ्वीचा चौथा भाग व्यापला आहे व लोकसंख्या जगांतील लोकसंख्येच्या चवथा हिस्सा आहे. अशा प्रकारचें राज्य झालें नाहीं व होईल असें वाटत नाहीं. परंतु कालाच्या उदरांत काय सांठविलें आहे हें मनुष्य प्राण्यास कसें समजूं शकणार !

हिंदुस्तानांत अशोक, समुद्रगुप्त यांनीं स्थापिलेलीं साम्राज्यें हीं वरील साम्राज्यांहून एका बाबतींत भिन्न आहेत. निरनिराळे राजे जिंकून त्यांनीं मांडलिकत्व कबूल केलें म्हणजे त्यांना स्वतःच्या प्रांतांत पूर्ण स्वतंत्रतेनें राज्य चालवितां येई. हे सार्वभौम राजे गादीवर आहेत तोंपर्यंत मांडलिक राजांना गडबड करतां येत नसे; पण मुख्य राजा जाऊन गादीवर दुर्बल राजे आले म्हणजे त्या संधीचा ते फायदा घेत व पुनः स्वतंत्र होत किंवा उत्तम संधि असल्यास त्याचीच गादी बळकावून बसत.

ब्रिटिश साम्राज्य पृथ्वीच्या पूर्व–पश्चिम या दोनहि गोलार्धांत पसरलें असल्यानें कोठें ना कोठें तरी त्यावर नेहमीं प्रकाश असतोच. त्यामुळें **'या साम्राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं '** असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. ' **विविधता** ' हा या साम्राज्याचा विशेष आहे. उत्तर ध्रुवापासून

दक्षिण ध्रुवापर्यंत आढळणारें हवामान, शून्यापासून ६०० इंचांपर्यंत पावसाचें मान असणारे देश, पृथ्वीच्या सर्व भागांत होणारीं निरनिराळीं पिकें व खनिज संपत्ति व व्यापारोपयोगी विविध जातीचे प्राणी व अनेक जातीचे लोक, निरनिराळ्या प्रकारच्या राज्यपद्धति वगैरे गोष्टी ब्रिटिश साम्राज्याप्रमाणें इतर क्वचितच आढळतील.

या साम्राज्यांत हिमालयासारखा अत्युच्च पर्वत, 'व्हिक्टोरिया' सारखा आफ्रिकेंतील प्रचंड धबधबा, ४,००० मैल लांबीची नाईल नदी, सुवेझसारखा ९० मैल लांबीचा कालवा, लॉरेन्स नदीवरील २। मैल लांबीचा क्वेबेकजवळचा पूल, वर्षांतून ३—३॥ कोट टन मालाची उलथापालथ करणारें व पाऊण कोट वस्तीचें लंडनसारखें मोठें व गजबजलेलें बंदर व शहर, ३० लक्ष चौरस मैल क्षेत्रफळ असलेलें आस्ट्रेलियासारखें प्रचंड बेट व ३० कोटी लोकवस्तीचें हिंदुस्तान, या गोष्टी साम्राज्याचा एक प्रकारचा मोठेपणा दाखवितात. पण खरा मोठेपणा केव्हांहि त्या राष्ट्रांतील सद्‌गुणांवरच अवलंबून राहणार व या सद्‌गुणांच्या जोरावरच इंग्लंडसारख्या चिमुकल्या देशाला एवढी साम्राज्याची प्रचंड इमारत उठवितां येऊन तिचें रक्षण करतां येत आहे. या राष्ट्राच्या अंगीं जे महत्वाचे गुण आहेत त्यांत राष्ट्रीय भावना, दर्यावर्दीपणा, एकी, धाडस, व्यवहारपटुत्व, शौर्य व मुत्सद्दीपणा हे प्रमुख होत.

हें साम्राज्य इंग्लंडनें अवघ्या ५०० वर्षांत स्थापन केलें. या साम्राज्यांत निरनिराळ्या खंडांतील भाग खालीं दिल्याप्रमाणें आहेत. ब्रिटिश साम्राज्य प्रत्येक खंडांत पसरलें आहे.

युरोपखंडांत—ब्रिटिश बेटें, आइल ऑफ मॅन, चॅनल आयलंडस् व भूमध्य समुद्रांतील आरमारी नाक्यांचीं जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस हीं ठिकाणें एवढे भाग येतात.

अमेरिकेंत—कानडाचें राज्य, न्यू फाउंडलंड व लॅब्रडोर, ब्रिटिश गायेना, हॉंडयूरस, फॉकलंड बेटें, व बर्म्यूडा, बाहामा, जमेका, बारबेडॉज वगैरे वेस्ट इंडिज बेटें यांचा समावेश होतो.

आस्ट्रेलेशियापैकीं— ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिजी व इतर लहान लहान बेटें व न्यूगिनी हे भाग आहेत.

आफ्रिकेंत—दक्षिण आफ्रिकन संघाशिवाय ऱ्होडेशिया, मध्य आफ्रिका, ब्रिटिश पूर्व व पश्चिम आफ्रिका, इजिप्त व सुदान, सोमाली लँड हे प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत आहेत. यांशिवाय आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळचीं सेंट हेलीना व मॉरिशससारखीं नाक्याचीं कांहीं ठिकाणें आहेत.

आशियांत—मुख्यतः हिंदुस्तानाशिवाय सीलोन, स्ट्रेट सेटलमेंटस्, मलाया संस्थानें, लॅबुअन, उत्तर बोर्निओ, साराबाक, हाँगकाँग, शांघाय व एडन हीं ठिकाणें असून राष्ट्रसंघाच्या आज्ञापत्रानें मिळालेले मेसापोटेमिया व पॅलेस्टाइन वगैरे प्रांत येतात.

यांशिवाय इराण, अरबस्तानसारख्या कांहीं देशांवर इंग्लिशांचें वर्चस्व आहे.

अशा या ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार अवघ्या ५०० वर्षांत झाला असून एवढें मोठें साम्राज्य जगावर आजपर्यंत स्थापन झालें नाहीं. अशा साम्राज्याचा इतिहास बोधप्रद झाल्यावांचून खास राहणार नाहीं. तेव्हां ज्या देशानें एवढें वैभव संपादन केलें त्या देशाच्या राज्यव्यवस्थेची थोडीशी माहिती मिळवून मग त्यानें मिळविलेल्या अफाट साम्राज्याच्या इतिहासाकडे वळूं.

इंग्लंड

'इंग्लंड' हा देश यूरोपखंडाच्या वायव्येस आहे. इंग्लंड व स्कॉटलंड मिळून 'ग्रेटब्रिटन' म्हणतात; व इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड यांच्या समूहास 'ब्रिटिश बेटें' म्हणतात. हीं बेटें यूरोपच्या मुख्य जमिनीच्या भागापासून अगदीं तुटक आहेत, त्यामुळें स्वतःचें रक्षण करण्यास यांस आरमाराची फार जरुरी आहे. म्हणून इंग्लंडनें आपलें आरमार जगांतील कोणत्याहि दोन देशांच्या आरमारांच्या दुप्पट मोठें ठेवलें आहे. आजपर्यंत स्थापन झालेल्या साम्राज्यां-पेक्षां इंग्लंडचें साम्राज्य जास्त मोठें असण्याचें मुख्य कारण त्याचें प्रचंड आरमार हें होय.

या देशाचा इतिहास पाहिला तर आपणांस असें दिसून येईल कीं, अगदीं अलीकडच्या काळापर्यंत या देशांत अनियंत्रित राजसत्तेचा अंमल होता; पण हे राजे फार पूर्वींपासून आपणांस सल्लामसलत देण्यासाठीं देशांतील शहाण्या लोकांचा सल्ला घेत असत. या शिष्टमंडळास 'वुइटेनजेमॉट' अथवा 'शहाण्यांची' सभा असें म्हणत. या सभेमार्फत राजाला लोकांकडून खर्चासाठीं पैसा वसूल करितां येत असे. अशा वेळीं पैशाच्या मोबदला लोक राजापासून विशेष हक्क मिळवीत. देशावर बाहेरून परचक्र येणार असल्यास जहाजें तयार करण्यासाठीं राजा किनाऱ्यालगतच्या प्रांतांवर कर बसवी व त्याला या भागांतील लोकांना मोबदल्यादाखल कांहीं व्यापारी सवलती द्याव्या लागत. लंडन, ब्रिस्टल वगैरे शहरांनीं या बाबतींत आपला फायदा करून घेतला होता.

सारांश, राजाच्या हातून सत्ता जाऊन ती क्रमाक्रमानें लोकांच्या हातीं येण्यास राजाला लागणारी पैशाची जरुरी हें मुख्य कारण असे. प्रथमतः कांहीं शहरांना व बंदरांना जरी थोडे फार हक्क मिळाले होते, तरी पहिल्या जॉन राजाच्या कारकीर्दींत सरदारांनीं राजापासून मिळविलेली

' मॅग्नाचार्टा ' नांवाची सनद ही फार महत्वाची आहे. या सनदेनें लोकांच्या हक्कांचा पाया घातला. हिंदुस्तानांत १८५८ सालीं प्रसिद्ध झालेल्या राणीच्या जाहीरनाम्यासहि त्यामुळेंच 'हिंदुस्तानचा मॅग्नाचार्टा' म्हणण्याचा प्रघात पडला आहे. यापुढें लोकांनीं राजापासून सत्ता मिळविण्यास सुरुवात केली. ही मिळवितांना त्यांना राजसत्तेशीं चांगलेंच झगडावें लागलें; व १७ व्या शतकाच्या अखेरीस लोकसत्तात्मक पद्धति इंग्लंडांत स्थापन झाली. याच पद्धतीस ' जबाबदार पद्धति ' असेंहि म्हणतात. या पद्धतीनें निवडून आलेल्या प्रतिनिधींत ज्या पक्षाचें प्राबल्य असतें त्यांतून प्रधानमंडळ निवडतात व तें प्रधानमंडळ पार्लमेंटास म्हणजेच लोकांस जबाबदार असतें. लोकांच्या हिताविरुद्ध प्रधानमंडळ वागत असेल तर लोक तें प्रधानमंडळ वाटेल तेव्हां कामावरून दूर करूं शकतात. अशा प्रकारची लोकसत्तात्मक पद्धति सुरू असली तरी तेथील लोकांनीं पूर्वापार चालत आलेली ' राजा ' ही संस्था कायम ठेविली आहे. त्यामुळें तेथील राज्यव्यवस्था जरी पूर्ण लोकसत्तात्मक असली, तरी तिला ' मर्यादित राजसत्तात्मक व्यवस्था ' असें नांव आहे.

वस्तुतः राजाच्या हातीं फारच थोडा अधिकार आज शिल्लक राहिला आहे. सर्व अधिकार प्रधानमंडळाकडे असल्यानें ' राजा कोणतीहि वाईट गोष्ट करीत नाहीं ' असें इंग्लंडच्या इतिहासांतील एक प्रमुख सूत्र आहे. राजाच्या हातांत अधिकारच नाहीं, तर तो लोकांचें नुकसान कसें करणार ? सारांश, प्रथम राजा, मग सरदार व नंतर सामान्य लोक या क्रमानें ही सत्ता प्राप्त होत गेली.

वर आपण पाहिलेंच आहे कीं, इंग्लंडांत लोकसत्ता स्थापन झाली तरी त्यांनीं ' राजा ' ही संस्था कायम ठेविली आहे. फ्रेंच लोकांप्रमाणें मूळच्या सर्व गोष्टी नाहींशा करून नवीनच इमारत उभारण्याचा इंग्लंडनें कधींहि अट्टाहास धरिला नाहीं; पण मूळच्या गोष्टी कायम ठेवून त्यांत

जरूर ती छाटाछाट केली व नवीन सुधारणांचें कलम बांधलें. मूळ कायम ठेवून वर छाटाछाट केल्यानें झाडाची जोरानें वाढ होते, असा अनुभव आहे. त्या नियमास अनुसरून इंग्लंडनें क्रांतिकारक फेरफार केव्हांच केले नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

या राज्यव्यवस्थेचें खालीं दिल्याप्रमाणें स्थूल स्वरूप आहे:—

१. राजा

२. सरदारमंडळ—हाउस ऑफ लॉर्डस्

३. लोकसभा—हाउस् ऑफ कॉमन्स

४. प्रधानमंडळ—कॅबिनेट

५. वर्तमानपत्रें.

यांतील प्रत्येक भागाचें काय महत्व आहे यासंबंधीं विचार करूं.

राजा:—एके वेळीं राजाच्या हातांत सर्व सत्ता एकवटलेली होती व तो म्हणेल तो कायदा मानला जाई. पूर्वेकडील देशांत तर राजाला विष्णूचा अंशच मानतात. इंग्लंडांत राजाच्या हातून एकेक अधिकार जातां जातां आतां दिखाऊ सत्ता राहिली आहे. त्या अधिकारांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत. प्रत्येक कायदा पास होण्यास राजाची सही असावी लागते. पार्लमेंट सभा बरखास्त करणें व नवीन पार्लमेंटच्या निवडणुकीचे हुकूम काढणें हें राजाचें काम आहे. तसेंच पार्लमेंट निवडून आलें म्हणजे त्यांतील पुढाऱ्यास प्रधान नेमून आपलें मंडळ निवडण्यास राजाकडून हुकूम मिळतो. एखाद्या अपराध्यास फांशीची शिक्षा झाली असल्यास ती रद्द करण्याचा राजाला अधिकार आहे. राजा म्हणजे राजसत्ता व्यक्त करणारी मूर्ति या दृष्टीनें तिचें जास्त महत्व आहे. लोकसत्तात्मक व्यवस्थेंत लोकांचें लक्ष अनेक व्यक्तींच्या हालचालींकडे असतें व खरी सत्ता कोणाच्या हातांत असते हें दाखवितां येत नाहीं; कारण ती नेहमीं बदलत असते. पण सिंहासनावर

राजा असला म्हणजे ही सत्ता एके ठिकाणीं एकवटलेली दिसते. साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांना राजनिष्ठ ठेवणाऱ्या या दुव्याचा चांगला उपयोग होतो. राजाच्या नांवानें गोष्टी केल्या म्हणजे त्यांस गांभीर्य प्राप्त होतें. या दृष्टीनें राजा ही संस्था ठेवण्यांत इंग्लंडनें शहाणपणा केला आहे ही गोष्ट दिसून येते.

सरदारमंडळ:—देशांतील ही सभाहि फार जुनी आहे. या सभेंत एकंदर ७२८ सभासद असून ड्युक, मार्किस, अर्ल, व्हायकाउंट व बॅरन् या क्रमानें हुद्दे असतात. या मंडळाच्या अध्यक्षास 'लॉर्ड चॅन्सेलर' म्हणतात. हा या प्रधान-मंडळींपैकीं एक सभासद असतो. लोकसभेंतून पास होऊन आलेल्या कायद्यांची चर्चा करणें, स्वतः कायदे पास करणें, लोकसभेनें एकाद्या व्यक्तीवर राजकीय खटला केल्यास न्यायाधीश बनून निकाल देणें, वगैरे गोष्टी या सभेच्या अधिकारांत येतात. नेहमींच्या कामकाजास फारच थोडे सभासद हजर असतात. म्हणून ३ सभासद हजर असले म्हणजे सभा भरली (कोरम झालें) असें समजून, सभेच्या कामास सुरवात करतात. देशांत अनेक प्रकारचीं जबाबदारीचीं कामें पार पाडणारे, धनाढ्य व्यापारी, मोठाले कारखानदार, माजी प्रधान वगैरेसारख्या माणसांना प्रधानाच्या सल्ल्यानें राजा सरदार करतो व मग त्यांना या सभागृहांत बसतां येतें. त्यामुळें ही सभा टाकाऊ व चैनी लोकांचीच असते असें समजतां उपयोगी नाहीं. या सभेंत देशांतील सर्व प्रकारची बुद्धिमत्ता एकवटलेली असते. आजपर्यंत या सभेनें देशाची पुष्कळदां चांगली कामगिरी बजावली आहे. १९११ सालीं या सभेचे बरेच अधिकार कमी करण्यांत आले असले, तरी या सभेची आवश्यकता भासल्यावांचून राहात नाहीं. ही सभा काढून टाकली तरी लोकसभेवर दडपण म्हणून राज्ययंत्रांत दुसरी कांहीं तरी योजना करणें अनिर्वाह्य आहे, असें पुष्कळ विद्वान लोकांचें मत आहे. या सभे-इतकी संख्येनें मोठी अशी दुसऱ्या कोणत्याहि देशांत **दुसरी-सभा** (Second chamber) नाहीं. जर्मनीच्या बुंडस्राथ या सभेंत फक्त ५८,

अमेरिकेच्या सेनेटमध्यें ९०, ऑस्ट्रियाच्या हेरेन हॉस्‌मध्यें २६६ व इटलीच्या सेनेटमध्यें सुमारें ४०० सभासद असतात. हिंदुस्तानच्या कौंसिल ऑफ स्टेट या सभेंत फक्त ६० च सभासद आहेत. सारांश, कोणत्याहि प्रकारची राज्य-व्यवस्था असो, तींत दोन सभांची सर्वांसच सारखी आवश्यकता भासते ही गोष्ट मात्र आज प्रयोगसिद्ध आहे. इतर देशांच्या सभांपेक्षां या सभेचा (इंग्लंड) विशेष म्हटला म्हणजे या सभेंत बसणाऱ्या लोकांचा तो जन्मसिद्ध हक्क आहे.

लोकसभा.

इंग्लंडमधील लोकसभा 'हाउस ऑफ कॉमन्स' ही होय. या सभेंतील सर्व सभासद लोकनियुक्त असतात. इतर कोणत्याहि देशांतलि लोकसभेपेक्षां या सभेंत जास्त सभासद आहेत. त्यांची एकंदर संख्या ६१५ आहे. १९२२ सालापूर्वी ही संख्या ७०७ पर्यंत फुगली होती; पण आयर्लंडला स्वराज्याचे हक्क दिल्यानें तेथील सभासदांची संख्या कमी झाली.

या सभेंत आजपर्यंत सर्व पुरुष सभासद असत; पण १९१८ सालच्या कायद्यानें स्त्रियांना मतदानाचा व पार्लमेंट सभेंत प्रतिनिधी म्हणून बसण्याचा अधिकार मिळाला आहे. स्त्रियांनीं महायुद्धांत जी देशाची काम-गिरी बजावली त्याबद्दल ही त्यांस देणगी मिळाली आहे. या कायद्यानें ३० वर्षें वयाच्या स्त्रियांनाच हा हक्क मिळाला, त्यामुळें सुमारें ६० लक्ष स्त्रिया मतदार बनल्या. अलीकडे २१ वर्षांवरील सर्व लायक स्त्रियांना तो हक्क देण्यासंबंधीं वाटाघाट चालू आहे. ती यशस्वी ठरून कायदा पास झाल्यास इंग्लंडांत एकंदर १,४५,००,००० स्त्री मतदारांची संख्या होईल व त्या मानानें पुरुष मतदार १,२२,५०,००० इतके भरतील.

निवडणुकीपासून पांच वर्षांपेक्षां केव्हांहि तीच पार्लमेंट सभा चालूं नये असा कायदा आहे; पण विशेष कारणानें तीच पार्लमेंट सभा जास्त वर्षें राहिल्याचे इतिहासांत दाखले आहेत.

या सभेंतील कामकाज पक्षपद्धतीवर चालतें. ज्या पक्षाचे जास्त प्रतिनिधी निवडून येतील त्या पक्षाच्या हातीं मुख्य राजसूत्रें जातात. हल्लीं इंग्लंडांत मुख्यत्वेंकरून पुराणमतवादी, उदारमतवादी व मजूर असे तीन पक्ष आहेत. निवडून येणाऱ्या प्रधानमंडळाच्या हातांत देशांतील सर्व सत्ता एकवटलेली असते. त्यांच्या कर्तबगारीवर देशाचें हिताहित अवलंबून असतें. मुख्य प्रधानाची नेमणूक झाल्यावर तो आपणांस अनुकूल अशीं १५ ते २२ पर्यंत माणसें निवडतो व त्यांकडे निरनिराळीं खातीं सोंपवून देतो.

नव्या पार्लमेंटची निवडणूक होऊन प्रथम सभा भरली म्हणजे अध्यक्षाची निवड करणें हें मुख्य काम असतें व प्रबळ पक्षांतील योग्य माणसाची या कामीं निवड होते. अशा रीतीनें निवड झाल्यावर तीस राजा आपली संमति देतो; पण या सभेचा मुख्य कारकून व सार्जंट–अॅट–आर्मस् नांवाचा रखवालदार, याची नेमणूक खुद्द राजाकडून होते.

अध्यक्षास सभेंत शिस्त राखणें, वादविवादाचे वेळीं योग्य दाब ठेवणें व सभेच्या मोठेपणास कोणत्याहि रीतीनें कमीपणा न देऊं देणें, या गोष्टी करावयाच्या असतात. याच्या गैरहजेरींत कधीं कधीं दुसरा माणूस काम करण्यास लागतो, त्यास 'चेअरमन–ऑफ–कमिटीज' असें म्हणतात.

पार्लमेंटचें (लोकसभेचें) काम तीन प्रकारचें असतें:—(१) सार्वजनिक हिताच्या बाबींचा विचार करणें, (२) अधिकाऱ्यांच्या कामावर टीका करून दरारा बसविणें व (३) कायदे बनविणें. त्यांतल्यात्यांत कायदे बनविणें हें पार्लमेंटचें मुख्य काम होय. पक्षपद्धति प्रचारांत आल्यापासून अलीकडे पार्लमेंटांत विचारासाठीं येणारे सर्व कायदे बहुधा प्रधानमंडळाकडूनच मांडले जातात. खासगी सभासदांनीं कायदे आणून ते पास होणें पुष्कळदां फार कठीण असतें.

एकाद्या कायद्याचा मसुदा पार्लमेंटापुढें मांडल्यापासून तो पास होईपर्यंत त्याला प्रत्येक मंडळांत पांच अवस्थांमधून जावें लागतें व त्यानंतर तो

राजाच्या सहीकरितां जातो. ही सही झाली म्हणजे तो कायदा समजला जाऊन कायद्याच्या पुस्तकांत (स्टॅटयूटबुक्) लिहिला जातो.

जो कायदा पास व्हावा असें वाटत असेल त्याचा एक मसुदा तयार करून त्याचें सभेपुढें पाहिलें वाचन होतें. नंतर त्या मसुद्याच्या महत्वाप्रमाणें दुसरें वाचन होण्यापूर्वी बरेच आठवडे जातात. या मध्यंतरीच्या काळांत त्या मसुद्यासंबंधानें वर्तमानपत्रांतून साधकबाधक टीका होते, लोकमत बनतें, व सभासद आपलीं मतें बनवितात. दुसऱ्या खेपेस तें पार्लमेंटांत वाचनासाठीं आलें म्हणजे वादविवाद होतो व त्यांतील मुद्दे गाळण्याबद्दल अगर नवीन कलमें जोडण्याबद्दल सभासदांकडून सूचना होतात. यानंतर त्या मसुद्याची जास्त छाननी करण्यासाठीं पार्लमेंट एक कमिटी नेमते. ही त्या बिलाची (मसुद्याची) तिसरी अवस्था. या कमिटीनें त्या बिलाची तपासणी करून पार्लमेंटला रिपोर्ट सादर करावा लागतो. ही चवथी अवस्था. नंतर पार्लमेंटांत त्या बिलाचें तिसरें वाचन होतें. पुनः वादविवाद व सूचनोपसूचना मांडतात, नंतर दुरुस्त केलेल्या बिलाला अनुकूल व प्रतिकूल असणाऱ्या सभासदांचीं मतें मोजण्यांत येऊन बहुमत अनुकूल असल्यास या सभेंत तो कायदा पास झाला असें समजतात.

नंतर तें पास झालेलें बिल सरदारमंडळाकडे विचारासाठीं जातें. तेथेंहि त्यास याच पांच अवस्थांतून जावें लागतें; व बहुमत अनुकूल असल्यास तें राजाच्या सहीसाठीं रवाना होतें. सही झाली म्हणजे त्यास कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें असें समजतात व तें पार्लमेंटच्या स्टॅटयूटबुकांत नोंदतात.

कॅबिनेट उर्फ प्रधानमंडळ.

लोकसभेची महत्वाचीं सूत्रें ज्या मंडळाच्या ताब्यांत असतात त्यास 'कॅबिनेट' म्हणतात. या सभेचा इतिहास पाहणें झाल्यास आपणांस पूर्वी सांगितलेल्या वुइटनजेमॉट या सभेपर्यंत जावें लागतें. पूर्वी ही सभा लहान

होती, परंतु यांत हळू हळू सभासदांची संख्या वाढविण्यांत आली. पण ती अवजड वाटूं लागून तींतूनच ' ग्रेट कौंसिल ' या नांवाची सभा निर्माण करण्यांत आली. या सभेंतहि अशीच संख्या वाढल्यामुळें निराळी एक लहान सभा बनविण्यांत आली. तिला ' परमनंट कौंसिल ' (कायम सभा) व तींतूनहि वरील कारणानें ' प्रीव्हि कौंसिल ' ही सभा बनून तिचें हल्लींच्या कॅबिनेटमध्यें रूपांतर झालें आहे. या सभेची संख्या ठरलेली असल्यानें आतां ही वाढेल असें दिसत नाहीं. आज खरी सत्ता राजाच्या हातीं नसून ती या मंडळाच्या ताब्यांत आहे.

राज्यव्यवस्थेंत दोन प्रकारच्या संस्था असतात. कांहींना लिखित व कांहींना अलिखित म्हणतात. पहिल्या प्रकारच्या संस्था, त्यांचे हक्क, कामकाजाची पद्धति, यांसंबंधीं कागदोपत्रीं लेखी दाखला ठेवलेला असतो; पण दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे अलिखित संस्थांबद्दल तसा दाखला ठेवलेला नसतो.

कॅबिनेट ही संस्था दुसऱ्या प्रकारची आहे. ती परंपरेनें व वहिवाटीनें लोकांच्या पूर्ण परिचयाची आहे. या सभेच्या हातीं अनियंत्रित अधिकार असून देशाचें हिताहित पाहण्याची तिजवर मोठी जबाबदारी असते. इंग्लंडच्या कारभारांत सूत्रधाराप्रमाणें ही संस्था सर्व प्रकारची व्यवस्था ठेवते.

प्रीव्हि कौंसिलमधून निवडक लोकांचें हें स्वतंत्र मंडळ बनविल्यावर राजाच्या कानाशीं लागणारे अगर चुगलखोर या अर्थानें प्रथमतः लोकांनीं त्यास ' जंटो ' हें नांव दिलें. ही सभा लहानशा खोलींत अथवा कॅबिनेटमध्यें बसत असे, म्हणून हिला पुढें लोक ' कॅबिनेट ' म्हणूं लागले. १६७९ पासून प्रीव्हिकौंसिलच्याऐवजीं राजाला सल्लामसलत देण्याचें काम या मंडळाकडे आलें; पण त्यानंतर बरींच वर्षें या सभेस विशेष महत्व आलें नव्हतें. १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर तिसऱ्या वुइल्यमच्या कारकीर्दींत पार्लमेंटसभेंत वर्चस्व असणाऱ्या पक्षामधून ही सभा निवडूं लागले व अशा पक्षपद्धतीच्या

तत्वावर हिची निवड होऊं लागल्यापासून, हिला क्रमानें महत्व प्राप्त होत चाललें. प्रथमतः एकाच पुढाऱ्याच्या तंत्रानें या सभेंतील सभासद वागत नसत, हा तिच्यांत दोष होता. तो हळू हळू १८ व्या शतकाच्या अखेरीस कमी होत गेला. हल्लींच्या या सभेच्या बाबतींत खालील गोष्टी स्पष्टपणें दिसतातः—

(१) पार्लमेंटमध्यें ज्या पक्षाचे प्रतिनिधि जास्त निवडून येतील त्या पक्षाच्या पुढाऱ्यास बोलावून राजानें मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें द्यावयाचीं.

(२) त्या प्रधानानें आपणांस लागतील तीं माणसें दोनहि सभांतून निवडून त्यांकडे निरनिराळीं खातीं सोंपवावयाचीं.

(३) या सभेंतील सर्व प्रधानांनीं एकमतानें वागून राज्यव्यवस्था चालवावयाची.

(४) राज्यकारभारांत सर्व प्रधानांवर सारखी जबाबदारी असून त्यांचा कारभार लोकांस पसंत नसल्यास सगळ्यांनीं राजीनामे द्यावयाचे.

(५) सर्व प्रधानांनीं मुख्य प्रधानास आपला पुढारी समजून त्याचे हुकूम पाळण्यास तयार असावयाचें.

या सभेंत एकंदर सुमारें२० प्रधान असतात. हल्लीं पार्लमेंटमध्यें उदार, हुंजूर व मजूर हे तीन मुख्य पक्ष आहेत. लोकसभेंत मुख्य अध्यक्षाच्या उच्चासनाचे दोन्ही बाजूस समोरासमोर तोंडें करून सभासदांची बसण्याची व्यवस्था असते. अधिकारीपक्ष अध्यक्षाच्या उजव्या बाजूस व विरुद्ध पक्षाचे लोक डाव्या बाजूच्या कोचांवर बसतात. पार्लमेंटपुढें येणारे बरेच ठराव कॅबिनेटतर्फे मुख्य प्रधानच मांडतो. पण प्रधानमंडळानें पास होण्यासाठीं सभेपुढें मांडलेला एखादा महत्वाचा ठराव नापास झाला, तर आपल्यावरील लोकांचा विश्वास उडाला असें समजून, प्रधान मंडळाला राजीनामे द्यावे लागतात.

अधिकाराच्या दृष्टीनें मुख्य प्रधानाचा दर्जा सर्वांत श्रेष्ठ आहे; पण मानाच्या दृष्टीनें लॉर्ड चॅन्सेलर व यॉर्कचा आर्चबिशप (मुख्य धर्मोपदेशक यांचा दर्जा जास्त समजतात.

वर्तमानपत्रें.

वरील संस्थांशिवाय राज्ययंत्राला चलन देणारी व लोकमत बनविणारी ' वर्तमानपत्रें ' ही संस्था अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येक प्रमुख पक्षाच्या वतीचीं देशांत वर्तमानपत्रें असून तीं आपल्या पक्षाची बाजू शक्य तितकी समर्थन करण्याचें काम करीत असतात व अशा रीतीनें तीं लोकशिक्षणाचें काम करतात, म्हणूनच वर्तमानपत्रांना पुष्कळदां विश्वविद्यालयाची उपमा देतात. या वर्तमानपत्रांच्या द्वारें लोकांना आपण निवडलेले प्रतिनिधी पार्लमेंटांत काय काम करीत आहेत हें समजतें व त्याप्रमाणें पुढील निवडणुकीच्या वेळीं जेव्हां मतें देण्याचा प्रसंग येतो, त्यावेळीं तीं योग्य माणसांनाच देण्याची ते खबरदारी घेतात. पार्लमेंटांतील आपल्या कामगिरीसंबंधानें निवडणुकीच्या हंगामांत वक्ता जेव्हां बोलूं लागतो, त्या वेळीं लोक त्याला अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडतात व त्याला त्यांचें समाधान करतांना पुरेवाट होऊन जाते. त्यामुळें विशेष कामगिरी दाखविल्याशिवाय पुनः सभासद निवडून येण्याची खटपट करण्याचेंहि धैर्य त्याला उरत नाहीं. अशा रीतीनें आपली कामगिरी लोकांपुढें मांडणें व लोकमत बनविणें या गोष्टी वर्तमानपत्रद्वारें करितां येतात व त्यामुळें राज्यव्यवस्था सुरळीत चालते. तसेंच अधिकारावरील माणसास डोळ्यांत तेल घालून काम करावें लागतें. अशा प्रकारें वर्तमानपत्राचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे अनेक फायदे असल्यामुळें ही एक पांचवी राज्यसंस्था आहे असें समजतात.

आतां आपण युरोपांतील देशांना जलपर्यटनें करण्याची आवश्यकता कां उत्पन्न झाली व त्यांचा इंग्लिश साम्राज्याच्या वाढीस कसा उपयोग झाला हें पाहूं.

———

जलपर्यटनें

पूर्व व पश्चिम यांचा फार प्राचीन काळापासून संबंध जडलेला आहे. पूर्वेकडील देशांकडून पश्चिमेकडे सुधारणा होत गेली आहे. ज्यावेळीं पूर्वेकडील देशांनीं अनेक शोध लाविले व अनेक शास्त्रें निर्माण केलीं त्यावेळीं पश्चिमेकडील देश गाढ अज्ञानांधकारांत घोरत होते. हल्लीं त्याच्या उलट स्थिति झाली आहे, 'नीचैर्गच्छत्युपरिचदशा चक्रनेमिक्रमेण' या कालिदासोक्तिप्रमाणें गाडीच्या चाकाचा एकेक भाग क्रमाक्रमानें वरखालीं जात असतो. तशांतलाच हा प्रकार होय.

एके काळीं पूर्वेकडील देशांत शास्त्रकलांचा उदय होऊन ते देश इतर देशांशीं व्यापार करूं लागले. देशांत संपत्ति खेळूं लागली. निरनिराळ्या देशांत हा माल खपून त्यांना पूर्वेकडील देशाची या मालानें ओळख करून दिली; व त्यामुळें पूर्वेकडील देशांत पिकणाऱ्या, विशेषतः मसाल्यांच्या, जिनसांची मागणी वाढत्या प्रमाणावर सुरू झाली. हिंदुस्तानच्या आजूबाजूच्या देशांनीं हा व्यापार सुरू केला. प्रथमतः हा माल अरब व्यापारी घेत व त्यांच्यापासून फिनिशियन, त्यांचेमार्फत व्हेनिशियन या क्रमानें हातोहातीं यूरोपमध्यें तो माल लोकांस मिळे. पण या सर्व व्यापाराची दिशा बदलण्याला पंधराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास एक जबरदस्त कारण झालें. तें तुर्क लोकांची युरोपवर स्वारी हें होय.

पूर्वीं युरोप खंडाबरोबर अरबी समुद्र, तांबडा समुद्र, सुएझची संयोगीभूमि व भूमध्य समुद्र या मार्गानें व्यापार चालत असे; पण १४५३ सालीं पूर्वेकडील रोमन राज्याची राजधानी कॉंस्टॅंटिनोपल ही तुर्क लोकांनीं जिंकून घेतली व आस्ट्रिया–हंगेरीवर चाल केली. ती आस्ट्रिया-हंगेरीची राजधानी तुर्कांनीं सर केली असती तर आज युरोपखंडाचा इतिहास कांहीं निराळाच झाला असता. परंतु त्यांचा तेथें पराभव झाला व हंगेरीपासून दक्षिणचे सर्व

प्रांत तुर्कांच्या ताब्यांत गेले. अशा प्रकारें तुर्क सत्ताधारी झाल्यावर त्या सुएझ संयोगीभूमीच्या मार्गानें चालणारा व्यापार त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला व त्या मार्गानें चालणाऱ्या व्यापारावर जबरदस्त कर वगैरे बसविले. यानंतर स्वतःशिवाय दुसऱ्या कोणाही युरोपियन देशास ते व्यापार करूं देईनात. यामुळें ते विकतील त्या भावानें पाहिजे असल्यास जिन्नस विकत घेणें युरोपियन राष्ट्रांना भाग पडलें. बहुतेक जिन्नस नेहमीं लागणारेच असल्यामुळें अशा प्रकारच्या स्थितींत दिवस कंठणें शक्य राहिलें नाहीं. तेव्हां एक तर तुर्कांशीं लढाई करून हा मार्ग ताब्यांत घेतला पाहिजे हा एक, किंवा पूर्वेकडील देशांना जाण्यास नवीन मार्ग तरी शोधून काढणें हा दुसरा, असे उपाय उरले. यांपैकीं पहिला त्यावेळीं शक्य कोटींतला वाटला नाहीं, म्हणून दुसऱ्या मार्गाकडेच युरोपियन लोकांना आपलें लक्ष वळवावें लागलें.

या १४५३ सालाच्यापूर्वीं व्हेनिस, जिनोआ वगैरे इटालियन लहान लहान नगरराज्यांनीं नौकानयनांत प्राविण्य मिळवून व्यापारावर आपल्या देशांस श्रीमंत केलें, हें पाहून पोर्तुगाल देशाचा राजा चौथा हेनरी याच्या मनांत आपणहि नौकानयनाची कला साध्य करून आपल्या देशास ऊर्जित दशा आणावी असे विचार आले व त्यानें त्या शास्त्राचा अभ्यास करून आपल्या देशांतील बरेच लोक तयार केले. यानंतर त्यानें निरनिराळ्या सफरींच्या योगानें पोर्तुगालच्या दक्षिणेस असणारीं निरनिराळीं बेटें शोधून काढलीं व आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें प्रदेश शोधून काढण्यास सुरवात केली. या प्रदेशाकडे लक्ष पुरविण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे तेथील कच्चा माल व नीग्रो गुलाम हे होत. अरब लोक या गोष्टी युरोपखंडास पुरवून सधन झाले हें त्यानें पाहिलें होतें. हा राजपुत्र फार मेहनती व उद्योगी असून लांब सफरी करून परत येणारीं जहाजें पाहण्याकरितां त्यानें किनाऱ्यावर वेधशाळा बांधिली. तेथून तो ताऱ्यांचे वेध घेणें व जहाजाचें निरीक्षण करणें हीं कामें करी. या राजपुत्राच्या कारकीर्दींत पोर्तुगालनें आफ्रिकेचा

बराच किनारा शोधून काढला. याच्यानंतर पोर्तुगालच्या गादीवर येणारा राजा दुसरा जॉन, यानेंहि पूर्वींच्याच राजाचा कित्ता वळविल्यामुळें, केप ऑफ् गुडहोप मार्गानें पोर्तुगाल देशास, पूर्वेकडील देशांस जाणारा, नवीन रस्ता शोधून काढण्याचें श्रेय संपादन करतां आलें.

या हेनरीची कारकीर्द इ० स० १४६० पर्यंत होती. ज्या कारणां-मुळें व्हेनिस, जिनोआ वगैरे नगरराज्यांची सत्ता खालावली, त्या कारणांनींच पोर्तुगाल, स्पेन, इंग्लंड व फ्रान्स, यांना विलक्षण धाडसाचीं जलपर्यटनें करण्यास प्रोत्साहन मिळालें, व त्या देशांच्या भरभराटीच्या काळास सुरवात झाली. हीं जलपर्यटनेंच इंग्लंडच्या हल्लींच्या भरभराटीस कारण झालीं आहेत. या तुर्की स्वारीनें पूर्वींच्या सुएझ संयोगीभूमिच्या मार्गानें वाहणारा व्यापाराचा प्रचंड ओघ बदलला व तो एक दिशेनें वाहण्याच्याऐवजीं, यापुढें प्रथम दोन मार्गांनीं व नंतर अनेक मार्गांनीं वाहूं लागला.

या शतकांतच पर्यटनें कां झालीं, याचें महत्वाचें कारण वर दिलें आहे; परंतु याशिवाय एवढ्या दूरदूरच्या व अज्ञात अशा समुद्रांतून, मार्ग शोधून काढण्याचें अत्यंत धाडसाचें काम अंगावर घेण्यास, आणखी महत्वाचीं कारणें म्हटलीं म्हणजे, होकायंत्र व बंदुकीच्या दारूचा शोध, हीं होत. यांशिवाय आणखी एक शास्त्रीय शोध म्हटला म्हणजे 'पृथ्वी वाटोळी आहे' हा होय. या शोधाच्या योगानें, आपण एकसारखे युरोपच्या पश्चिमेस समुद्रांतून प्रवास करीत गेल्यास, पूर्वेकडील देशांस खास जाऊन पोहोचूं, या कल्पनेचा या पर्य-टनांस मुख्य आधार मिळाला. त्यामुळेंच थेट पश्चिमेकडे जहाजें हांकारण्याचें कोलंबसास धैर्य आलें, व अमेरिकेसारख्या प्रचंड खंडाचा शोध लागला.

त्याचप्रमाणें ज्या देशांत धाडशी खलाशांची उणीव होती, त्या देशांत 'आपणांस मदत करा, म्हणजे आपण पूर्वेकडे जाण्याचे मार्ग शोधून काढूं.' असें म्हणणारे जिनोई खलाशी जाऊं लागले. अशांपैकीं यशस्वी रीतीनें

आपली कामगिरी पार पाडणारे खलाशी म्हटले म्हणजे जॉनकेबट व कोलंबस हे होत. यांनीं आपल्या परिश्रमानें इंग्लंड व स्पेन या देशांचें, इतिहासांत नांव अजरामर करून ठेविलें आहे.

कोलंबसानें बहामा वगैरे वेस्टइंडिज बेटें प्रथम शोधून काढलीं, व तीं हिंदुस्तानच्या किनाऱ्यालगतचींच बेटें असावीं असें वाटून, त्यानें त्यांना वेस्ट-इंडिज असें नांव दिलें. हळूं हळूं स्पेननें हीं बेटें आपल्या ताब्यांत घेतलीं, व तेथील भागांत पुष्कळ सोन्याचांदीच्या खाणी आहेत असें आढळल्यावर, व बेटांच्या पलीकडे मोठी अफाट जमीन पसरली आहे, असें पाहून, त्यानें त्या मुख्य जमिनीच्या प्रदेशाकडे आपली नजर वळविली. नंतर कांहीं खाणींतून व कांहीं तेथील रेडइंडियन लोकांना बुचाडून सोनें पैदा केलें, व स्वतःच्या देशांत अलोट संपत्ति आणून त्यास श्रीमान करून सोडलें. आपण मिळविलेल्या देशांत, दुसऱ्या देशांचा हात शिरूं नये, व आपल्या या संपत्तींत त्यांनीं वांटेकरी होऊं नये, म्हणून त्या वेळच्या रोम शहरीं राहणाऱ्या ख्रिस्ती धर्मगुरूच्या साहाय्यानें, त्यांनीं पोर्तुगाल व स्पेन या दोन सफरी करणाऱ्या देशांच्या, समुद्रावर सरहद्दी ठरवून घेतल्या व अटलांटिक महासागरांतील या काल्पित रेषेच्या पूर्वेकडील देशांवर स्पेनचा, व पश्चिमेकडील प्रदेशांवर पोर्तुगालचा अंमल असावा असें ठरलें. या ठरावाप्रमाणें अमेरिका ही स्पेनच्या व आफ्रिका व एशिया वगैरे भाग पोर्तुगालच्या वांट्यास आले. यानंतर जवळ जवळ एक शतकपर्यंत स्पेन, व पोर्तुगाल यांनीं अटलांटिक महासागरावर आपला अंमल चालूं ठेविला. या १०० वर्षांच्या अवकाशांत, या दोन देशां-शिवाय इतर देशांची कोंडमार झाली. सुएझचा मार्ग तुर्कांनीं अडविला, व अटलांटिक महासागर स्पेन–पोर्तुगालनीं अडविला. तेव्हां याशिवाय राहिलेल्या दोन, म्हणजे ईशान्य व वायव्य या दिशांनीं मार्ग सांपडल्यास पाहणें, हा एक उपाय किंवा या मार्गांनीं पूर्वेकडे जाण्यास मार्ग न सांपडल्यास, वर सांगि-तलेली कोंडी फोडून बाहेर जाण्याचा प्रयत्न करणें, हा दुसरा उपाय, यांखेरीज तोड उरली नाहीं.

या मध्यंतरींच्या काळांत, प्रथमतः, इंग्लिशांनीं वायव्य व ईशान्य कोपऱ्यांनीं पूर्वेकडे जाण्याचा मार्ग शोधण्याचा उपक्रम केला. पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. वायव्येकडे गेलेल्या खलाशांपैकीं बटन्, फॉक्स, बॅफिन्, हडसन् वगैरे खलाशी मरण पावले. त्या भागांतील सागरांना व उपसागरांना दिलेल्या नांवांवरून या खलाशांची कीर्ति अजरामर झाली आहे. या बाजूकडे इंग्लिशांना लॅब्रॅडोरचा किनारा व न्यू फाऊंडलंड बेट हे प्रदेश मात्र मिळाले.

युरोपच्या ईशान्य बाजूनें गेलेल्या, वुईलोबी नामक खलाशास, पुढें पुढें बर्फाळ प्रदेश लागल्यामुळें, मार्ग सांपडणें मुष्किलीचें होऊन, रशियाच्या किनाऱ्यावर थांबावें लागलें. पण या संधीचा फायदा घेऊन, त्यानें रशियन सरकारबरोबर व्यापारी तह घडवून आणला, व मस्कोव्ही नामक कंपनी स्थापन होऊन, रशियाबरोबर इंग्लंडचा व्यापार सुरू झाला.

लॅब्रॅडोर व न्यू फाऊंडलंड या प्रांतांमधून व आंतील भागांतून मिळणारा कच्चा माल गोळा करण्यासाठीं, हडसन-बे कंपनी स्थापन होऊन प्रथम शोध व नंतर व्यापार, या प्रकारचें इंग्लंडनें धोरण स्वीकारलें.

फ्रान्स देशानें नवीन देश शोधून काढण्याच्या बाबतींत जरी नांव मिळविलें नसलें, तरी पुढील २।३ शतकें व्यापारी चढाओढींत त्यानें इंग्लंडचा पाठपुरावा केला. शोध व व्यापार हीं १६ व्या शतकांत मुख्य दोन अंगें आहेत. पूर्वेकडील देशांशीं स्वतःस स्वतंत्रपणें व्यापार करण्यास मुभा मिळावी म्हणून पर्यटन करण्याचें काम इंग्लंडनें अंगावर घेतलें. त्यांत विशेष यश न मिळाल्यानें, पोर्तुगाल व स्पेन या रस्ते अडवून धरणाऱ्या राष्ट्रांबरोबर, आपणांस लढण्याचा लवकरच प्रसंग येणार, असें इंग्लंडला भविष्य दिसूं लागलें. कुरापत कशा रीतीनें काढावयाची, एवढाच काय तो प्रश्न उरला.

धर्मसुधारणेची चळवळ.

१६ व्या शतकांत इंग्लंडच्या गादीवर ट्यूडर घराणें राज्य करीत होतें. या घराण्यांतील राजे जरी अनियंत्रितपणें राज्य करीत, तरी त्यांना इंग्लंड, व तेथील लोक, यांजबद्दल अत्यंत अभिमान व खरी कळकळ वाटत असे. हे राजे गादीवर येण्याच्या अगोदर, सबंध युरोपखंडभर, धार्मिक बाबतींत मोठा वाद उत्पन्न झाला होता. पोप* व इतर धर्मोपदेशक, हे धर्माच्या नांवाखालीं, धर्माशीं वास्तविक संबंध नसणाऱ्या गोष्टींच्या योगानें, लोकांना फसवितात, असा लोकांचा समज होत चालला होता. पोपनें रोम शहरीं एक ख्रिस्ती देवालय बांधावयास काढलें होतें. त्याला लागणारे पैसे मिळविण्यासाठीं आपल्या धर्माधिकाऱ्यांकडून तो पापमुक्तीचीं पत्रकें विकीत होता. हीं पत्रकें केवळ फसवणूक आहे, बायबलांत असें कोठेंच दिलें नाहीं असें लोकांचें मत होतें. त्यामुळें प्रकरण विकोपास गेलें. या गोष्टीचा प्रथमतः जर्मनींतील मार्टिन लूथर नांवाच्या प्रोफेसरनें उघड प्रतिकार केला. यास हळू हळू पुष्कळ अनुयायी मिळत गेले. या पंथास प्रॉटेस्टंट (प्रतिकार करणारे अथवा धर्मसुधारक) या नांवानें ओळखूं लागले. जुन्या मताच्या लोकांना कॅथॉलिक उर्फ पुराणमतवादी म्हणत.

या नवीन पंथाच्या लोकांचा, येशू ख्रिस्त व बायबल, या दोनच गोष्टींवर विश्वास असल्यामुळें, ते यांसच प्रमाण मानीत; पोपला मुळींच जुमानीत नसत. या पंथाला प्रथम जरी थोडे अनुयायी मिळाले, तरी ' सत्यापाशीं परमेश्वर। सर्वकाळ तिष्ठत ॥ या कव्युक्तिप्रमाणें, जों जों कॅथॉलिक पंथानें यांचा छळ करण्यास सुरुवात केली, तों तों या पंथास जास्तच बळकटी येत चालली. ज्या राजांना राजकीय अगर इतर बाबतींत पोपचा अम्मल डोईजड झाला होता, त्यांनीं या घरीं चालून आलेल्या संधीचा फायदा घेऊन,

---

* पोप आपल्या शंकराचार्यांप्रमाणें मुख्य ख्रिस्ती धर्मगुरु.

त्याच्या अमलाखालून आपली सुटका करून घेतली. ट्यूडर घराण्यांतील दुसरा राजा आठवा हेनरी, याला आपली पहिली राणी कॅथेराइन् हिच्या-बरोबर काडी मोडून, ॲन बोलिन या स्त्रीबरोबर लग्न करावयाचें होतें; पण कॅथेराइन् ही, अर्ध्या युरोपवर राज्य करणारा स्पेनचा सार्वभौम राजा पांचवा चार्लस, याची बहीण असल्यानें, त्या वेळच्या पोपला काडी मोडण्याबद्दल हुकूम देणें अशक्य झालें. त्यामुळें आपल्या मनांतील हेतु सोडावा अगर पोपशीं संबंध तरी तोडावा, यांशिवाय आठव्या हेनरीस गत्यंतर उरलें नाहीं. तेव्हां त्यानें पोपशीं संबंध तोडला व राजकीय बाबतीप्रमाणेंच, इंग्लंडचे राजे, यापुढें धार्मिक बाबतींतहि स्वतंत्र झाले. इंग्लंडनें नवीन धर्मपंथ स्वीकारल्या-मुळें व इंग्लंडबाहेर लोकांचा छळ झाल्यामुळें, या नवीन पंथाचे लोक इंग्लंडांत येऊन राहूं लागले. या गोष्टीमुळें देशाच्या औद्योगिक व आर्थिक बाबतींत अनुकूल स्थित्यंतरें घडून आलीं.

१७ व्या शतकांत ज्या राजकीय उलाढाली झाल्या, त्यांना या धार्मिक परिस्थितीचा कसा उपयोग झाला हें पाहूं. या नवीन चळवळीमुळें युरोपांतील देशांचे दोन तट झाले. स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स वगैरे देश जुन्या मताचे, तर इंग्लंड, हॉलंड, जर्मनी हे नवीन मताचे झाले. यापुढील काळांत मुख्यतः राजकीय वर्चस्वासाठीं, पण धार्मिक चळवळीच्या सदराखालीं, बरींच युद्धें झालीं आहेत.

स्वतःच्या देशांत होणारा धार्मिक छळ असह्य झाल्यामुळें, पुष्कळ लोक परदेशांत जाऊन राहिले. या लोकांत पुष्कळ कारागीर लोक असल्यानें, ते ज्या देशांत गेले, तेथें त्यांनीं त्या कला शिकविल्या, व त्या तेथें कायमच्या रुजल्या. अशा कलांपैकीं लोंकरीचें कापड विणण्याची कला फ्रान्सांतून इंग्लंडांत आली, व स्वमताला घट्ट चिकटून राहणाऱ्या या नवीन पंथाच्या लोकांनींच, अमेरिकेसारख्या दूरच्या व संकटमय देशांत जाऊन, वसाहतींना उज्ज्वल स्वरूप प्राप्त करून दिलें.

सुरुवातीला स्पेन व पोर्तुगाल या देशांनीं अमेरिका व आफ्रिका खंडाचा भाग शोधून काढला. त्यावेळीं आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें पोर्तुगालनें, व वेस्ट इडीज बेटांत स्पेननें, आपला अम्मल बसविला. पोर्तुगाल देशानें कच्चा माल व गुलाम या दोन बाबतींत युरोप व स्पेनच्या अमेरिकन वसाहती यांबरोबर व्यापार सुरू केला. पुढें स्पेननें अमेरिकेचा मुख्य भूभाग ताब्यांत घेण्यास सुरुवात केल्यानें, या वेस्ट इंडीज बेटांवरील त्याचें लक्ष कमी झालें. अमेरिकेच्या मुख्य भागांत, पेरू, चिली, या प्रांतांत त्यांना चांदीच्या व सोन्याच्या खाणी सांपडल्या, व यांशिवाय तेथील रेडइंडियन लोकांना लुबाडून, त्यांनीं अलोट संपत्ति गोळा केली. या बाबतींत पिझॅरो व कोर्टे हे स्पेनचे सेनापती फार प्रसिद्ध आहेत. क्रूरपणाच्या बाबतींत नादिरशहा व तैमुरलंग यांच्या मालिकेंत यांना घालण्यास हरकत नाहीं.

वेस्ट इंडिज बेटांतील स्पेनचा अम्मल सैलावल्यामुळें, पूर्वेकडील देशांना जाण्यास नवीन मार्ग शोधण्यांत निराश झालेल्या देशांना, ही आयतीच संधी मिळाली, व दंडेली करून मार्ग मिळविण्याशिवाय दुसरा उपाय न राहिल्यानें, त्यांनीं दंडनीतीचाच स्वीकार करण्याचें ठरविलें. इंग्लंडनें यापूर्वीच पोपचा अम्मल झुगारून दिल्यानें, आतां कांहींच आडकाठी उरली नाहीं.

ट्यूडर घराण्यांतील आठव्या हेनरीच्या कारकीर्दीपासूनच, हॉकिन्स नामक घराण्यानें, प्रथमतः अटलांटिक महासागरांत चांचेगिरीस सुरुवात केली. व त्याच्या प्रयत्नांस यश मिळत गेलें, तशी या प्रयत्नांत राजसत्ताहि सामील झाली, व शेवटीं स्पेनबरोबर दोन हात केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसूं लागल्याबरोबर, या दर्यावर्दी व धाडसी पुरुषांचा, उघड गौरव करण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. जॉन व वुइल्यम हॉकिन्स, फ्रॉबिशर, ड्रेक वगैरे धाडसी खलाशांनीं, आफ्रिकेचा पश्चिम किनारा व वेस्ट इंडीज बेटें यांमध्यें दळणवळण ठेवून, गुलामांचा व्यापार सुरू केला; व स्पेन देशाचीं संपत्तीनें भरून येणारीं जहाजें लुटून, त्यांस 'त्राहि भगवान्' करून सोडलें. त्यामुळें, स्पेननें इंग्लंडवर

स्वारी करण्याचा बेत नक्की केला; व १५८८ सालीं स्पेनचें 'अजिंक्य आरमार' इंग्लंडवर स्वारी करण्यास निघालें; पण इंग्लिश खलाशांनीं, आतांपर्यंतच्या चकमकींत, स्पेनचें वजन चांगलेंच ओळखलें असल्यामुळें, व सृष्टिदेवताहि अनुकूल झाल्यामुळें, या आरमाराचा धुव्वा उडविण्यास त्यांना मुळींच वेळ लागला नाहीं. या जयानें, इंग्लंडच्या अजिंक्य आरमाराचा पाया घातला गेला, व आतांपर्यंत इतर युरोपियन राष्ट्रांना बंद असलेल्या अटलांटिक महासागराचा दरवाजा, व्यापारासाठीं पूर्णपणें खुला झाला. यापूर्वींच १५८० सालीं पोर्तुगाल देश स्पेनच्या ताब्यांत गेला होता. त्यामुळें स्पेनचा पाडाव झाल्यानें, स्पेन व पोर्तुगाल या दोन्हीहि प्रमुख सत्ता नामशेष झाल्या व एका दगडानें दोन पक्षी मारले गेले.

वसाहतींची स्थापना.

इ. स. १५८८ नंतर या जगाच्या रंगभूमीवर प्रथम डच, नंतर इंग्लिश, व नंतर फ्रेंच, हे लोक प्रमुखत्वानें दिसूं लागले. डच लोक हे पुष्कळ वर्षें स्पेनच्या अमलाखालीं होते. वरील आरमारी युद्धानें तेहि स्वतंत्र झाले. पुढील २० वर्षांत डच खलाशांनीं फार दूरदूरच्या सफरी केल्या. परंतु यांचा मुख्यत्वेंकरून व्यापारी पेशा असल्यानें, ईस्ट इंडीज बेटांचा ताबा घेण्यापलिकडे, यांनीं विशेष लक्ष दिलें नाहीं; पण फ्रेंच व इंग्लिश यांनीं प्रथम व्यापार व नंतर राजकीय वर्चस्वाकडे लक्ष दिल्यानें, १७व्या व १८व्या शतकांत, याच सत्ता, जगाच्या इतिहासांत जास्त लक्ष आकर्षून घेऊं लागल्या. धार्मिक प्रसाराच्या बाबतींत त्यांनीं तटस्थ वृत्ति स्वीकारल्यानें, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत कधींहि द्वेष उत्पन्न झाला नाहीं. पण स्पेन व पोर्तुगाल यांनीं धार्मिक प्रसाराचा अट्टाहास केल्यानें, लोकांना त्यांचा कंटाळा आला, व पडत्या काळांत त्यांचें हिंदुस्तानांतील वर्चस्व लवकर खालावलें.

स्पेनचें वर्चस्व नाहींसें झाल्यावर, १६०४ सालीं फ्रेंच ईस्ट इंडिया नांवाची व्यापारी कंपनी स्थापन झाली. लवकरच त्यांनीं कानडांत वसाहत स्थापन केली, व त्यांचे मागून, त्या प्रांतांत, इंग्लिशांनींहि आपली वसाहत स्थापिली. पोर्तुगीज व डच यांचे मागून, हिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच यांच्या व्यापारी वखारी स्थापन झाल्या.

स्पेनचा पाडाव झाल्यावर डच लोकांनीं, समुद्रपर्यटनांत अघाडी मारली, व १५८८ नंतर २० वर्षांच्या अवधींत, त्यांनीं मसाल्याच्या जिनसांचा व्यापार जवळ जवळ हस्तगत केला. याच सोळाव्या शतकांत इंग्लंडांतील खलाशांनीं स्पेनची संपत्ति लुटणें, गुलामांचा व्यापार करणें, कच्चा माल पैदा करणें, या तीन गोष्टींकरितां अतोनात धाडसी प्रयत्न केले, व त्यामुळें, इंग्लंडांतील लोकांच्या अन्तःकरणांतील, धाडसी वृत्तीला प्रोत्साहन मिळालें. या वृत्तीचा उपयोग, स्पेननें आरमार पाठविलें, त्यावेळीं चांगला दिसून आला. या धाडसी, खलाशांना प्रथमतः लुटारू (Bucaneer) हीच संज्ञा मिळाली होती, व अशीच आरंभीं प्रयत्न करणारांच्या वांटयास येत असते. पण आरमारी पराभवानें, स्पेनच्या थोरपणाची छाप उडाल्यावर, अटलांटिक महासागराचा राजमार्ग, सर्व युरोपियन राष्ट्रांना खुला झाला.

सोळाव्या शतकाच्या अखेरीस, अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर, वसाहती स्थापन करण्याचे प्रयत्न झाले; पण त्यांत, अनेक कारणांनीं प्रथम यावें तसें यश मिळालें नाहीं. रॅलेनें स्थापन केलेली व्हर्जिनिया ही वसाहत रेड इंडियनांच्या हल्ल्यापुढें टिकाव धरूं शकली नाहीं. वसाहत करण्यास योग्य असे लोक अमेरिकेंत जाऊं लागेतोंपर्यंत, या नवीन वसाहती, परदेशांत मूळ धरूं शकल्या नाहींत यांत नवल नाहीं.

पण या शतकांत धार्मिक चळवळ सुरू झाली, व राजांनीं मान्य केलेला धर्म, अमान्य करणाऱ्या लोकांचे, हाल होऊं लागल्यामुळें, कांहीं बाणेदार

लोकांनीं, स्वदेश सोडून देऊन जेव्हां ३,००० मैल दूरच्या देशांत जाण्याचें ठरविलें, त्या वेळेस या वसाहतींची खरी भरभराट होण्यास सुरुवात झाली.

या लोकांचा उद्देश तेथील सोनें अगर चांदी गोळा करणें हा नसून तेथील परिस्थितीशीं झगडणें, तेथील जमीन स्वतः कसणें, स्वतःचें वस्त्रप्रावर्ण विणणें व उपयुक्त संस्था स्थापन करून, नवीन देशास आपलें घर बनाविणें, हा असल्यामुळें, या वसाहती लवकर जोमदार बनत चालल्या, व हा सर्व खटाटोप धार्मिक विचारांचें स्वातंत्र्य मिळावें व त्यामुळें अन्तःस्वास्थ्य कायम राहावें, यासाठीं करण्यांत आला. राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय मनुष्याला धार्मिक आचरण योग्य रीतीनें करतां येऊं शकत नाहीं.

या रीतीनें इंग्लिशांच्या कांहीं वसाहती स्थापन होत असतां फ्रेंच, डच व स्वीडिश् यांच्याहि या किनाऱ्यावर वसाहती स्थापन होत होत्या. स्पॅनिश लोकांचा दक्षिण भागांत (उ० अमेरिकेच्या) अम्मल होता, त्या वेळेपासून, या वसाहतींत अंगमेहनतीचें काम गुलामांकडून करून घेत असत, व अशा रीतीनें, धर्मछळानें देश सोडणाऱ्यांच्या वसाहती उत्तर भागीं व गुलामांकडून काम घेणाऱ्यांच्या वसाहती दक्षिणेस, अशी वांटणी झाली होती. उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागापेक्षां, उत्तर भाग जास्त थंड असल्यामुळें, तेथें गुलामांच्या मदतीशिवाय युरोपियनांना मेहनत करतां येई, हीहि गोष्ट खरी आहे.

इंग्लिश व फ्रेंच वसाहतींचा झगडा.

उत्तर अमेरिकेंत, लॉरेन्स नदीचा भाग व मिसिसिपी नदीच्या मुखाजवळील प्रदेश, यांत फ्रेंच सरकारनें फ्रेंच वसाहती स्थापन करविल्या होत्या; व पूर्व किनाऱ्याच्या बाजूनें बहुतेक वसाहती इंग्लिशांच्या होत्या; पण त्या राजानें वसविल्या नसून, सामान्य इंग्लिश लोकांनीं वसविल्या होत्या, व

इंग्लंडचा राजा त्यांना थोडीफार मदत करीत असे. फ्रेंच वसाहती स्थापन करण्यांत फ्रेंच सरकारचें पूर्ण पाठबळ असून, वसाहती या मायदेशाच्या उपयोगाकरितां आहेत, अशी पक्की समजूत होती. यामुळें, या वसाहतींत, व्हावी तशी लोकसंख्या व उद्योगधंदे यांची वाढ झाली नाहीं. इंग्लिश वसाहती मुख्यत्वें करून लोकांनीं स्थापिल्या असल्यानें, त्यांच्याच हातांत मुख्य सत्ता होती. त्यामुळें या वसाहतींची, फ्रेंच वसाहतींच्या मानानें, जास्त भरभराट झाली. यांच्या मागें इंग्लंडचा अगदींच ससेमिरा नव्हता असें मात्र नाहीं; पण ज्यावेळीं फ्रेंच व इंग्लिश यांच्या वसाहतींचा झगडा सुरू झाला, त्यावेळीं इंग्लिश वसाहतींत फ्रेंचांच्या दसपट लोकसंख्या होती.

फ्रान्सच्या गादीवर १६४३ ते १७१४ पर्यंत, चौदावा लुई या नांवाचा, औरंगजेबाप्रमाणें एक मोठा महत्वाकांक्षी बादशहा राज्य करीत होता. उ. अमेरिका व तेथील सर्व प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यांत घ्यावा असा विचार त्याच्या मनांत एकसारखा घोळत होता. म्हणून त्यानें आपला एक सेनापती तेथें पाठवून तेथील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करविलें. या * सेनापतीनें दोन टोंकांस असलेल्या फ्रेंच वसाहतींच्या दरम्यानच्या प्रदेशांतून दौरा काढला, व लढाईचा प्रसंग आल्यास मदत करण्याबद्दल रेडइंडियनांशीं तह केले. फ्रेंचांची संख्या थोडी असल्यानें, त्यांना असे तह करणें जरूर वाटलें. किनाऱ्याजवळच्या इंग्लिश वसाहती व अंतर्भागांतील विस्तीर्ण सपाट मैदान, यांमध्यें अलेघानी पर्वताची ओळ पसरली होती. तेव्हां अंतर्भागांत या इंग्लिश वसाहतींचा शिरकाव होऊं नये म्हणून, या पर्वताच्या नाक्याच्या भागांत किल्ले बांधणें जरूर आहे असें दिसून आलें व त्याप्रमाणें फ्रेंचांचा उद्योग सुरू झाला. इंग्लिशांचा या पर्वताच्या पलीकडे शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं एवढेंच नाहीं, तर पूर्वकिनाऱ्यावरूनहि त्यांच्या वसाहती हुसकून द्यावयाच्या, असा

* सेनापती 'ला–साल'.

फ्रेंचांचा डाव होता. या सर्व गोष्टी चालूं असतां, इंग्लिश वसाहतवाल्यांचें तिकडे लक्ष गेलें नाहीं असें नाहीं; पुढें येणाऱ्या आपत्तींशीं झगडण्याचा वसाहतींनीं बेत ठरविला होता, व जेव्हां जेव्हां युरोपांत या दोन देशांत युद्ध सुरू होई, तेव्हां तेव्हां अमेरिकेंतहि या दोन राष्ट्रांच्या वसाहतींत, लहान प्रमाणावर चकमकी चालूं राहात.

सुमारें १७०० च्या सुमारास वर सांगितलेली फ्रेंच किल्ल्यांची ओळ पुरी झाली. १६८८ ते १७६३ च्या दरम्यान, जीं निरानिराळीं युद्धें युरोपांत झालीं, त्यांपैकीं १७५६ ते १७६३ या सप्तवार्षिक युद्धांत, यांच्या अमेरिकेंतील भांडणास चांगलाच रंग भरत चालला. फ्रेंच सेनापती मॉंटकाम यानें इंग्लिशांचे हल्ल्यावर हल्ले परतवून त्यांस नाउमेद करून सोडलें. ही स्थिति सुमारें दोन वर्षेंपर्यंत टिकली, व फ्रेंचांची सरशी होऊन त्यांचे मनोरथ सिद्धीस जाणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं.

इतक्यांत इंग्लंडांत प्रधानमंडळ बदलून, थोरला पिट् हा मुख्य प्रधान झाला. त्यानें युद्धाच्या कामावर स्वतःच्या पसंतीनें सेनापती पाठविले, व या वेळेपासून, इंग्लिशांच्या ताब्यांतील सर्व ठिकाणीं चाललेल्या लढायांचें पारडें पार बदललें. इंग्लंडकडे वाहणारी प्रत्येक झुळुक विजयाची बातमी आणीत होती. फ्रेंचांचें मुख्य ठाणें क्वेबेक येथें होतें. तें सर करणें अतिशय महत्वाचें होतें. या कामावर वूल्फ याची योजना झाली होती. त्यानें मोठ्या चातुर्यानें मार्‍याची जागा काबीज केली व त्याची व मॉंटकाम याची लढाई होऊन, जरी दोन्ही सेनापती पडले, तरी शेवटीं इंग्लिशांसच विजयश्रीनें माळ घातली. ही हकीगत वाचतांना, तानाजी व उदयभानू यांच्या झगड्याची कोणास आठवण होणार नाहीं ?

यानंतर बहुतेक ठिकाणीं इंग्लिशांचाच विजय झाला. हें युद्ध १७६३ सालीं संपल्यावर जो तह झाला, त्या तहाचे योगानें, फ्रेंचांना अमेरिकेवरचा सर्व हक्क सोडावा लागला.

या प्रांतांतील सर्व फ्रेंच किल्ले इंग्लिशांना मिळाले. अशा रीतीनें जवळ जवळ दीड शतक चाललेल्या झगड्याचा कायमचा शेवट लागला.

———

इंग्लंड व इंग्लिश वसाहती.

फ्रेंच वसाहतींच्या मानानें जरी इंग्लिश वसाहती स्वतंत्र होत्या, तरी इंग्लंडपासून त्यांजला त्रास सोसावा लागत नसे असें नाहीं. वसाहती या आपल्या फायद्यासाठीं आहेत असें इंग्लंड मानीत असे, पण या फायद्याबरोबर वसाहतींना बरोबरीनें हक्क देण्याची कल्पना मात्र त्यांना पसंत नसे. अमेरिकेंतील वसाहतींपासून इंग्लंडला कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा होऊन देशांतील उद्योगधंद्याची वाढ झाली. पण स्वावलंबी वृत्तीच्या वसाहतवाल्यांनीं स्वदेशांत उद्योगधंदे सुरू केल्यावर, इंग्लंडच्या उद्योगधंद्यांस बाध येऊं नये म्हणून, त्यांवर प्रतिबंधक कायदे बसविण्यांत आले. वसाहतींनीं कच्चा माल प्रथम इंग्लंडांत विकावा व उरेल तो बाहेरच्या व्यापाऱ्यांस द्यावा, अशा इंग्लंडनें अटी घातल्या. इंग्लंडला जहाजें बांधण्यास लागणारें उत्तम लांकूड वसाहतींत मिळतें, म्हणून इंग्लंडनें तेथील जंगलें आपल्या ताब्यांत घेतलीं. अशा प्रकारचें धोरण प्रथमपासून सुरू होतें. पण इंग्लंडच्या सामान्यतः उदार धोरणानें, इंग्लिश वसाहतींची भरभराट होत चालली. १७व्या शतकाच्या अखेरीस, इंग्लंडहून नेमून येणारे गव्हर्नर, हें बरेच कमी दर्जाचे येऊं लागल्यानें लांचलुचपत, पक्षपात, वगैरे प्रकारांनीं त्यांनीं रयतेस मट्टयास आणलें. त्यामुळें १८ व्या शतकाच्या प्रथमार्धांत, जरी इंग्लिश वसाहतींत राज्यव्यवस्थेबद्दल एकंदरीनें तिटकारा उत्पन्न झाला होता, तरी सरकारचा पूर्ण पाठिंबा असणाऱ्या फ्रेंच वसाहतींशीं गांठ असल्यामुळें, होणारा जुलुम निमूटपणें सहन करण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें. पण १७६३ च्या तहानें फ्रेंचांची हकालपट्टी झाल्यावर, इतके दिवस वाटणारें परकीयांचें दडपण दूर झालें, व मग वसाहतींनीं स्वतःच्या सरकारबरोबर हक्कांसाठीं भांडण्यास कंबर बांधली.

इंग्लिश व फ्रेंच वसाहतींची तुलना.

इंग्लंडच्या बंधनकारक अटींनीं वसाहतवाले नाखूष झाले, व मायदेशाशीं भांडण्याची ते वाट पाहात होते असें वर सांगितलें. इतर देशच्या वसाहतींतील धोरणापेक्षां, इंग्लिश वसाहतींत, मायदेशाचे नियम जास्त कडक होते असें वाटण्याचा संभव आहे. पण तशी वस्तुस्थिति नसूनहि, या वसाहतींनीं कां भांडण्यास सुरुवात केली, हें पुढील हकीगतीवरून लक्षांत येईल.

फ्रेंच वसाहती सर्वस्वीं फ्रेंच सरकारच्या ताब्यांत असून, त्यांवर फ्रान्समधून अधिकारी नेमून येत. फ्रेंच वसाहतींत कोण लोक पाठवावे व त्यांनीं कसें यागावें याबद्दल कडक नियम असत. वसाहतींत येण्याप्रमाणेंच बाहेर जाण्याबद्दल नियम असत, व मुख्य सरकारच्या परवानगीशिवाय कोणासहि वसाहत सोडतां येत नसे. पिकणाऱ्या सर्व मालावर फ्रेंच सरकारचा ताबा असून, तें सरकार सांगेल त्या पिकाची लागवड करावी लागे. फार कशाला ! आपल्या मालकीचें जनावर विकावयाचें झाल्यास, तें पॅरिसहून हुकूम येईपर्यंत तहकूब ठेवावें लागे. जमिनीच्या वांटणीच्या बाबतींतहि फ्रान्समधील सरंजामी *पद्धतीचा स्वीकार केला होता. त्यामुळें लोकांवर कराच्या बाबतींत जुलूम होऊन शेती भरभराटीस येत नसे, व पुष्कळ लोकांना कष्टमय आयुष्य घालवावें लागे. म्हणून फ्रेंच वसाहतींत १७६३ सालीं फक्त ५०,००० च लोकसंख्या होती.

परंतु फ्रेंच वसाहतींपासून थोडक्या अंतरावर असलेल्या ब्रिटिश वसाहतींत, या मानानें फारच फरक होता. ब्रिटिश वसाहतींत तेथील लोकच मालक असून, इंग्लिश सरकारचें तिकडे फारसें लक्ष नसे, व येणाऱ्या संकटांशीं त्यांना एकाकी

---

* सरंजामापद्धति—राजा सरदारांस जमिनी वांटून देई व ते आपल्या कुळांस वाटून देत असत. असा खालपर्यंत क्रम सुरू राही.

व असहाय असें झगडावें लागे. या वसाहतींत कोण लोक पाठवावे, हें सरकारनें ठरविलें नसल्यानें, धाडसी, स्वावलंबी, कार्यदक्ष व चौकस वृत्तीचेच लोक येथें येऊन राहात. यांनीं आपणांबरोबर आनुवंशिक संस्कारच फक्त आणले होते असें नव्हे, तर मायदेशांतील लोकसत्तात्मक संस्थांचें ज्ञानही आणिलें असून, त्या संस्था येथें हळू हळू रुजत चालल्या होत्या. त्यांच्यावर देखरेख ठेवण्यास गव्हर्नर आला व कार्यकारी मंडळहि इंग्लंडनें नेमिलें. तरी त्याच्या खालची लोकसभा, लोकांनींच निवडावयाची असून, पैशाची मदत देणें न देणें त्यांच्या हातीं होतें. त्यामुळें गव्हर्नरास नेहमींच त्यांच्याशीं बेगुमानपणानें वागतां येत नसे. याशिवाय कांहीं बाबतींत, या वसाहतींनीं मायदेशाच्या पुढें थोडें पाऊल टाकलें होतें. त्या बाबी म्हटल्या म्हणजे—

(१) मत देण्याचा व्यापक हक्क.

(२) मुद्रणस्वातंत्र्य.

(३) मोफत शिक्षण.

अशा रीतीनें इंग्लंडच्या पुढें अघाडी मारलेल्या वसाहतींत जुलूम—मग तो कितीहि अल्प असला—तरी कसा खपणार ! परंतु योग्य संधि आल्याशिवाय काय करणार ? ती संधि त्यांच्यावरील फ्रेंच वसाहतींचें दडपण निघून गेल्यानें प्राप्त झाली. तिचा त्यांनीं कसा फायदा घेतला हें आपण पाहूं.

इंग्लंडबरोबर वसाहतींचा झगडा.

फ्रान्सबरोबर झालेल्या १७६३ च्या तहानें, फ्रान्सचें अमेरिकेंतील वर्चस्व नाहींसें झालें; पण फ्रान्सबरोबर वसाहतींप्रीत्यर्थ लढतांना, इंग्लंडला जवळ जवळ १४ कोटी पौंड कर्ज झालें. येथपर्यंत इंग्लंडला मोठें कर्ज बाळगण्याची संवय नव्हती. आतां तें इंग्लंडच्या व इतर देशांच्याहि अंग-

चळणी पडलें आहे.+ त्यामुळें या युद्धानंतर येणाऱ्या मुख्य प्रधानास व फडणिसास, या कर्जाची विल्हेवाट लावण्यासाठीं, कांहीं तरी तोड काढणें जरूर होतें. त्या वेळचा फडणवीस ग्रेनव्हिल्, यानें परिस्थितीचा आढावा काढून, या वसाहतींवर कर बसविण्याचा बेत ठरविला. कारण कर्ज होण्याचें मुख्य कारण, अमेरिकेप्रीत्यर्थ करावीं लागणारीं युद्धें, हें होय ! सबब, आतां फ्रान्सपासून स्वतंत्र झाल्याबद्दल, या कर्जाचा थोडा तरी वांटा वसाहतींनीं उचलावा, असें त्याचें म्हणणें ! म्हणून वसाहतींच्या बाबतींत, त्यानें पुढील तीन गोष्टी ताबडतोब अमलांत आणण्याचें ठरविलें:—

(१) मालाच्या वाहतुकीसंबंधीं कायदे जास्त कडक रीतीनें अमलांत आणणें.

(२) अमेरिकेच्या रक्षणासाठीं नवें खडें सैन्य उभारणें.

(३) वसाहतींवर युद्धाबद्दल कर बसविणें.

या गोष्टींनीं वसाहती खवळून जातील, असें कोणाच्या स्वप्नींहि आलें नाहीं. ग्रेनव्हिल् यानें आपल्या म्हणण्याप्रमाणें, वाहतुकीचा कायदा जास्त कडक रीतीनें अमलांत आणला, व कोणताहि दस्तऐवज अगर महत्वाचा कागद, कायदेशीर ठरण्यासाठीं, त्याजला सरकारी तिकिटें लाविलीं पाहिजेत असें ठरवून, लोकांवर कर* बसविला.

हा कायदा १७६५ सालीं पार्लमेंटांत पास झाल्यामुळें, अमेरिकेभर लोक क्षुब्ध झाले. पुढील सालीं जें रॉकिंगहॅमचें प्रधानमंडळ आलें, त्यानें लोकमत शांत करण्यासाठीं तिकिटांचा कायदा (स्टॅंप ॲक्ट) रद्द केला.

+ १९२० साल अखेर हिंदुस्थान देशाला ४६ कोट पौंड राष्ट्रीय कर्ज होतें.

* यास स्टॅंप ॲक्ट असें म्हणतात.

पण पार्लमेंटला असा कर लादण्याचा अधिकार आहे ही गोष्ट स्पष्टपणें जाहीर केली. वरील कर माफ केल्यानें लोक बरेच शांत झाले.

पुढील प्रधानमंडळानें पुनः कांच, कागद, चहा वगैरे वस्तूंवर कर बसविले. त्यानें युद्धकर्ज फेडण्यास फारशी मदत होणार होती, अशांतला भाग नव्हता. पण प्रकरण चिडीस गेल्यामुळें, जो तो आपल्या हक्कांचें समर्थन करूं पाहत होता, इतकेंच ! !

त्यामुळें मॅसाच्युसेट्स वसाहतींतील कांहीं माथेफिरूंनीं, बंदरांतील चहा समुद्रांत फेंकला व बरीच मारामारी केली. 'म्हातारी मेली तर चालेल, पण काळ सोकावतो' याचा मुख्य बंदोबस्त केला पाहिजे, असें अमेरिकेचें धोरण होतें. जों जों इंग्लंडची दडपशाही सुरू झाली, तों तों अमेरिकेचें प्रकरण चिघळत चाललें, व १७७४ सालीं भरलेल्या अमेरिकन कांग्रेसनें, पार्लमेंटचा अंमल कबूल केला, तरी कर बसविण्याच्या बाबतींत इंग्लंडनें अमेरिकन लोकांचें म्हणणें ऐकलें पाहिजे, असें जाहीर केलें. प्रकरण मिटतें घेऊन, अमेरिकेचें ऐकल्यास, सर्व वसाहती राजनिष्ठ राहण्यास पूर्ण कबूल आहेत, असा अमेरिकन कॉंग्रेसनें इंग्लंडला निरोप पाठविला. मध्यंतरी मॅसेच्युसेट वसाहतीनें आपलें सैन्य तयार केलें व विरुद्ध पक्षांच्या झटापटीहि झाल्या. पण कॉंग्रेसनें समेटाचें धोरण अद्याप सोडलें नव्हतें. इंग्लंडनें वसाहतींचें बिलकूल ऐकावयाचेंच नाहीं असें ठरविल्यामुळें, त्यांना सरतेशेवटीं गत्यंतर उरलें नाहीं; व १७७६ सालीं अमेरिकन कॉंग्रेसनें वॉशिंगटन् यास मुख्य सेनापती करून युद्ध जाहीर केलें.

मागील तहांत फ्रान्सचा अपमान झाला होता, व त्याला इंग्लंडचा सूड घ्यावयाची फार तीव्र इच्छा होती. तेव्हां तोहि लांबून एकंदर या प्रकरणाचा रागरंग पाहात होता. त्यानें हें भांडण जास्त पेटाविलें व अमेरिकेस मदत करण्याचें आश्वासन दिलें. इंग्लंडनें पाठविलेलें सैन्य थोडें असून त्यास योग्य पुरवठा नसे. पण वसाहतींच्या बाजूस धाडसी, स्वावलंबी व निश्चयी लोक असून, गनिमी काव्याच्या लढाईत ते पटाईत होते.

आरमाराच्या जोरावर इंग्लंडनें अमेरिकेच्या सैन्यास किनाऱ्यापासून दूर ठेविलें. १७७७ सालीं इंग्लंडचा सेनापती बर्गायने याचा सॅराटोगा येथें पूर्ण पाडाव झाला. १७७८ सालीं अमेरिकेच्या बाजूनें फ्रान्स सामील झाला व त्यामुळें अमेरिकेला जास्त जोर चढला. १७८१ सालीं सेनापती कॉर्नवालिस, याचा यॉर्कटाउन येथें पूर्ण पराभव होऊन, इंग्लंडला वसाहतींचें स्वातंत्र्य कबूल करावें लागलें.

या निकालानें वसाहतींच्या बाबतींत केवळ व्यापारी धोरण ठेवणें अयथार्थ आहे, ही कल्पना इंग्लंडला पटली, व वसाहतींच्या बाबतींत नवीन धोरण स्वीकारणें अगत्याचें आहे, ही जाणीव उत्पन्न झाली. इंग्लंडच्या हातून या १३ अमेरिकन वसाहती गेल्याच; पण त्यांतल्या त्यांत समाधानाची बाजू म्हटली म्हणजे त्यास कानडा प्रांत शिल्लक राहिला.

वसाहतींसंबंधीं जुन्या व नव्या कल्पना.

वर सांगितल्याप्रमाणें वसाहती या मायदेशाच्या केवळ फायद्यासाठीं आहेत, असा समज होता. अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्यावर, कोणत्याही वसाहती मायदेशास चिकटून राहणार नाहींत, त्या आपल्या पायावर उभ्या राहूं लागल्या म्हणजे स्वतंत्र होतील, असाच सर्वत्र समज पसरला.

झाडावर एखादें फळ पक्कदशेस आलें, म्हणजे जसें तें आपोआप झाडापासून गळून पडतें, तशीच वसाहतींची स्थिति आहे, असें कांहींचें म्हणणें होतें. वसाहतींपासून मायदेशास कांहीं फायदा होत नसून, त्यांची सुव्यवस्था ठेवण्यास स्वतःच्या पदरास चट्टा लावून घ्यावा लागतो, असें समजणाऱ्या लोकांनीं, वसाहतींना गळ्यांत अडकविलेल्या जड लोढण्याची उपमा दिली. कांहींनीं युरोपियन देशांच्या चालींप्रमाणें, मुलें सज्ञान झालीं, कीं तीं आपल्या आईबापांपासून अलग राहूं लागून स्वतंत्र संसार थाटतात,

या गोष्टीची वसाहतींना उपमा दिली. सारांश, बहुतेक युरोपांतील प्रमुख राष्ट्रांतून हीच कल्पना वावरतांना दिसत होती.

पण अमेरिका स्वतंत्र होण्यापूर्वी, या बाबतींत नवीन तऱ्हेनें विचार करणारा इंग्लंडांत एक पक्ष निर्माण झाला होता. वसाहती मायदेशास चिकटून राहाव्या, त्या फुटून निघूं नयेत, अशी इच्छा असल्यास, मायदेशानें या वसाहतींच्या बाबतींत, जास्त उदार धोरण स्वीकारावें, असें या पक्षाचें म्हणणें होतें. वसाहतींना आपले कायदे बनविण्यांत जास्त स्वातंत्र्य द्यावें, त्यांच्या कारभारांत मायदेशानें विनाकारण ढवळाढवळ करूं नये, असें या पक्षाचें मत होतें; दिवसेंदिवस इंग्लंडांतही या पक्षाचे पुष्कळ अनुयायी होत चालले होते. या पक्षास ' रॅडिकल लिबरल ' पक्ष ऊर्फ स्वातंत्र्यवादी पक्ष असें म्हणत. या पक्षाचा पुढारी गिबन वेकफील्ड हा असून, लॉर्ड डरहॅम, चार्ल्स बुलर, वुइल्बरफोर्स वगैरे गृहस्थ त्याचे अनुयायी होते. आपल्या मताप्रमाणें वागल्यास, साम्राज्याचा जलद विस्तार होऊन, वसाहती फुटून जाणार नाहींत, एवढेंच नाहीं तर त्या नेहमीं मायदेशाशीं कृतज्ञपणानें वागतील, असें यांचें म्हणणें होतें. तें आज अनुभवानें सिद्ध झालें आहे.

अमेरिका हातची गेल्यानें इंग्लंडला आपली झालेली चूक स्पष्टपणें कळून आली, व पुढें स्थापन झालेल्या वसाहतींच्या बाबतींत ही चूक दुरुस्त केल्यानें, आजचा साम्राज्यविस्तार झाला आहे. वसाहती या मायदेशाच्या हांकेस ओ देण्यास तयार आहेत, हें मागील महायुद्धाचे वेळीं दिसून आलें आहे.

कानडा

अमेरिका स्वतंत्र झाली व तिजबरोबर झालेल्या तहानें, कानडा प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत राहिला. लॅब्रॅडोर व न्यू फाउंडलंड हे प्रांत, १४९७ सालीं सातव्या हेनरीच्या कारकीर्दींत शोधून काढण्यांत आले, व त्यानंतर या किनाऱ्यालगतच्या समुद्रांत, मासे मारण्याचा धंदा करण्यास फ्रेंच व इंग्लिश बोटी दरसाल येऊं लागल्या. (१६०० च्या सुमारास मासे मारण्याच्या कामीं सुमारें ४०० बोटी गुंतलेल्या असत.) पण १५८३ पर्यंत या किनाऱ्यावर, इंग्लिशांनीं आपला अंमल जाहीर केला नव्हता. या सालीं त्यांनीं न्यू फाउंडलंडचा ताबा घेतला, व तेथें राज्यव्यवस्था सुरू केली. ही इंग्लंडची सर्वांत जुनी वसाहत होय. १५३४सालीं फ्रेंच खलाशी कार्टियर, यानें लॉरेन्स नदीच्या मुखानें आंत जाऊन मॉंट्रीलपर्यंत प्रदेश शोधून काढला व तेथें फ्रेंच वसाहत होण्यास सुरवात झाली. १६०८ सालीं चॅंपेलन या दुसऱ्या फ्रेंच खलाशानें कार्टियरपेक्षां जास्त आंत शिरून, क्वेबेकपर्यंत मजल मारली. असेच आपण पुढें गेलों तर, आपण हिंदुस्तानचा किनारा सहज गांठूं, अशी या शोधकांची कल्पना होती; पण लॉरेन्स नदी व हिंदुस्तानचा किनारा यांत शेंकडों मैलांचें अंतर आहे हें त्या बिचाऱ्यांना काय माहीत ?

त्याला हिंदुस्तान सांपडला नाहीं, तरी एक विस्तृत वसाहत करण्यास योग्य प्रदेश मिळाल्यानें, फ्रान्समध्यें आपत्तीनें गांजलेल्या पुष्कळ लोकांची तेथें सोय झाली, व मुबलक जागा, भव्य सृष्टिसौंदर्य व पूर्ण स्वातंत्र्य या त्रयीचा प्रथम त्यांना मनमुराद उपभोग घेतां आला. कांहींनीं शेती व कांहींनीं शिकारी पेशा पत्करून, आपली आयुष्याची दिशा ठरवून टाकली.

या प्रदेशांत मूळची रेड इंडियन नांवाच्या ताम्रवर्णी लोकांची वसाहत होती. हे लोक दऱ्याखोऱ्यांतून व झाडींतून हिंडण्यांत व घोड्यावर बसण्यांत पटाईत असत, व प्राण्यांची शिकार करून उदरनिर्वाह करीत. हे स्वातंत्र्य-

प्रिय असून लढण्याच्या कामांत वाकबगार असत. केंसाळ कांतडी व इतर कच्चा माल पैदा करण्यास युरोपियन लोकांना यांचा फार उपयोग झाला. मणी, आरसे, सुऱ्या, हत्यारें वगैरे देऊन, त्यांच्या मोबदला ते कच्चा माल घेत असत. पण पुष्कळदां ते बिथरून यांच्या वसाहतींचा (यांची संख्या कमी होती तेव्हां) नायनाट करीत, व दोघांच्या झटापटींत भयंकर रक्तपात होई.

फ्रेंच लोक वसाहती स्थापन करीत असतां इंग्लिशांनींहि प्रयत्न सुरू ठेविले होते. १६२१ सालीं अलेक्झांडर नांवाच्या स्कॉच सरदारानें त्या वेळच्या पहिल्या जेम्सच्या परवानगीनें, किनाऱ्यावर नवीन वसाहत स्थापन केली. तीसच आज ' नोव्हास्कोशिया ' ऊर्फ नवें स्कॉटलंड म्हणतात.

यानंतर पुष्कळ इंग्लिश वसाहती किनाऱ्याकिनाऱ्यानें स्थापन झाल्या. त्यांत न्यूइंग्लंड, मॅसाच्युसेटस् या प्रमुख होत्या. इंग्लंड व अमेरिकेचें युद्ध संपलें त्यावेळीं एकंदर १३ वसाहती स्वतंत्र झाल्या. या स्वतंत्र झाल्यावर, इंग्लंडच्या राजाशीं राजनिष्ठेनें वागणारीं जीं अमेरिकेंत घराणीं होतीं, तीं इंग्लिशांच्या ताब्यांत राहिलेल्या कानडा प्रांतांत येऊन राहूं लागलीं, व त्या ठिकाणच्या मूळच्या फ्रेंच लोकांनींहि, या नवीन येणाऱ्या लोकांना सर्व प्रकारें मदत केली. कारण येथील फ्रेंच लोकांना फ्रेंच सरकारचा अम्मल फार जाचक *झाल्यानें, अमेरिकेच्या मागील स्वातंत्र्ययुद्धांत त्यांनीं फ्रेंच सरकार व इंग्लंडशीं लढणारे इंग्लिश वसाहवाले यांना मदत केली नाहीं.

तेव्हां आतां कानडा या भागांत इंग्लिश व फ्रेंच असे दोन देशाचे लोक इंग्लंडच्या अमलाखालीं आले. यावेळीं फ्रेंच वस्ती ६३००० असून इंग्लिश वस्ती फक्त २०० होती. पूर्वीच्या इंग्लिश वसाहतींप्रमाणेंच, इं. सरकारनें

---

* इंग्लिश व फ्रेंच वसाहतींची तुलना या भागांत पहा.

येथील व्यवस्था लावली. इंग्लंडहून गव्हर्नर नेमून पाठवावयाचा. त्याला मदत, त्यानेंच नेमिलेलें एक इंग्लिश कौंसिल द्यावयाचें अशी व्यवस्था झाली. फ्रेंच लोकांना लोकसत्तात्मक पद्धतीचें शिक्षण नाहीं, या सबबीवर त्यांना लोकसभेचे हक्क देण्याचें लांबणीवर टाकण्यांत आलें; पण या व्यवस्थेंत लोकमताला बिलकूल वाव नसल्यानें, ती एकंदरीनें लोकांना पसंत पडली नाहीं; पण इलाज काय? लोकांनीं सरकारास पैसे देण्याचें बंद पाडीपर्यंत, गव्हर्नरास आपली अरेरावी चालवितां येत असे.

सारांश, मंडळ ऊर्फ कौंसिल मिळालें; पण जबाबदार राज्यपद्धति मिळाली नाहीं. हा फरक अत्यंत महत्वाचा आहे. त्यावरच खरें स्वातंत्र्य अवलंबून असतें. फ्रेंच लोकांनीं विशेष ओरड केल्यावर, १७९१ सालीं या दोन्ही वसाहती एकत्र ठेवण्यापेक्षां जातवार वाटल्या, तर भांडणाचें कारण नाहींसें होईल असें वाटून, या वसाहतींचे दोन भाग करण्यांत आले. व त्यांना त्या परिस्थितींत वापरतां येतील इतकेच हक्क देऊन त्यांचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न झाला; तो थोडा वेळ यशस्वी दिसला, तरी ती थोडा वेळ टिकणारी युक्ति आहे, असें लवकरच लक्षांत आलें.

१८१२ सालीं स्वतंत्र वसाहतींस कानडा प्रांत जोडून घ्यावा या उद्देशानें, अमेरिकेनें (युनायटेड स्टेटस्) कानडावर स्वारी केली; पण त्यांच उद्देश सफळ झाला नाहीं. उलट या दोन देशांत परस्परांबद्दल तेढ उत्पन्न होऊन, इंग्लंडचा संबंध मात्र जास्त बळकट झाला. आजहि कानडा हा देश अमेरिकेंत मिसळून जाण्यास तयार नाहीं.

पण अमेरिकेसारखा स्वतंत्र देश व त्याची व्यवस्था डोळयांपुढें असल्यानें, आपल्यास जास्त हक्क मिळावे, अशी कानडाला स्वाभाविकच इच्छा उत्पन्न झाली. १८३६-३७ च्या सुमारास, अर्जविनंत्यांनीं उपयोग होत नाहीं असें पाहिल्यावर कानडानें बंड उभारलें. याशिवाय इंग्लंडमध्येंहि

१८३२-३३ सालीं रिफॉर्म ॲक्ट (Reform Act) या सुधारणा कायद्यानें, लोकांना बरेचसे मतदानाचे हक्क मिळाले ही गोष्ट त्यांना माहीत होती.

या बंडाचा मोड करून तेथील परिस्थिति पाहाण्याच्या कामीं, लॉर्ड डरहॅम याची पार्लमेंटनें नेमणूक केली. त्यानें कानडांत आल्यावर, बंडाचा मोड केला, व एकंदर परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून, इंग्लिश पार्लमेंटास आपला रिपोर्ट सादर केला. त्यानें आपल्या रिपोर्टांत जीं कारणें दाखविलीं तीं:—

(१) जातिद्वेष व (२) राजकीय हक्कांची वाढती आकांक्षा हीं मुख्य होतीं. ही परिस्थिति निवळण्यासाठीं त्यानें असें सुचविलें कीं, जातिद्वेष नाहींसा होण्यास हे दोन्ही प्रांत अलग न ठेवितां एक करावे, जातवार प्रतिनिधी न देतां ते संख्येवर अवलंबून असावे, व येथील लोकांना साम्राज्यांतर्गत जबाबदार राज्यपद्धति द्यावी, म्हणजे असंतोषाचें बीज नाहींसें होईल. या रिपोर्टाचा विचार होऊन, पार्लमेंटनें ×कानडास जबाबदार राज्यपद्धति देण्याचें ठरविलें, व ती कानडास १८४१ सालीं मिळाली. या वेळेपासून कानडांत नवीन युगास सुरुवात झाली असें म्हणतां येईल. १८४७ ते १८५४ च्या दरम्यान, लॉर्ड एल्जिनच्या कारकीर्दींत कानडा प्रांतांत पुष्कळ सुधारणा झाल्या, व १८६७ सालीं पास झालेल्या कायद्यानें S क्वेबेक, आंटोरियो, न्यूब्रन्सविक व नोव्हास्कोशिया, या प्रांतांचा एक संघ बनवून त्यास 'डोमिनियन' हें नांव दिलें. अशा प्रकारें दोन्ही भाग एकत्र होऊन स्वराज्याचे हक्क मिळाल्यानें, आपापसांतील यादवी आपोआप बंद पडली, व डरहॅमचें भविष्य खरें ठरलें. या कायद्यान्वयें कानडा प्रांतांत स्थापन होणाऱ्या

× ब्रिटिश नॉर्थ अमेरिकन ॲक्ट.

S १ जुलै १८६७ रोजीं पास झाला. आजहि 'डोमिनियन डे' नांवाचा, १ जुलै या दिवशीं, सर्व कानडाभर महोत्सव होतो.

नवीन वसाहतीहि या संघास जोडून घेण्याबद्दलचें कलम होतें. इतर भागांत वस्ती होण्यास एक मोठा रेल्वे रस्ता बांधला पाहिजे, असें सर्वानुमतें ठरून, कनेडियन पॅसिफिक रेल्वे रस्ता तयार करण्यांत आला, व त्याच्या दोन्ही बाजूंनीं वस्ती वाढत चाललीं. या नवीन स्थापन होणाऱ्या वसाहती क्रमाक्रमानें संघांत सामील झाल्या. या संघांत प्रथमपासूनच न्यूफाउंडलंड व लॅब्रेडोर हे प्रांत सामील झाले नाहींत. आज त्यांना स्वतंत्र जबाबदार राज्यव्यवस्था असून या संघांत सामील होण्याची इच्छाहि नाहीं. अशा रीतीनें कानडा प्रांतांत उदारमतवादी लोकांच्या विचारांचा प्रयोग करण्यांत आला, व तो पूर्ण यशस्वी ठरला यांत संशय नाहीं.

जबाबदार राज्यपद्धतिः—कानडाला मिळालेली राज्यव्यवस्था इंग्लंडच्या धर्तीवर आहे. तेथें हिंदुस्थान देशाप्रमाणें इंग्लंडहून गव्हर्नरजनरल नेमून येतो. पण त्याला हिंदुस्थानच्या ग. जनरलप्रमाणें अनियंत्रित सत्ता नसते. इंग्लंडच्या राजाप्रमाणें त्याला कानडाच्या, लोकनियुक्त प्रधानमंडळाच्या सल्ल्याप्रमाणें वागावें लागतें. इंग्लंडच्या विरुद्ध अगर स्थापन झालेल्या राज्यघटनेंत, फरक न होऊं देण्याबद्दल त्यास जपावें लागतें. येथें कायदे करणाऱ्या दोन सभा आहेत. त्यांपैकीं एकीस **सेनेट**, व दुसरीस **लोकसभा** म्हणतात. पहिली इंग्लंडच्या सरदार मंडळाप्रमाणें असून, त्यांतील सभासद प्रधानमंडळाच्या सल्ल्यानें गव्हर्नरजनरल नेमतो, व त्यांची नेमणूक तहाहयात असते. दुसऱ्या सभेंत लोक आपले प्रतिनिधि निवडून पाठवितात. ह्या सभेंतील बहुसंख्याक पक्षामधून प्रधानमंडळ निवडलें जातें. ह्यांत ११ प्रधान असतात व त्या मंडळास **प्रिव्हि कौन्सिल** म्हणतात. अशी मध्यवर्ती सरकारची रचना आहे. या संघांत सामील झालेल्या निरनिराळ्या संस्थानांवर, गव्हर्नरजनरल हा स्वतः लेफ्टनंट गव्हर्नर नांवाचे अधिकारी नेमितो, व त्याला मदतीसाठीं प्रांतिक मंडळें दिलेलीं असतात. मुख्य अधिकार मध्यवर्ती सरकारकडे असून, जरूर तेवढेच अधिकार

संस्थानांना दिले आहेत. ओटावा हें मध्यवर्ती सरकारच्या राजधानीचें शहर आहे. लोकसभेनें निवडलेल्या प्रधानमंडळाकडे, देशांतील राज्यव्यवस्थेचीं प्रमुख खातीं सोंपविलेलीं असतात. मध्यवर्ती सरकारकडे (१) राष्ट्रीय कर्ज, (२) कर, (३) व्यापार, (४) सैन्य व आरमार, (५) चलन, (६) पोस्ट व तारखातें आणि (७) रेडइंडियन लोकांची व्यवस्था वगैरे गोष्टी सोंपविलेल्या असतात, व संस्थानांकडे, शिक्षण, पोलिस, व तुरुंग वगैरे लहानसहान गोष्टी सोंपवितात.

या प्रांताचा हिताहित संबंध पाहण्यास इंग्लंडांत एक अधिकारी ठेवतात, त्यास हाय कमिशनर म्हणतात.

न्यू फाउंडलंड

साम्राज्यांतील सर्व वसाहतींत, कानडाप्रांताला जवळ व फार जुनी अशी हीच वसाहत आहे. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावल्यावर, इंग्लंडचा राजा सातवा हेनरी यानें जॉन केबट यांस नवीन देश शोधण्यास पाठविलें. त्यानें लॅब्राडोरचा किनारा व न्यू फाउंडलंड, हे दोन भाग शोधून काढले. तेव्हांपासून या भागांत इंग्लिश व फ्रेंच लोकांच्या मच्छीमार बोटी येऊं लागल्या.

न्यू फाउंडलंड बेटांत वसाहत करून फ्रेंच लोक त्याचा ताबा घेतील अशी भीति वाटल्यानें, इंग्लंडनें १५८३ सालीं ती आपल्या ताब्यांत घेतली. ह्या वसाहतीचें क्षेत्र मुंबई इलाख्याएवढें असून लोकसंख्या मात्र अहमदाबाद शहराहून जास्त नाहीं!

न्यू फाउंडलंड व लॅब्राडोर प्रांत मिळून एक भाग बनविण्यांत आला असून, हा भाग कानडापासून स्वतंत्र आहे, व तो कानडाप्रांतांत इतउत्तर सामील होण्याची शक्यताहि नाहीं.

१५८३ सालापासून ही वसाहत इंग्लंडच्या ताब्यांत आहे, व दर तहाच्या वेळीं ती आपल्याच ताब्यांत राखून ठेवण्याची इंग्लंडनें काळजी घेतली आहे. पण आश्चर्य हें कीं, १८३२ सालापर्यंत, या वसाहतीला प्रतिनिधि नेमण्याचासुद्धां अधिकार देण्यांत आलेला नव्हता. या सालीं प्रथम कायदे मंडळ स्थापण्यांत आलें. १८४१ सालीं या मंडळांत कांहीं लोकप्रतिनिधी निवडून येण्याचा हक्क मिळाला, व १८५५ सालीं येथील लोकांनीं राजकीय हक्क मिळण्याबद्दल सनदशीर चळवळ चालू ठेवल्यानें, त्यांस जबाबदार राज्यव्यवस्था देण्यांत आली.

या बेटांत इंग्लंडहून गव्हर्नर नेमून येतो. त्याच्या मदतीस ९ जणांचें एक कार्यकारीमंडळ असतें. याशिवाय 'कौंसिल' व 'असेंब्ली' अशा दोन सभा असून, येथील कार्यकारीमंडळ, इतर देशांतील प्रधान मंडळाप्रमाणें, सर्व खात्यांची व्यवस्था पाहातें. दोन सभांत अनुक्रमें २४ व ३६ प्रतिनिधी असतात.

ऑस्ट्रेलिया

हें खंड दक्षिण गोलार्धांत असून जवळ जवळ युरोपखंडाएवढें मोठें आहे; किंवा ब्रह्मदेश वगळून राहिलेल्या हिंदुस्तानच्या दुप्पट मोठें आहे. पण येथील लोकसंख्या मात्र मुंबई इलाख्याच्या चवथ्या हिश्शाइतकी भरेल.

हा देश आशियाचाच एक भाग असावा, असा पुष्कळ दिवस समज असल्यानें यास 'ऑस्ट्रल आशिया' म्हणजे 'दक्षिण आशिया' हें नांव दिलें, व तेंच आज चालत आहे.

१५ व्या व १६ व्या शतकांत या समुद्रांत स्पॅनिश खलाशांनीं पर्यटनें केलीं असावीं असें दिसतें. पण १७ व्या शतकांत, टॅस्मन् व

डॉंपियर या डच खलाशांनीं, या खंडासंबंधीं जास्त विश्वसनीय माहिती मिळवून आपल्या देशांत प्रसिद्ध केली. या भागांत पर्यटन करीत असतां, तेथें आढळलेल्या कांहीं भयप्रद गोष्टी व तेथील प्रदेशाचा रुक्षपणा पाहून, त्यांच्या मनानें या देशाकडे ओढ घेतली नाहीं, व त्यामुळें १८ व्या शतकांतील कॅप्टन कुक्च्या सफरीपर्यंत या देशाकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. कॅप्टन कुक् हा इंग्लिश अधिकारी असून, इंग्लिश व फ्रेंच वसाहतीच्या तंट्याच्या वेळीं आरमारासाठीं, लॅरेन्स नदीच्या मुखाजवळच्या भागाचे नकाशे तयार करण्याचें काम त्याकडे सोंपविलें होतें. १७५९ सालीं, क्वेबेकच्या लढाईनें या भांडणाचा निकाल लागल्यावर, इंग्लिश शास्त्रज्ञांना टाहिटी बेटावर नेण्याची त्याजकडे कामगिरी आली. या ठिकाणीं सूर्यबिंबावरून जाणाऱ्या शुक्राचा उत्तम वेध घेतां येणार होता. त्यामुळें सूर्याचा व्यास व आकारमान ठरविण्यास मदत होणार होती.

हें काम आटोपल्यावर, त्यानें आपलीं जहाजें न्यू झीलंड बेटाकडे वळविलीं, व तीं दोन निरानिराळीं बेटें आहेत हें शोधून काढलें. नंतर ऑस्ट्रेलियाकडे जहाजें वळविलीं. पूर्वकिनाऱ्याच्या उपसागरांतील अवर्णनीय सृष्टिसौंदर्य पाहून, त्या उपसागरास ' **बॉटनी बे** ' ऊर्फ वनस्पतीपूर्ण उपसागर असें यथार्थ नांव दिलें, व तो भाग इंग्लंडच्या राजाच्या नांवानें ताब्यांत घेतला. नंतर ऑस्ट्रेलिया हा आशियाचा भाग नसून, तें एक स्वतंत्र खंड आहे ही गोष्ट प्रवासानें सिद्ध केली. हा शोध १७६९।७० सालीं लागला. तरी १७८८ पर्यंत, येथें वसाहत करण्याचा विचार कोणाच्याहि डोक्यांत आला नाहीं.

१७८३ सालीं अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्यावर, त्या देशांत इंग्लंडहून येणारे कैदी अमेरिकन सरकारनें बंद केले, तेव्हां या कैद्यांना आतां देशाबाहेर कोठें पाठवावें, असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां अनायासें मिळालेल्या ऑस्ट्रेलिया खंडाकडे सरकारचें लक्ष गेलें, व तेथें कैदी पाठविण्याचें

ठरलें. हा देश कैदी पाठविण्यास पसंत करण्याचीं कारणें, तो इंग्लंडपासून फार दूर आहे, त्या देशांत पाठविल्यास कैद्यांना चैनीचे पदार्थ मिळणार नाहींत, व तेथें मूळच्या काळ्या लोकांशीं लढावें लागेल, हीं होत. हा देश इंग्लंडपासून दूर होता, तरी इंग्लंडमधील हालांशीं तुलना करतां, तेथें गेल्यावर बरेंच सौख्य मिळेल अशी कैद्यांची खात्री होती, व त्यामुळें ऑस्ट्रेलियांत जाण्यास त्यांनीं आपली पसंती दर्शविली.

यावेळीं इंग्लंडांतील तुरुंगाची स्थिति फारच शोचनीय होती. तेथें तुरुंगांत पुष्कळसे कैदी एका लहानशा खोलींत कोंडून ठेवीत. या खोल्यांतून विलक्षण अंधार असून, जमिनीला ओल असे. कैद्यांना एक वेळहि भरपूर पुरणार नाहीं, इतकें अन्न दोन वेळां मिळून दिलें जाई, व कधीं कधीं तर तें अजिबात मिळत नसे. कैदी आजारी पडल्यास त्याची मुळींच पूसतपास न झाल्यानें, तो खोलींत मरून पडला तरी दाद लागत नसे. लहानसहान गुन्हे व कर्ज यांबद्दल कधीं कधीं जन्मभर बंदिवास सोसावा लागे. तेव्हां अशा विपन्नावस्थेंत राहण्यापेक्षां, ऑस्ट्रेलियासारख्या दूरच्या पण जास्त सुखकारक देशांत जाणें त्यांनीं पसंत केलें यांत आश्चर्य कसलें !

एकदां ऑस्ट्रेलियांत कैदी पाठविण्याचें ठरल्यावर १७८८ सालीं, कॅप्टन फिलिप याच्या हाताखालीं १००० कैदी देऊन त्याची ऑस्ट्रेलियास रवानगी झाली, व ते सिडने बंदरांत येऊन दाखल झाला. या इंग्लंडमधील कैद्यांनीं ऑस्ट्रेलियन वसाहतीचा पाया घातला, म्हणून हिला ' कैद्यांची वसाहत ' असें म्हणतां येईल. या लोकांबरोबरचा अन्नाचा सांठा थोडा असून, नवीन सांठा वेळेवर न आल्यानें यांची बरीच दैना उडाली. पण पुनः लवकरच स्थिरस्थावर झालें. यानंतर क्रमाक्रमानें कैदी पाठविले जाऊन वसाहत वाढत चालली, व त्यामुळें मूळची वसाहत पुरेनाशी झाली. तेव्हां अंतर्भाग शोधण्याची अवश्यकता भासूं लागली. किनाऱ्यापासून थोड्याच अंतरावर असलेल्या, (ऑस्ट्रेलियन आल्प्स) नील पर्वतापलीकडील प्रदेश शोधून काढ-

ण्याचा, कित्येकांनीं प्रयत्न केला. पण त्या बाबतींत **स्टर्ट** याला मात्र यश-प्राप्ति झाली. यानें नील पर्वत ओलांडून, पलीकडील मैदानाचा प्रदेश शोधून काढला, व त्या प्रांतांतील नद्यांच्या मार्गानें समुद्रापर्यंत शोध लावला. तेथेंच पुढें ॲडिलेड या वसाहतीची स्थापना झाली. या सफरीनंतर, **स्टुअर्ट** यानें दक्षिणोत्तर मार्गाचा शोध लावण्याचा प्रयत्न केला. पण त्याजला **'कूपर्स क्रीक'** या भागापासूनच नाइलाजानें माघार घ्यावी लागली.

कॅ० स्टुअर्टनंतर या दक्षिणोत्तर मार्गाचा शोध लावण्याचें काम **बर्क** व **वुईल्स** या प्रवाशांनीं अंगांवर घेतलें. त्यांनीं हा प्रदेश शोधण्यास १८६० सालीं सुरुवात केली. बराचसा लवाजमा घेऊन, 'कूपर्स क्रीक' पर्यंत आल्या-वर मोजक्या लोकांनिशीं त्यांनीं पुढें प्रवास सुरू केला, व आपल्या बरोबरच्या लोकांना आपली १ महिनाभर वाट पाहण्यास सांगून, या ठिकाणीं ठेविलें. अतिशय कष्ट सहन करीत हे दोन प्रवासी कार्पेंटेरियाच्या आखाताजवळ येऊन पोहोंचले, तेव्हां त्यांना आपल्या श्रमाचें चीज झाल्यासारखें वाटलें. पण परत 'कूपर्स क्रीक'जवळ येऊन पाहतात, तों आपली वाट पाहून पाहून आपल्या बरोबरची मंडळी एक दिवसच अगोदर कंटाळून परत गेल्याचें त्यांस आढळलें. खाण्याची सामुग्री संपल्यामुळें, तेथें सांपडलेल्या सामुग्रीवर त्यांनीं कसाबसा १।२ दिवस गुजारा करून पाहिला; पण थकून गेल्यानें प्रथम **बर्क** व नंतर **वुईल्स** हे दोघेहि मरण पावले. त्यांच्याबरोबरच्या माणसांपैकीं किंग याला रानटी लोकांचें गांव लागल्यानें, खाण्याची व्यवस्था लागली व मिळविलेल्या यशाची माहिती सांगतां आली.

१८४०च्या सुमारास, **आयर** नांवाच्या एका प्रवाशानें, दक्षिणेकडील भाग शोधून काढण्याचें ठरवून ॲडिलेडपासून पश्चिमेस प्रवास सुरू केला. किनाऱ्याच्या बाजूनें लागणाऱ्या खाऱ्या सरोवरांच्या पृष्ठभागाखालीं, चिखल असल्यानें, यानें बरोबर घेतलेलीं जनावरें व घोडे फसत, व निघण्या-साठीं धडपड करावी लागे. या प्रवासांत त्याला डोंगर, दरडी, उन्हाची

चमक, रात्रीं झोंबणारी थंडी, व पाण्याचें दुर्भिक्ष, इतक्या प्रकारच्या आपत्तींशीं झगडावें लागलें, व बरोबर घेतलेल्या काळ्या लोकांनींहि वाटेंत लुटालूट केल्यामुळें बराच त्रास झाला. पुढें जाणें अशक्य झाल्यावर, किनाऱ्याच्या बाजूनें जाणारें एक जहाज आढळलें, त्यांतून ते सुरक्षितपणें आल्बनीस पोहोंचले. इतक्या हालअपेष्टा झाल्या, तरी त्यानें १५०० मैलांचा प्रदेश शोधून काढला. याच्या मागून कांहीं वर्षांनीं **फॉरेस्ट** नामक प्रवाशानें, याच दिशेनें पण या खंडाच्या उत्तरेच्या बाजूनें प्रवास करून, या देशाच्या भूगोलज्ञानांत भर टाकली. याच्याच उत्तरेकडील बाजूनें पूर्व-पश्चिम प्रवास करणारा तिसरा धाडसी प्रवासी लिचर्ड हा होय. यानें पोर्ट डार्विनपासून पश्चिमेकडील प्रदेशांत प्रवास करून त्या भागाचा शोध लाविला. अशा रीतीनें एकामागून एक धाडसी पुरुष निर्माण होऊन, ऑस्ट्रेलियाच्या अंतर्भागाचा शोध लागला. हे प्रवास १८४० ते १८७५ च्या दरम्यान झाले. इतर कोणत्याही देशांत न आढळणारी पाण्याची भयंकर अडचण, या प्रवाशांच्या पुढें नेहमीं हजर असे. श्रम, उष्णता व निर्जनता यांच्या जोडीला तहानेची जबर तीव्रताहि सहन करावी लागली. या प्रदेशांतील भागांना चिंताउपसागर, निराशापर्वत, दुःख नदी, दगडी अरण्य, क्षार-सरोवर, वाळवंटी भूशिर वगैरें अन्वर्थक नांवें देऊन, आपल्या खडतर प्रवासाचा अनुभव त्यांनीं चिरस्मरणीय करून ठेवला आहे. अशा प्रकारें, स्वतःच्या जीविताची पर्वा न करितां जनसमूहाच्या सुखासाठीं, अंतर्भागाचा शोध लावणारे प्रवासी धन्य होत, यांत कांहीं संशय नाहीं. या प्रवाशांच्या प्रयत्नानें अंतर्भाग खुला होऊन, त्या भागांत तारायंत्र व रेल्वे रस्ते स्थापन झाले, व लोकवस्ती वाढविण्यास चांगली मदत झाली. **स्टर्ट, स्टुअर्ट, आयर, लिचर्ड, बर्क, वुईल्स व फॉरेस्ट** या धाडसी प्रवाशांचीं नांवें ऑस्ट्रेलियाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद करण्यासारखीं आहेत.

अन्तर्भागाचा शोध सुरू होण्यापूर्वीच येथें इंग्लंडहून इतर लोक येऊन राहूं लागले होते. कारण या भागांत मेंढ्या पाळतां येण्यासारखीं माळरानें, व गुरांना चरण्यासारखे विस्तृत प्रदेश असल्याचें त्यांना समजलें. त्यामुळें गुरें व मेंढ्या बाळगणारे पुष्कळ धनगर ऑस्ट्रेलियांत येऊं लागले

अशा रीतीनें वस्ती वाढत असतां, न्यूसाउथ वेल्स परगण्यांतील हारग्रीव्ह्ज नांवाचा एक रहिवासी, अमेरिकेंतील कॅलिफोर्निया प्रांतांत सोन्याच्या खाणींत काम करण्यासाठीं गेला होता. तेथें असतांना, सोनें क्वार्टझ जातीच्या खडकांत सांपडतें, व कधीं कधीं त्या दगडांतून हे कण चमकत असतात, ही गोष्ट त्यानें पाहिली. अमेरिकेंत असतांना, एके दिवशीं त्याच्या लक्षांत आलें कीं, आस्ट्रेलियांत आपण राहातों, त्या भागानजीकच असे खडक आहेत. तेथें असतांना त्याच्या मनांत हीच गोष्ट घोळत होती. तेथून तो स्वदेशीं परत आल्यावर प्रथम त्या ठिकाणाकडे गेला, व पाहातो तों त्याला तेथें विपुल सोनें सांपडलें. लवकरच ही बातमी कर्णोपकर्णीं पसरून, परदेशांहून झुंडीच्या झुंडी सोन्याच्या आशेनें ऑस्ट्रेलियांत येऊं लागल्या. प्रथम प्रथम पुष्कळांना सहज सोनें मिळालें; पण पुढें पुढें तें खोल जागीं शोधावें लागल्यानें पुष्कळांची निराशा झाली. कांहीं लोक सोनें घेऊन येत असतां, वाटेंत त्यांस चोरांनीं लुटून त्यांची संपत्ति हरण केली. पुष्कळांच्या जवळ परत स्वदेशी जाण्यापुरतेंहि भाड्यास पैसे शिल्लक न उरल्यानें, नवीन देशांतच राहावें लागलें. अशा रीतीनें या देशांत वस्ती वाढूं लागली.

सुरवातीस कांहीं जणांना ४,००० पौंड किंमतीचे गटच्यागट मिळाले. सर्वच लोकांच्या डोक्यांत सोन्याचें वेड शिरल्यानें, शेतकीकडे दुर्लक्ष झालें. पीक थोडें आलें, म्हणून पदार्थांच्या भलत्याच किंमती वाढल्या; पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. कारण एकदां पृष्ठभागाजवळ सोनें सांपडेनासें झाल्यावर, पुष्कळांनीं हा उद्योग सोडून दिला, व लवकरच तेथील स्थानिक सरकारनें हे भाग आपल्या ताब्यांत घेतले.

१८५२ सालीं व्हिक्टोरिया परगण्यांत सोनें सांपडलें, व वस्ती झपाटयानें वाढूं लागली.

अंतर्भागाचा शोध व सोन्यांच्या खाणी, यांशिवाय वस्ती वाढण्यास तिसरें कारण म्हटलें म्हणजे, मेंढ्या बाळगण्यास अनुकूल परिस्थिति हें होय. नील पर्वत (Blue mount) ओलांडून पलीकडील भागांत गेल्यावर, गवतानें भरलेलीं विस्तीर्ण कुरणें प्रवाशांना आढळलीं. त्या ठिकाणीं मेंढ्यांची चांगली वाढ करितां येईल अशी त्यांना पूर्ण खात्री वाटली, व हा धंदा हळूंहळूं आस्ट्रेलियांत मूळ धरूं लागला. हल्लीं तर × नलिका–कूपांच्या साहाय्यानें रुक्ष प्रदेशांतसुद्धां पाण्याचा भरपूर पुरवठा होऊन, मेंढ्यांची संख्या अतिशय वाढली आहे. ह्या धंद्यांत ऑस्ट्रेलियाची बरोबरी एकहि देश करूं शकणार नाहीं. या धंद्याच्या निमित्तानें पुष्कळ लोक ऑस्ट्रेलियांत आले, व लोकवस्तींत भर पडली.

अशा रीतीनें वस्ती वाढूं लागल्यावर परस्परांत दळणवळण ठेवण्याची मोठी अडचण वाटूं लागली. तेव्हां निरनिराळ्या वसाहतींत रेल्वे रस्ते बांधण्यांत आले, व या नवीन साधनानें निरनिराळ्या भागांत सुलभतेनें प्रवास होऊं लागून, अन्तर्भागांकडेहि लोकवस्तीचा ओघ वळला.

तथापि मध्यभाग रुक्ष व ओसाड असल्यानें, तेथें कोणत्याहि प्रकारची वसाहत होणें आज शक्य दिसत नाहीं. हिंदुस्थानच्या दुपटीएवढ्या या विस्तीर्ण देशांत जर मध्यभाग राहण्यास सोयीचा असता, तर आज आस्ट्रेलियाची वस्ती किती तरी पटींनीं वाढली असती. पण आज मितीस, एवढ्या आस्ट्रेलियाखंडांत विस्ताराशीं लोकवस्तीचें व्यस्त प्रमाण आहे असें दिसून येतें. आस्ट्रेलियाची सर्व वसाहत, किनाऱ्या किनाऱ्यानें वसली असून, आणखी थोडा अन्तर्भाग वस्ती होण्यास योग्य असा आहे

× नलिकाकूप = आर्टेजियन वेल्स (Artesian wells).

सारांश, कैद्यांची रवानगी, सोन्याच्या खाणींचा शोध, अन्तर्भागाचा धाडशी प्रवाशांनीं लाविलेला शोध व रेल्वेरस्त्यांची वाढ, या कारणांनीं आस्ट्रेलियांत लोकवस्ती झपाट्यानें पसरूं लागली.

१७८८ सालीं प्रथम १००० कैदी पाठविले. १८५१ सालीं सोन्याची खाण सांपडल्यावर आस्ट्रेलियांत ३,५०,००० पर्यंत वस्ती वाढली. हल्लीं आस्ट्रेलियांत ७५ लक्षांपर्यंत वस्ती आहे.

या खंडांत मूळच्या काळे लोकांची वस्ती २ लक्षांहून जास्त नाहीं. हे लोक संस्कृतीच्या बाबतींत आफ्रिकेंतील नीग्रोहूनसुद्धां मागासलेले आहेत. शेती वगैरे अंगमेहनतीचीं कामें करण्यापलीकडे यांना फारसें महत्व नाहीं. दारू, आपसांतील भांडणें व सांथीचे रोग, यांनीं यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.

प्रथम युरोपियन लोक या देशांत आले, तेव्हां येथील मूळच्या लोकांची राहणी रानटी होती. ते शिकार करून कच्चे मांस खात, दगडी व लांकडी हत्यारें वापरीत, व जवळ जवळ उघड्यावर राहत. या लोकांचें **बूमरँग** नांवाचें लांकडी हत्यार सावजावर फेंकून मारलें असतां आपोआप मारणाराकडे परत येतें.

आस्ट्रेलियांत प्रथमतः कैदी पाठवून १७८८ सालीं वसाहतीस सुरुवात झाली. तदनंतर टास्मानिया (१८०४) क्वीन्सलँड (१८२६) पश्चिम-आस्ट्रेलिया (१८२९) व्हिक्टोरिया (१८३४) दक्षिण आस्ट्रेलिया (१८३६) या वसाहती वसत गेल्या.

१८४२ सालापर्यंत या वसाहतींना विशेष हक्क मिळाले नाहींत. पण १८४० नंतर, कानडाला जबाबदार व्यवस्था देण्याची योजना मुक्रर झाल्यावर तेंच धोरण आस्ट्रेलियासंबंधीं अमलांत आणणें भाग पडलें. लोकनियुक्त सभासद जास्त प्रमाणानें निवडण्याचा हक्क मिळाला. या सर्व

वसाहती एकमेकांपासून हळूहळू स्वतंत्र झाल्या, व १८५४ ते ५६ च्या दरम्यान न्यू साउथवेल्स, टास्मानिया, व्हिक्टोरिया व दक्षिण आस्ट्रेलिया या वसाहतींना स्वतंत्र राज्यव्यवस्था मिळाली. या व्यवस्थेनें मतदारांची संख्या वाढली. इंग्लंडप्रमाणें प्रत्येक वसाहतीस दोन सभागृहें मिळालीं, व लोकनियुक्त प्रधानमंडळाच्या हातांत सर्व सत्ता आली.

वरील वसाहतीनंतर, लवकरच क्वीन्सलँड या वसाहतीस स्वतंत्र हक्क मिळाले. पण पश्चिम आस्ट्रेलियाला १८९० पर्यंत जबाबदार राज्यव्यवस्था मिळाली नाहीं. स्वतंत्र व्यवस्था मिळाली, तरी प्रत्येक संस्थान स्वार्थी हेतूनें प्रेरित झाल्यामुळें, आपल्या हितासाठीं जवळच्या संस्थानास बाधक अशीं व्यापारविषयक व इतर बंधनें घाली, त्यामुळें एकोपा राहत नसे. त्यांना सर्वांचा एक संघ करावा ही कल्पना पटत नसे; पण सोनारानें कान टोंचावा लागतो ' या म्हणप्रमाणें, १८८४ सालीं पॅसिफिक महासागरांतील बेटें वगैरे घेण्यास जर्मनीनें सुरुवात केली, तेव्हां आपला विस्कळितपणा आपणांस घातक झाल्यावांचून राहणार नाहीं, अशी सर्वांची खात्री पटली, व आस्ट्रेलियन संस्थानांचा एक संघ बनविण्याविषयीं सर्वांनीं ब्रिटिश पार्लमेंटास विनंति केली. त्या विनंतीचा विचार होऊन, मान्यता मिळाली, व सन १९०१ सालीं, आस्ट्रेलियन संघाची पहिली पार्लमेंट हल्लींच्या बादशहांनीं—त्या वेळचे युवराज—उघडली. संस्थानांनीं सार्वजनिक हिताचीं सर्व खातीं या मध्यवर्ति संघ—सरकाराकडे सोंपवून दिलीं. अशा रीतीनें हल्लींचें आस्ट्रेलियन राष्ट्र बनलें आहे.

या संघाचें सरकार निर्माण करतांना दोन अटी घालण्यांत आल्या.

(१) प्रत्येक संस्थानाचें स्वातंत्र्य कायम राहावें.

(२) मध्यवर्ति सरकारास वाजवीपेक्षां जास्त हक्क असूं नयेत.

येथील संस्थानांनीं आपल्या मूळच्या हक्कांपैकीं जरूर तेवढे अधिकार मध्यवर्ति सरकारास तोडून दिले आहेत. यांशिवाय बाकीचे हक्क संस्थानांचे

समजले जातात. या देशावर गव्हर्नर जनरल हा अधिकारी इंग्लंडहून नेमून येतो, व प्रत्येक संस्थानच्या गव्हर्नरचीहि नेमणूक अशीच होते. मध्यवर्ति सरकारची (१) सेनेट व (२) हाउस् ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज् (लोकसभा) अशीं दोन मंडळें असून, लोकसभेंतून प्रधानमडळ निवडलें जातें. या दोन्ही सभांत लोकांचेच प्रतिनिधि निवडून येतात. त्यांची संख्या अनुक्रमें ३६ व ७५ आहे. सेनेटमध्यें प्रत्येक संस्थानांतून ६ सभासद पाठवितात. असे सारखे सभासद पाठविण्यांत संस्थानांचा दर्जा सारखा आहे, हें तत्व दर्शविण्याचा हेतु असतो. लोकसभेंत लोकसंख्येवर* प्रतिनिधींचें प्रमाण अवलंबून असतें. या देशांत वयांत आलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषास मत देण्याचा अधिकार आहे. अशाच प्रकारची राज्यव्यवस्था संस्थानांतून असते; पण गव्हर्नर जनरलच्याऐवजीं तेथें गव्हर्नर असतो इतकेंच.

मध्यवर्ति सरकारकडे (१) परदेशांशीं व्यापारविषयक वाटाघाट, (२) सैन्य व आरमार, (३) तारायंत्र, पोस्ट व टेलिफोन, (४) नाणीं पाडणें, (५) आगगाड्या, हीं खातीं सोंपविलेलीं असतात. व संस्थानिक अगर प्रांतिक सरकारकडे (१) जमीन, (२) शेती, (३) अन्तर्गत उद्योग-धंदे, (४) स्थानिक स्वराज्य, (५) पोलीस, (६) शिक्षण, (७) तुरुंग, व (८) कर्ज या बाबी सोंपविलेल्या असतात.

अशा प्रकारें मध्यवर्ति व प्रांतिक सरकारची आस्ट्रेलियांत मांडणी झाली आहे.

---

* ५०००० लोकांस एक प्रतिनिधि हें निवडणुकीचें प्रमाण आहे.

न्यूझीलंड.

हें बेट आस्ट्रेलियाचे पूर्वेस १२०० मैलांवर आहे. कॅपटन् कुक् यानें, हें दोन बेटें मिळून बनलें आहे, असें ठरविलें. १७६९ सालीं पाहिल्या पर्यटनाचे वेळीं, त्यानें या बेटाचा इंग्लंडच्या राजाच्या नांवानें ताबा घेतला. या बेटाचा विस्तार हिंदुस्तानातील एका मोठ्या प्रांताएवढा असला, तरी लोकसंख्या कलकत्ता शहराहून जास्त नाहीं.

या बेटांतील मूळच्या लोकांना ' मेओरी ' म्हणतात. हे लोक हुशार, उद्योगी, धाडसी व दर्यावर्दीपणांत कुशल आहेत. या लोकांची बहुतेक वस्ती उत्तरेकडील बेटांतच जास्त आहे.

या बेटाचा शोध लागल्यावर या समुद्रांत मासे मारण्यास येणारे युरोपियन लोक किनाऱ्यावर वसाहत करूं लागले. त्यामुळें मेओरी लोकांशीं त्यांच्या झटापटी होऊं लागल्या.

पुढें १८४० च्या सुमारास, फ्रेंच लोक या बेटाचा ताबा घेतील या भीतीनें, इंग्लंडनें हें आपल्या ताब्यांत घेतलें, व लॉर्ड ग्रे यास तेथें गव्हर्नर नेमिलें. बेटांतील जमिनी मिळविण्याच्या बाबतींत, युरोपियन लोकांच्या, मेओरी लोकांशीं चाललेल्या झटापटींना त्यानें बराच आळा घातला. तथापि मेओरी लोकांत युरोपियन वसाहतवाल्यांबद्दल बराच असंतोष पसरून त्यांनीं बंड केलें. तें १८३९ सालापर्यंत चालूं होतें; पण तें शेवटीं लॉर्ड ग्रे याच्या शहाणपणानें मोडलें. हल्लीं युरोपियन वस्ती बहुतेक दक्षिण बेटांतच जास्त आहे.

१८४० सालीं ऑकलंड व वेलिंगटन, १८४८ त डुनेडिन् व १८५० सालीं ख्राइस्टचर्च येथें वसाहती झाल्या, व लवकरच त्या भरभराटीस येऊं लागल्या.

कानडाप्रमाणें उदारपणाचें धोरण स्वीकारून इंग्लंडनें १८५२ सालीं, या प्रांताला थोडी स्वतंत्र व्यवस्था दिली. १८७५ सालीं अन्तर्व्यवस्थेंत जास्त

सुधारणा होऊन, खेडोपाडीं लहान लहान स्थानिक संस्था निर्माण झाल्या. १९०७ सालीं आस्ट्रेलियाप्रमाणें या बेटांस पूर्ण जबाबदार व्यवस्था देण्यांत आली.

या बेटाला आग्नेयीकडील इंग्लंड म्हणतात, कारण लोकसंख्येशिवाय, या वसाहतीचें इंग्लंडशीं बरेंच साम्य आहे. हें बेट ऑस्ट्रेलियांत सामील होण्यास कबूल नाहीं.

न्यू फाउंडलंड हें बेट जसें कानडापासून अलग राहूं इच्छितें, त्याप्रमाणेंच येथील लोकांनाहि ऑस्ट्रेलियनसंघांत सामील होण्याची इच्छा नाहीं.

इंग्लंडप्रमाणें येथें मुख्य दोन मंडळें आहेत. त्यांस ' कौंसिल ' व ' हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज् ' (प्रतिनिधि सभा) अशीं नांवें आहेत. या देशावर इंग्लंडचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नरची नेमणूक होते; पण प्रतिनिधी-सभेंतून निवडलेल्या प्रधानमंडळाच्या तंत्रानें सर्व राज्यकारभार चालतो.

येथील कायदेकौंसिलांत ४६ सभासद असून त्यांची नेमणूक गव्हर्नर करतो. या सभेची मुदत ७ वर्षांपुरती असते. लोकसभेंत (हाउस-ऑफ-रेप्रेझेंटेटिव्हज्) ८० सभासद असून त्यांची ३ वर्षांपुरतीच निवडणूक असते. लोकसभेंतून प्रधानमंडळाची निवड होऊन, त्यांत मेओरी लोकांचा एक प्रतिनिधी घेतात. कायदेकौंसिलांत २ व लोकसभेंत ४ मेओरी सभासदांची निवड होते. या लोकांची बहुतेक वस्ती उत्तरेकडील बेटांत असून, राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं त्या बेटाचे चार, व दक्षिणेकडील बेटाचे ५ राजकीय विभाग पाडले आहेत. या वसाहतींत स्त्रियांनाहि मतदानाचा हक्क देण्यांत आला आहे.

आफ्रिका खंड.

(सामान्य विचार.)

मागील भागांत स्पेन व पोर्तुगाल देशांनीं नौकानयनांत पुढाकार घेतल्याची हकीगत आलीच आहे. १५ व्या शतकाच्या सुरुवातीस पोर्तुगालचा राजा चौथा हेनरी, यानें आफ्रिकेचा पश्चिम किनारा शोधून काढण्यास सुरुवात केली. अशा प्रवासांत, कच्चा माल व नीग्रो गुलाम यांची प्राप्ति होऊन, त्यापासून पोर्तुगाल देश संपन्न करितां येईल अशी त्याची कल्पना होती. अमेरिकेचा शोध लागल्यावर तेथें स्पेनचा अमल प्रस्थापित झाला, व तेथील लागवडीसाठीं गुलामांची जास्त जरुरी भासूं लागली. गुलाम आफ्रिकेंतून पैदा होत असून, तो प्रदेश पोर्तुगीजांच्या ताब्यांत असल्यानें, या व्यापारापासून त्यांना चांगली पैदास झाली.

१५८८ सालीं स्पेनच्या आरमाराचा इंग्लंडनें पाडाव केल्यावर, अटलांटिक महासागराचा मार्ग सर्व युरोपियन राष्ट्रांना मोकळा झाला. हळूंहळूं या व्यापारांत इंग्लंडचा शिरकाव झाला. १६४० पासून इंग्लंडनें या व्यापारांत जास्त लक्ष घातलें. १७ व्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमार्फत, आफ्रिकेंतून सुमारें २०००० नीग्रो गुलाम दरसाल अमेरिकन वसाहतींना पुरविले जात. गुलामांचा व्यापार फार किफायतशीर असल्यानें, त्याचा मक्ता आपल्याकडे ठेवण्याबद्दल युरोपियन राष्ट्रांत स्पर्धा सुरू झाली. १८०७ सालीं ब्रिटिश पार्लमेंट सभेंत नीग्रोंना स्वतंत्र करण्याचा कायदा पास होई-पर्यंत, हा हक्क इंग्लंडनें बजाविला.

अमेरिकन वसाहती भरभराटीस येण्याचें मुख्य श्रेय, या नीग्रो गुलामांनाच दिलें पाहिजे. नीग्रो लोकांना गुलाम करून, अमानुषपणानें वागविण्याची पद्धति नैतिकदृष्ट्या अहितकारक आहे, एवढेंच नव्हे, तर अर्थ-शास्त्रदृष्ट्याहि ती फायदेशीर होत नाहीं, असें पुष्कळ विचारी पुरुषांचें मत

बनत चाललें, व त्याचें वरील कायद्यांत रूपांतर झालें. हे प्रयत्न करणाऱ्या थोर पुरुषांत **वुइल्बरफोर्स** याचें नांव प्रमुख आहे.

या व्यापारांत इंग्लंडनें जरी स्वतःचा पुष्कळ फायदा करून घेतला, तरी त्यानेंच ही दुष्ट पद्धति नाहींशी करण्यांत पुढाकार घेतला. ही पद्धति नष्ट करण्याबद्दल, मालकांस अल्प मोबदला देण्यादाखल इंग्लिश पार्लमेंटनें २ कोटी पौंड मंजूर केले, यावरून ही गोष्ट सिद्ध होईल.

या गुलामांच्या व्यापारामुळें, आफ्रिकाखंडाच्या उत्तरेकडील भाग युरोपखंडास पुष्कळ दिवस माहीत होता. पण देशांतील प्रखर उष्णतामान, विस्तीर्ण वाळवंटें, क्रूर, विचित्र व भयंकर प्राणी, किनाऱ्यास समांतर पसरलेल्या लांबच लांब पर्वतांच्या ओळी, व खांडी नसलेला किनारा, हे स्वाभाविक अडथळे असल्यामुळें, १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत आंतील भाग अज्ञात राहिले.

या खंडांत मुख्यत्वेंकरून चार जातींचे लोक आहेत.

(१) **हॅमाइट्स्**—हे उत्तरेकडील भागांत आहेत.

(२) **सेमाइट्स्**—हे इजिप्त वगैरे भागांत फेल्ला ह्या नांवानें ओळखिले जातात.

(३) **नीग्रो**—हे सुदान प्रांतांत असून यांसच गुलाम करून विकीत

(४) **बँटू**—ही जात सर्वांत बलिष्ठ असून, आफ्रिकेच्या दक्षिण भागांत आहे. यापैकीं काफीर, झुलु, बसूटो या जाती प्रसिद्ध आहेत.

याशिवाय बुशमेन्, हॉटेंटाट वगैरे इतरहि कांहीं क्षुद्र जातींचे लोक आढळतात.

हल्लीं आफ्रिका खंडांत, ब्रिटिश साम्राज्यापैकीं पश्चिम, पूर्व व दक्षिण किनाऱ्यालगतच्या वसाहती, इजिप्त, मध्यआफ्रिकेंतील वसाहती वगैरे भाग येतात.

या भागांपैकीं सर्वांत जास्त महत्वाचा असा दक्षिण आफ्रिका हा भाग आपण प्रथम पाहूं.

दक्षिण आफ्रिका.

पोर्तुगीज खलाशी वास्को दि गामा, यानें १४९८ सालीं हिंदुस्तानचा शोध लावल्यापासून वाटेवरचें आफ्रिकेचें दक्षिण टोंक त्यांच्या हातीं राहिलें. तें सुमारें १५० वर्षे त्यांच्या ताब्यांत होतें. नंतर १६५२ सालीं डच लोकांनीं त्यांपासून तें जिंकून घेऊन, आपल्या खलाशांचें आश्रयस्थान बनाविलें. लांबच्या प्रवासांत खलाशांना भाजीपाला न मिळाल्यास स्कर्व्ही रोग होतो. या ठिकाणीं भाजीपाला लावण्याची चांगली सोय झाली. हा भाग डच लोकांच्या ताब्यांत सुमारें १५० वर्षेपर्यंत राहिला. त्यांपासून फ्रेंच *राज्यक्रांतीच्या काळांत हें ठिकाण इंग्लिशांनीं (१७९५ सालीं) जिंकून घेतलें. तें पुढें त्यांजकडेच कायम राहिलें.

इंग्लिशांच्या ताब्यांत हा भाग आल्यावर, मूळचे डच शेतकरी, येथें बरेच होते. हे गुलाम बाळगून शेती करीत, व तेथील मूळच्या रानटी लोकांशीं युद्धप्रसंग करावे लागल्यानें, निशाण मारण्यांत अतिशय पटाईत असत. हॉलंडहून येथें वारंवार येणाऱ्याजाणाऱ्या डच लोकांपेक्षां हे संस्कृतीच्या बाबतींत मागासलेले असल्यानें, त्यांस ते ' बूर ' उर्फ ' रानटी ' या नांवानें ओळखीत. पुढें येथील डच रहिवाशांना ' बोअर ' हें कायमचें नांव मिळालें. हा भाग डच ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत होता, तेव्हां ते म्हणतील ते जिन्नस पिकवून त्यांना कंपनीसच प्रथम विकावे लागत, व आपणांवर होणाऱ्या जुलुमाविरुद्ध त्यांची हॉलंडमध्यें दाद लागत नसे. त्यामुळें इंग्लिशांचा नवीन अम्मल सुरू झाल्यावर, त्यांना आपल्यावरचें दडपण निघाल्यासारखें वाटलें व या अंमलाखालीं ते खुषीनें राहूं लागले.

---

* १७८९ ते १८१५--फ्रेंच राज्यक्रांतीचा काल. वॉटर्लूच्या लढाईनें हिचा शेवट झाला.

या लोकांपेक्षां यांच्या जवळच्या गुलामांचीच संख्या फार मोठी होती. इंग्लिश–अंमल सुरू होण्यापूर्वी, यांनीं आपली वसाहत उत्तरेस ऑरेंज नदी-पर्यंत व पूर्वेस काफ्रेरिया प्रांतापर्यंत नेऊन भिडविली होती. त्यांजवर तेथील काफीर लोकांचे वारंवार हल्ले होत असत. या हल्ल्यांना तोंड देण्यासाठीं, इंग्लिशांनीं अलगोआ उपसागराजवळ एक नवीन इंग्लिश वसाहत स्थापन केली, व कांहीं इंग्लिश लोकांनीं झुलू राजाच्या परवानगीनें नाताळांत १८२१ च्या सुमारास वसाहत स्थापन केली.

प्रथमतः यांना इंग्लिश अम्मल सुखकर वाटला खरा; पण हळूं हळूं अनेक कारणांनीं, त्यांच्या मनांत असंतोष उत्पन्न होऊं लागला. गुलामांची सुटका करण्यासंबंधीं, १८३३–३४ च्या सुमारास इंग्लंडांत जें बिल पास झालें, त्यामुळें हा असंतोष फारच वाढला.

या गुलामांशिवाय बोअर लोकांना शेती करणें फार कठीण झालें असतें. तेव्हां गुलाम बाळगावयाचे असल्यास केप कॉलनी सोडून, उत्तरेकडील विस्तीर्ण प्रदेशांत वसाहत करावयास पाहिजे असें दिसूं लागलें. वरील कायद्याची इंग्लिशांनीं अंमलबजावणी सुरू केल्याबरोबर, बोअर लोकांच्या टोळ्या, मोकळ्या असलेल्या उत्तरेकडील प्रदेशांत वसाहत करण्यास निघाल्या. त्यांपैकीं कांहीं ऑरेंज प्रांतांत, कांहीं नाताळांत व कांहीं ट्रान्सव्हालांत गेल्या. पण नाताळांत इंग्लिश लोक त्यांच्या अगोदरपासून असल्यानें, त्यांना तो प्रांत सोडून जाणें जरूर झालें. ऑरेंज फ्री-स्टेट व ट्रान्सव्हाल या प्रांतांत राहून स्वातंत्र्याचा उपभोग घेत असतां, तेथील मूळच्या जातींजातींतील भांडणांत बोअर लोक पडूं लागले. पण हें धोरण इंग्लिश लोकांना पसंत पडलें नाहीं. त्यांनीं १८४८ सालीं ऑरेंज प्रांतावर आपला एक गव्हर्नर नेमून तेथील व्यवस्था आपल्या ताब्यांत घेतली.

यानंतर लवकरच काफीर लोकांनीं केप कॉलनीवर हल्ले सुरू केले, व गरीब जातींवर बसुटो लोक हल्ले चढवूं लागले. यांना आटोपतां आटोपतां

इंग्लिशांची पुरेवाट झाली. इंग्लिश व्यापारी व मिशनरी यांना मध्यआफ्रिकेंत जातांना बोअर लोकांपासून फार त्रास सोसावा लागे, म्हणून त्यांनीं पार्लमेंटकडे तक्रारी केल्या. पण वसाहतींपासून फायदा होण्यापेक्षां लढाया वगैरे कराव्या लागल्यानें तोटाच फार होतो, असा त्यावेळच्या प्रधान-मंडळाचा समज होता. म्हणून त्यांनीं बोअर लोक स्वतंत्र आहेत असें कबूल करून त्यांच्यापासून होणारा त्रास बंद केला व खर्च वांचविला. अशा रीतीनें १८५४ सालीं, ऑरेंज फ्रीस्टेट व ट्रान्सव्हाल या वसाहती पुनः स्वतंत्र ठरल्या.

पुढें १८६७ सालीं, बसुटो लोकांपासून बोअर लोकांनीं एक सुपीक खोरें हिसकावून घेतलें. त्यामुळें त्यांनीं ब्रिटिशांना विनंति करून आपला प्रदेश त्यांच्या ताब्यांत दिला. तसेंच, त्याच सालीं ऑरेंज फ्रीस्टेट वसाहतीच्या पश्चि-मेस ग्रीकालँड प्रांतांत, एका शेतकऱ्यास एक हिरा सांपडला. त्यावरून त्या प्रांतावर आपला हक्क आहे असें बोअर म्हणूं लागले. पण तें तेथील ग्रीका लोकांस न आवडून, त्यांनीं इंग्लिशांना आपल्या प्रदेशाचा ताबा घेण्याची विनंति केली. तेव्हां इंग्लिशांनीं तो प्रांत १८७१ सालीं आपल्या राज्यास जोडला. पुढें बोअर लोकांचें या बाबतींत झालेलें नुकसान, अल्पांशानें भरून द्यावें म्हणून इंग्लिशांनीं त्यांस ९० हजार पौंड दिले.

१८७८ नंतर ग्रीका, बसूटो व काफीर यांचा त्रास कमी झाला, पण नाताळच्या बाजूस झुलूंचा त्रास सुरू झाला.

बोअर लोकांच्या सरहद्दीजवळील एका प्रांतासंबंधीं वाद उपस्थित होऊन, ते व झुलू यांमध्यें लढाई सुरू झाली. पण अशा प्रकारें लढाई चालू असतां, बोअर सरकाराजवळ पैसा व सामुग्री यांची तूट पडली, व या लोकांशीं लढणें अशक्य होऊन त्यांनीं माघार घेतली. तेव्हां झुलूंचा जोर वाढूं नये म्हणून तें काम इंग्लिशांना हातीं घेणें जरूर पडलें. त्यांनीं ट्रान्सव्हाल प्रांतांत

ब्रिटिश अंमल धुकारला व झुलूंचा मोड केला. या कामीं त्यांना ५० लक्ष पौंड खर्च आला. पुढें त्यांनीं बोअर लोकांना ब्रिटिश अंमल पत्करण्यास सांगितलें, व स्वातंत्र्याचे हक्क देण्याचें कबूल केलें. पण त्यांस तें पटलें नाहीं. इंग्लंडांतहि वसाहती वाढविण्याच्या विरुद्ध पार्लमेंट सरकार असल्यानें, येथील इंग्लिश अधिकाऱ्यांना भरपूर सैन्य व सामान यांचा पुरवठा झाला नाहीं. त्यामुळें हातीं घेतलेलें काम अर्धवट टाकून, बोअर लोकांचें स्वातंत्र्य कबूल करावें लागलें. पण अशानें बोअर लोक चढेलपणानें वागूं लागले.

मध्यंतरीं ट्रान्सव्हालांत सोन्याच्या खाणी सांपडल्या. हिऱ्याच्या खाणींचा वर उल्लेख आलाच आहे. यामुळें पुष्कळ युरोपियन लोक व्यापार व खाणी या निमित्तानें या देशांत येऊन राहूं लागले. बोअर लोकांनीं यांस राजकीय हक्क दिले नाहींत, व त्यांची देण्याचीहि इच्छा नव्हती. या लोकांनीं आपापल्या देशांमार्फत येथें राजकीय हक्क मिळविण्याची खटपट केली, पण त्यांस यश आलें नाहीं. म्हणून या उपरे लोकांनीं (त्यांस 'ऊटलँडर्स' म्हणत) बंड करण्याचें ठरविलें, पण बेत फसला. पुढें इंग्लंडनें या बाबतींत जोराचा प्रयत्न केला, तरी यश न आल्यामुळें प्रकरण लढाईवर आलें, व १८९९ ते १९०२ पर्यंत युद्ध जुंपून बोअर लोक शरण आले. पुढें १९०७ सालीं केप कॉलनी, नाताळ, ऑरेंज फ्रीस्टेट व ट्रान्सव्हाल या चार वसाहतींचा एक संघ बनवून, त्यास पूर्णपणें अन्तर्गत स्वातंत्र्य देण्यांत आलें.

इंग्लिशांचा प्रतिनिधि म्हणून इंग्लंडहून येथें एक गव्हर्नर जनरल नेमून येतो. आस्ट्रेलिया व कानडाप्रमाणेंच येथेंहि दोन मंडळें आहेत. (१) सेनेट, व (२) लोकसभा. दुसऱ्या सभेंतून तेथील प्रधानमंडळ निवडलें जातें. सेनेटमध्यें ४० व लोकसभेंत १३० सभासद असतात. गव्हर्नर जनरल, दोन सभा व प्रधानमंडळ मिळून मध्यवर्ति सरकार झालें आहे.

चार संस्थानांवर गव्हर्नर जनरल चार कारभारी नेमतो. प्रत्येक संस्थानांत कायदेमंडळ असून, त्यांतून निवडलेल्या प्रधानमंडळाकडे खात्यांची व्यवस्था सोंपवितात. या संस्थानांकडे शिक्षण, शेतकी, स्थानिक स्वराज्य, रस्ते, पूल वगैरे बाबतींची व्यवस्था सोंपविलेली असते.

आस्ट्रेलिया व कानडाप्रमाणें या देशांत स्त्रियांना मतदानाचा हक्क नाहीं.

पश्चिम आफ्रिका.

हा भाग पोर्तुगालचा राजा चौथा हेनरी याच्या कारकीर्दींत शोधला गेला. ड्रेक व हॉकिन्स या इंग्लिश खलाशांनीं या किनाऱ्याच्या आश्रयानेंच स्पेनचीं गलबतें लुटलीं व अमेरिकेशीं गुलामांचा व्यापार सुरू केला. १५८० सालीं पोर्तुगाल देश स्पेनच्या ताब्यांत गेला, व १५८८ सालीं स्पेनच्या आरमाराचा पराभव झाला. त्यामुळें या किनाऱ्यावर इतर युरोपियन लोक उघडपणें वसाहती करूं लागले. १६१८ सालीं स्थापन झालेल्या एका इंग्लिश कंपनीनें गँबिया नदीवर व गोल्ड कोस्ट या भागांत एकेक किल्ला बांधिला. त्यांच्याबरोबरच फ्रेंच, डच व डेन्स यांनींहि तेथें व्यापारी ठाणीं स्थापिलीं. पुढें सलग प्रांत आपल्या ताब्यांत राहण्यासाठीं ब्रिटिशांनीं त्या देशांपासून हे भाग विकत घेतले.

हल्लीं इंग्लिशांच्या ताब्यांत गँबिया, सीरालियॉन, गोल्डकोस्ट व नायगेरिया हे चार प्रांत असून महायुद्धानंतर जर्मनीचें टोगोलँड व केमेरूनचा कांहीं भाग हे प्रांत मिळाले आहेत.

या चारहि भागांना मुख्य वसाहतींशिवाय उत्तरेकडील बाजूस मागाहून जास्त प्रांत जोडण्यांत आले; यांस संरक्षित वसाहती म्हणतात. ह्या चारही वसाहतींत मुख्य सत्ता गव्हर्नरच्या ताब्यांत असून, त्याचे मदतीस

कार्यकारी व कायदेमंडळें दिलेलीं आहेत, या मंडळांना विशेष हक्क नसतात. या पद्धतीस ' **राजशासित व्यवस्था** ' म्हणतात.

प्रथमतः गँबिया व गोल्डकोस्ट या वसाहतींत इंग्लिशांनीं व्यापारी वखारी घातल्या. कांहीं उदारधी इंग्लिशांनीं सीरालियॉन प्रांतांत गुलामगिरींतून मुक्त केलेल्या गुलामांची वसाहत स्थापन केली. त्यामुळें या प्रांताच्या राजधानीस फ्रीटाउन (स्वातंत्र्यनगर) हें अन्वर्थक नांव मिळालें.

नायगेरिया नदीच्या मुखाजवळील भागांत ब्रिटिश मिशनरी व व्यापारी यांचा उद्योग सुरू होता. पण १८८४–८६ च्या सुमारास फ्रेंच व जर्मन यांनीं, जेव्हां एकेक प्रांत काबीज करण्यास सुरुवात केली, तेव्हां या शर्यतींत मागें पडून चालणार नाहीं, असें इंग्लंडला स्पष्ट दिसूं लागलें, व या वसाहतींचा उत्तरेकडील भाग त्यानें आपल्या ताब्यांत घेतला.

अशा रीतीनें, वसाहतींस मागाहून जे भाग जोडण्यांत आले, त्या प्रांतांत कांहीं मूळचीं राज्यें होतीं. व कांहींत तद्देशीय लोकांच्या लहान लहान टोळ्या राहत होत्या. तेव्हां येथें मूळच्या वसाहतीप्रमाणें राजकीय व्यवस्था न करतां, तेथील कारभार पाहण्याचें काम तेथील लोकांवरच सोंपविलें. पण ते आपणांशीं राजनिष्ठ राहावे, त्यांनीं आपापसांत लढाया करूं नयेत व शत्रूस सामील होऊं नये एवढ्यापुरता बंदोबस्त केला आहे. मधून मधून देखरेख करण्यासाठीं आपला एक अधिकारी पाठवितात. अशा रीतीनें आपल्या हिंदुस्थानांतील संस्थानांवर नेमण्यांत येणाऱ्या रेसिडेंटप्रमाणें तेथील व्यवस्था बांधून दिली. अशा प्रकारच्या वसाहतीस ' **संरक्षित वसाहत** ' अगर प्रोटेक्टोरेट म्हणतात.

वरील चार भागांपैकीं सीरालिऑन प्रांतास शेरब्रो ही वसाहत; गोल्डकोस्टला अशंटी व नॉर्दर्न टेरीटरीज्; व नायगेरियास उत्तरेकडील प्रांत (नॉर्दर्न नायगेरिया) हे भाग मागाहून जोडण्यांत आले. यांसच ' **संरक्षित वसाहती** ' म्हणतात.

मूळ स्थापन झालेल्या वसाहतींत राजशासित व्यवस्था आहे.

या चारहि वसाहतींत पाऊस फार पडतो, हवा फार उष्ण असते व रोगराई फार आहे, म्हणून येथें अधिकारी वर्गाशिवाय इतर युरोपियन लोक फारसे राहूं इच्छित नाहींत.

पूर्व आफ्रिका.

या भागावर पुष्कळ दिवसांपासून अरब लोकांची सत्ता स्थापन झाली होती; पण कांहीं दिवस पोर्तुगीज लोकांनीं हा भाग जिंकून घेतला. पुढें त्यांची सत्ता खालावल्यावर, मुसलमान लोकांनींच आपला अंमल या भागावर बसविला. अरबस्तानांतील मस्कत येथील घराण्याची या प्रांतावर सत्ता स्थापन झाली होती. १८५६ सालीं येथील गादीसंबंधानें तंटे सुरू झाले, तेव्हां लॉर्ड कॅनिंग या हिंदुस्तानच्या गव्हर्नर जनरलनें मध्यस्थी करून तंटा मिटविला व तेथील दरबारांत इंग्लिशांचें वजन वाढलें.

या किनाऱ्यानें अरबस्तान व हिंदुस्तान या देशांशीं व्यापार चालू असे. दरबारांत इंग्लिश वर्चस्व असल्यानें, इकडील भाग आपल्या ताब्यांत घ्यावा, अशी इंग्लिशांना इच्छा झाली नाहीं; पण १८८४ च्या सुमारास, आफ्रिकेंतील निरनिराळे प्रांत ताब्यांत घेण्याची युरोपियन राष्ट्रांची धडपड सुरू झाली, व जर्मनीनें पूर्व किनाऱ्यांपैकीं कांहीं भाग आपल्या ताब्यांत घेतला, तेव्हां मात्र इंग्लिशांना स्वस्थ बसणें शक्य राहिलें नाहीं. त्यांचा या भागांतील प्रतिनिधी मॅक्केनॉन, यानें झांझीबारच्या सुलतानापासून राहिलेला उत्तर किनारा आपल्या ताब्यांत घेतला, व १७८८ सालीं पूर्व आफ्रिकन कंपनी स्थापन होऊन या भागाशीं व्यापार सुरू झाला. हळू हळू युगांडा-पर्यंतचा सर्व प्रदेश कंपनीच्या ताब्यांत आला. पुढें कंपनीला या प्रांतांत

लढाया वगैरे बाबतींत बराच खर्च झाल्यानें, सुव्यवस्था ठेवणें कठीण झालें व तिनें हा प्रांत १८९६ सालीं पार्लमेंट सरकारच्या ताब्यांत दिला.

त्यानंतर अन्तर्भागांत रेलवे रस्ता बांधला, व दळणवळण सुरू झालें. जर्मनीबरोबर तह होऊन सरहद्दी ठरल्या, व या प्रांताची भरभराट होऊं लागली. हा प्रांत हल्लीं इंग्लंडच्या वसाहत–मंत्र्याकडे सोंपविलेला आहे.

पूर्व आफ्रिका या भागांत हल्लीं केनया व त्याच्या ताब्यांतील किनाऱ्यालगतची संरक्षित वसाहत, झांझीबार बेट, युगांडा प्रांत, व महायुद्धानंतर इंग्लिशांना मिळालेला जर्मनीचा टॅंगानिका टेरिटरी हे भाग येतात.

केनया वसाहतींत इंग्लंडहून गव्हर्नर नेमून पाठवितात, त्याच्या मदतीस कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ अशा दोन सभा असून, कायदेमंडळांत कांहीं लोकनियुक्त सभासद असतात. या गव्हर्नरच्या ताब्यांत किनाऱ्यालगतची संरक्षित वसाहत असून, झांझीबार बेटांतील सुलतानांच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं येथून रेसिडेंट पाठविला जातो.

युगांडा प्रांतावर गव्हर्नर असून त्याला दोन मंडळें मदतीस दिलेलीं आहेत. टॅंगानिका टेरिटरीवरहि गव्हर्नर असून त्याच्या मदतीस सरकारनियुक्त कार्यकारी मंडळ दिलें आहे.

सारांश, या चारहि प्रांतांतील मुख्य वसाहतींत राजशासित व्यवस्था आहे असें दिसतें. या चारहि भागावर वसाहत–मंत्र्याचा ताबा असतो.

मध्य आफ्रिका.

(ऱ्होडेशिया-नियासालँड व बेचुआनालँड.)

दक्षिण आफ्रिकन संधाच्या उत्तरेस टँगानिका सरोवर व पूर्वेस नियासा सरोवर, येथपर्यंत पसरलेल्या भागास मध्य आफ्रिका म्हणतात. या भागांत बेचुआनालँडपैकीं उत्तरेकडील भाग, ऱ्होडेशिया, व नियासालँड हे भाग येतात.

केप कॉलनी सोडून बोअर लोक ऑरेंज फ्रीस्टेट व ट्रान्सव्हाल या प्रांतांत गेल्यावर, तेथें राहणाऱ्या लढाऊ पेशाच्या माताबेली लोकांना, त्यांनीं लिंपोपो नदीपार हांकून लाविलें. या उत्तरेकडील प्रदेशांत शांत वृत्तीनें राहणाऱ्या मशोना लोकांचीं गांवें उध्वस्त करून, ती जागा मातावेली लोकांनीं पटकावली, व या मशोना लोकांना आपले गुलाम बनविले.

१८८५ सालीं, बोअर लोकांच्या ताब्यांत नसलेल्या बेचुआनालँड या प्रदेशाचा इंग्लिशांनीं ताबा घेतला, तेव्हां त्यांची सरहद्द या मातावेली लोकांच्या हद्दीला येऊन भिडली. १८६५ सालापासून वसाहतींचा विस्तार न करण्याचें धोरण इंग्लिश सरकारनें स्वीकारलें होतें; पण १८८४-८६ च्या सुमारास फ्रान्स व जर्मनी, यांनीं आफ्रिकेंतील एकेक नवीन भाग घशांत टाकण्यास सुरुवात केली. हें पाहून आतां त्यांना स्वस्थ बसवेना; त्यांनीं दक्षिणेस बेचुआनालँड व पूर्व आफ्रिकेचा किनारा ताब्यांत घेतला. १८८०-१८८४ च्या दरम्यान इंग्लिश सरकार, द. आफ्रिका, इजिप्त, हिंदुस्तान या ठिकाणीं युद्धांत गुंतलें आहे, ही या राष्ट्रांनीं संधी साधून हळूहळू आपले पाय लांबविण्याचा प्रयत्न केला.

दक्षिण आफ्रिकेंतील प्रांतांत व्यापार करण्यासाठीं, इंग्लिशांनीं ' दाक्षिण आफ्रिका कंपनीस ' व्यापारी सनद दिली होती. या कंपनीच्या व्यवस्थापकां-

पैकीं सेसिलऱ्होडस् या नांवाचा एक हुशार व धोरणी माणूस होता. बेचुआनालँडच्या उत्तरेकडील विस्तीर्ण प्रदेशाचें खरें महत्व त्याच्या लक्षांत आलें. यावेळीं ट्रान्सव्हाल प्रांतांतील बोअर, हा प्रांत घेण्याचा विचार करीत आहेत, असें त्यास समजलें. तेव्हां क्षणाचाहि विलंब न करितां, त्यानें त्यांच्या अगोदर, इंग्लंडच्या नांवानें या प्रांताचा ताबा घेण्याचा विचार ठरविला; नंतर एका शूर सरदाराच्या हाताखालीं थोडेसे लढाऊ लोक देऊन ऱ्होडेशिया प्रांताचा ताबा घेतला.

हें ठिकाण हस्तगत झाल्यावर साधारण १८९५ पर्यंत, त्यांना येथील लढाऊ माताबेली लोकांशीं युद्धें करावीं लागलीं. त्यांचा पुढारी **लोबेंगुला** हा मरण पावल्यावर त्याचे अनुयायी शरण आले व सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली. अशा रीतीनें माताबेली लोकांच्या त्रासापासून, गरीब मशोना लोकहि कायमचे मुक्त झाले. **सेसिलऱ्होडस्** याच्या हुशारीनें हा प्रांत इंग्लंडला मिळाला, म्हणून या प्रांताला **ऱ्होडेशिया** हें नांव मिळालें.

या ऱ्होडेशिया प्रांताचे, झँबीझी नदीनें दोन भाग झाले आहेत. उत्तरेकडील उत्तर ऱ्होडेशिया व दक्षिणेकडील दक्षिण ऱ्होडेशिया.

दक्षिण आफ्रिकन कंपनी १८८८–८९ सालीं स्थापन झाली, तेव्हां तिजला २५ वर्षांची व्यापारी सनद दिली होती. ही मुदत १९१४ सालीं संपली. हे दोन भाग पूर्वीप्रमाणेंच अलग न ठेवतां, दोन्ही एकत्र करून, त्यांची राज्यव्यवस्था ठरवावी, असें कंपनीचें म्हणणें; पण दक्षिण ऱ्होडेशियाच्या लोकसभेस हें म्हणणें पसंत पडलें नाहीं. त्यामुळें त्यांची व्यवस्था अलग ठेवण्याचें ठरलें.

१९२२ सालीं, महायुद्ध संपल्यानंतर, ब्रिटिश पार्लमेंटनें दक्षिण ऱ्होडेशियास साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे हक्क दिले. उत्तर ऱ्होडेशियाची तितकी वाढ झाली नसल्यानें, त्या प्रांतावर कंपनीचाच ताबा आहे; पण तेथील कारभारी नेमतांना कंपनीला प्रधानमंडळाचा सल्ला घ्यावा लागतो.

बेचुआनालँड हा प्रदेश र्‍होडेशियाला लागून दक्षिणेस आहे. या प्रांताचा दक्षिणेकडील भाग केप कॉलनींत सामील करण्यांत आला आहे; पण उत्तरेकडील भागांत लहान लहान राज्यें आहेत. हे राजे आपल्या प्रांताची व्यवस्था पाहतात. पण त्यांजवर देखरेख ठेवण्यासाठीं ' रेसिडेंट ' नांवाचा अधिकारी नेमलेला असून, त्याची वसाहतमंत्र्याकडून नेमणूक होते.

या दोन भागांशिवाय नियासा सरोवराच्या पश्चिमेस त्याला लागून, एक दक्षिणोत्तर अरुंद पट्टी आहे, तिला नियासालँड असें म्हणतात. या प्रांतावर गव्हर्नर नेमिलेला असून, कार्यकारी व कायदेमंडळांतील सभासद सरकारनियुक्त असतात.

या तीन भागांपैकीं र्‍होडेशिया हा फार महत्वाचा भाग आहे. येथील हवा फार सौम्य असून, येथें विपुल खनिज संपत्ति आहे असें म्हणतात. हा प्रांत ब्रिटिश साम्राज्यास मिळवून देणाऱ्या, सेसिल र्‍होडस् या मुत्सद्याचें, इंग्लिश इतिहासकार आदरपूर्वक स्मरण करतात. हा थोर पुरुष १९०२ सालीं केप टाऊनजवळ मरण पावल्यावर, त्यास या प्रांतांतील माटोप्पो टेकडीवर पुरण्यांत आलें. तेव्हांपासून ती जागा दक्षिण आफ्रिकेंतील थोर पुरुषांच्या स्मारकाचीच जागा बनली आहे.

इजिप्त व सुदान.

आपण आतांपर्यंत दक्षिण, पश्चिम, पूर्व व मध्य आफ्रिकेंतील ब्रिटिश साम्राज्याचा विचार केला. आतां आपण राहिलेल्या एका महत्वाच्या भागाचा विचार करून आफ्रिकेची रजा घेऊं. तो भाग इजिप्त व सुदान प्रांत होय.

इजिप्त हा देश मुसलमानांच्या ताब्यांत आहे. येथील राजाला खेदीव म्हणतात. हा युरोपांतील तुर्की खलिफाचा मांडलीक असे, व स्वामित्वा-

बद्दल त्यास ७॥ लक्ष पौंड भरावे लागत. ही रक्कम दरसाल चुकती झाली, म्हणजे इजिप्तच्या अंतर्गत कारभारांत तुर्की सरकार बिलकूल हात घालीत नसे, व इजिप्तचा खेदीव हा स्वतंत्र राजाप्रमाणें राहात असे.

या खेदिवाच्या मनांत भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यांस जोडणारा सुएझचा कालवा खणण्याचें आलें. पण निरनिराळ्या इंजिनियरांनीं केलेल्या प्रयत्नांना यशःप्राप्ति झाली नाहीं. पुढें लेसेप्स नामक फ्रेंच इंजिनियरनें तो कालवा खणण्याची कल्पना बसविली. यापूर्वीं इजिप्तनें या कामासाठीं १,६०,००,००० पौंड खर्ची घातले होते.

हा कालवा इजिप्त देशाला फार फायदेशीर असल्यानें, तेथील खेदिवाच्या संमतीनें, हा कालवा खणण्याचें काम १८५९ सालीं सुरू होऊन, तें १८६९ सालीं संपलें. हें काम हातीं घेण्यापूर्वीं फ्रान्स व इजिप्त देशाच्या सरकारांत एक करार ठरला होता. त्याअन्वयें इजिप्त सरकारनें त्या कामीं लागणारे मजूर पुरविण्याचें कबूल केलें होतें. पण त्या कामांत हजारों मजूर मरण पावून, देशांतील लोकसंख्येवर अनिष्ट परिणाम होऊं लागला, त्यामुळें या अटीबद्दल, फ्रेंच सरकारास पैशाच्या रूपानें भरपाई करून देणें भाग पडलें.

या मोबदल्यादाखल बरीच रक्कम द्यावी लागल्यामुळें, इजिप्त देशाला कर्ज झालें. या कर्जाच्या फेडीसाठीं त्या सरकारनें पुष्कळ +शेअर्स विकावयास काढले. हा कालवा उघडला, त्या वेळीं इंग्लंडांत *डिझरायली नांवाचा मुख्य प्रधान होता. त्याला या शेअर्सची बातमी लागल्याबरोबर, त्यानें गुप्त रीतीनें ४० लक्ष पौंडांस १,७७,००० शेअर्स विकत घेतले. पुढें १८७९ सालीं इजिप्तच्या खजिन्यांत पैशाची तूट आली, व त्यांत सरकारचें दिवाळें वाजण्याची वेळ आली; तेव्हां इजिप्तमधील लोकांनीं गादीवर असलेल्या उधळ्या इसरायल पाच्छास पदच्युत करून, त्याचा मुलगा ट्यूफिक यास गादीवर

+ शेअर्स—भाग. * हा ज्यू होता.

बसविलें. इंग्लंड व फ्रान्स या देशांनीं बरेच शेअर्स घेतले असल्यामुळें, इजिप्तच्या आर्थिक बाबतींत लक्ष घालणें त्यांस जरूर वाटलें, व तेथील राज्य-व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठीं, इजिप्तच्या दरबारीं त्यांनीं **कंट्रोलर जनरल** या नांवाचे आपले दोन अधिकारी ठेविले. अशा रीतीनें इंग्लिशांनीं इजिप्तच्या राज्यव्यवस्थेंत लक्ष घातलें. पण परकीय लोकांची ही ढवळाढवळ इजिप्शियन लोकांना आवडली नाहीं. त्यामुळें त्यांच्यांत बराच असंतोष पसरला.

१८८२ सालीं, इजिप्शियन सैन्यांतील आराबी पाशा नांवाच्या एका अधिकाऱ्यास पुढारी बनवून, या लोकांनीं अलेक्झांड्रिया शहरीं (नाइलच्या मुखाजवळ) बंडाचें निशाण उभारलें. या बंडास भिऊन, फ्रान्सनें आपल्या कंट्रोलर जनरलास परत बोलाविलें, व इजिप्तविरुद्ध इंग्लंडला मदत करण्याचें नाकारलें.

या कालव्याचें इंग्लंडला साम्राज्याच्या दृष्टीनें फार महत्व असल्यानें, आराबी पाशा वागेल तसें त्यास वागूं देणें, व आपला जलमार्ग धोक्यांत ठेवणें, इंग्लंडला इष्ट वाटलें नाहीं. म्हणून फ्रेंच मदत करोत वा न करोत, हें बंड मोडण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेणें, इंग्लिशांस आवश्यक झालें.

लवकरच इंग्लंडनें युद्धाची तयारी केली, व 'सर बोचांप सीमूर' याच्या हाताखालीं आरमार देऊन, त्यास अलेक्झांड्रिया बंदराकडे रवाना केलें. त्यानें त्या शहरावर तोफांचा मारा करून, आराबीच्या ताब्यांतील किल्ले उडवून दिले, व लॉर्ड वोल्सले या सेनापतीनें जमिनीवर आराबीचा पूर्ण पराभव करून त्यास कैद केलें. अशा रीतीनें इजिप्तमध्यें इंग्लिशांची सत्ता प्रस्थापित झाली.

इजिप्तच्या खेदिवाच्या ताब्यांत सुदान हा प्रांत होता. इजिप्तमधील धामधूम बंद होते, तों या प्रांतांत बंड झालें. हा प्रांत उत्तरेस वाडीहाफा या ठिकाणापासून, दक्षिणेस युगांडा प्रांताच्या उत्तर सरहद्दीपर्यंत पसरला

आहे. या प्रांतांतील बगारा जातीच्या एका पुढाऱ्याच्या हातांत, सुदान प्रांताचा कारभार होता. त्यानें तेथील अरब लोकांना इजिप्तच्या अंमलाविरुद्ध बंड करण्यास चिथाविलें. त्यानें आपणांस ' महादी ' म्हणजे पुढारी ही पदवी धारण केली, व आपण मुसलमानांचा बारावा इमाम आहों, असें तो लोकांस सांगूं लागला.

या वेळीं इजिप्त इंग्लिशांच्या ताब्यांत आला होता. त्यांनीं हिक्सपाशा या इजिप्शियन सेनापतीच्या हाताखालीं ११,००० सैन्य देऊन, त्यास त्या बंडाचा मोड करण्यास पाठविलें. त्यानें कार्डोफोन प्रांतांतील एलओबीड या ठिकाणीं बंडवाल्यांस गांठलें. पण त्याचा पूर्ण पराभव करून बंडवाले थेट खार्टुम शहरापर्यंत चाल करून आले. तेव्हां इंग्लिशांनीं १८८५ त त्या कामावर जनरल **गॉर्डन** याची नेमणूक केली. हा प्रांत उजाड असल्यानें सैन्याचे फार हाल झाले. बंडवाल्यांच्या मानानें गॉर्डनचें सैन्य थोडें होतें, म्हणून त्यास खार्टुमच्या किल्ल्याचा आश्रय करावा लागला. त्याच्या मदतीस जनरल वोल्सले याची तुकडी रवाना झाली होती. पण तो येऊन पोंहोंचण्यापूर्वींच बंडवाल्यांचा जोर होऊन, किल्ला त्यांच्या ताब्यांत गेला व जनरल गॉर्डन मारला गेला. कांहीं वर्षें इंग्लिशांना सुदान प्रांताकडे लक्ष देण्यास सवड सांपडली नाहीं. कांहीं वर्षांनीं **लॉर्ड किचनेर** यानें सुदानी व इजिप्शियन सैन्य तयार करून, त्या प्रांतापर्यंत रेल्वे रस्ता बांधला व १८९६ सालीं २ वर्षांनीं त्या प्रांतावर हल्ला करून तो प्रांत १८९८ त जिंकून घेतला. अशा रीतीनें हा प्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत आला.

मध्यंतरीच्या काळांत, इजिप्तचा शेतकरी वर्ग करांच्या ओझ्याखालीं वांकून गेला होता. याशिवाय सरकारी बिगार व वेठ यामुळें त्रस्त झाला होता.

इजिप्तमध्यें शेतकरी वर्गच फार मोठा असल्यानें, त्यांचें दुःख हलकें करणें हें राज्यकर्त्यांचें मुख्य कर्तव्य होतें. तेव्हां त्या वेळचा इजिप्तचा गव्हर्नर **लॉर्ड क्रोमर**, यानें पीकपाणी भरपूर येऊन देशांत आबादानी व्हावी, म्हणून

नाइल नदीला असुअन येथें धरण बांधिलें व शेतांना पाणी देण्याची व्यवस्था केली. तसेंच योग्य न्याय मिळावा म्हणून तेथें न्यायकोर्टें स्थापन केलीं. अशा रीतीनें सुबत्ता होऊन शांतता नांदू लागल्यानें, तेथील शेतकरी वर्गांचे नवीन व्यवस्थेबद्दल धन्यवाद ऐकूं येऊं लागले.

१९१४ सालीं जर्मनीबरोबर इंग्लंडचें युद्ध सुरू झालें. तेव्हां तेथील सुलतान आब्बास हिल्मी, यानें जर्मनी व तुर्कस्थान यांचा पक्ष स्वीकारल्यामुळें, त्याचा चुलता हुसेन कामिल यास इंग्लिशांनीं इजिप्तच्या गादीवर बसविलें. तो १९१७ सालीं मरण पावल्यावर, त्याचे जागीं हल्लीं महमद फुअद याची नेमणूक केली आहे.

१९२२ नंतर इजिप्तला पूर्ण अंतर्गत स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे, व सुदान प्रांतावर इंग्लिश सरकारच्या संमतीनें इजिप्तचा खेदिव '**गव्हर्नर जनरलची**' नेमणूक करतो. त्यास सल्ला देणारें मंडळ सरकारी अधिकाऱ्यामधूनच निवडण्यांत येतें. या ठिकाणीं लष्करी कायद्याप्रमाणें कडक अंमलबजावणी होते. इंग्लिश व इजिप्शियन निशाणें एकत्र फडकत असतात. अंतर्गत कारभार पहाण्यास ब्रिटिश अधिकारी नेमले आहेत.

हिंदुस्तान.

आफ्रिका व अमेरिका या भागांत वसाहती सुरू असतां, हिंदुस्तान देशाचा मार्ग सांपडला होता, व तेथें पोर्तुगीज लोक येऊन व्यापार करूं लागले होते.

१५८० सालीं पोर्तुगाल देश स्पेनच्या अंमलाखालीं गेला. १५८८ त इंग्लिश आरमारानें स्पेनच्या अजिंक्य आरमाराचा पाडाव केल्यावर स्पेनबरोबरच पोर्तुगालचाहि पराभव झाला. या दोन सत्तांनीं हा वेळपर्यंत

अटलांटिक महासागर आपल्या ताब्यांत ठेविल्यामुळें इंग्लिश, फ्रेंच व डच या लोकांना हिंदुस्तानाशीं व्यापार करतां येत नव्हता; पण यानंतर जलमार्ग खुला झाला, व वरील लोक पोर्तुगीजांप्रमाणेंच हिंदुस्तानांत व्यापार करावयास आले.

या सर्व युरोपियन व्यापाऱ्यांची हिंदुस्तानांत विलक्षण व्यापारी चढाओढ चालूं असे. हे लोक जरी व्यापाराच्या निमित्तानें हिंदुस्तानांत आले होते, तरी त्यांचें इतर बाबींकडेही लक्ष असे. पोर्तुगीजांनीं व्यापाराबरोबरच धर्मप्रसाराकडे विशेष लक्ष दिलें. डच, व्यापाराकडेच लक्ष देत व त्यासाठीं त्यांना राजसत्ता पाहिजे होती. ते मसाल्याच्या व्यापारांत इतरांना हात घालूं देत नसत. इंग्लिश हे प्रथम केवळ व्यापारी पेशानें आले. धर्मप्रसार व राजसत्ता या दोन्ही बाबतींत ते उदासीन असत. पण पुढें राजसत्ता मिळविण्याची इच्छा, त्यांच्या मनांत फ्रेंच लोकांनीं उत्पन्न केली. फ्रेंच जरी व्यापारी नात्यानें आले होते, तरी त्यांस फ्रान्सच्या राजसत्तेचा पाठिंबा असल्यानें, अनुकूल परिस्थिति पाहून त्यांनीं राजसत्ता वाढविण्यास सुरुवात केली.

चारहि देशाचे लोक येथें प्रथमतः व्यापारी पेशानेंच आले, तरी त्यांच्या आकांक्षा कशा निराळ्या होत्या, हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल.

पहिलीं १०० वर्षें पोर्तुगीजांना आपला व्यापार निर्वेधपणें चालवितां आला. पुढें पोर्तुगीज सत्ता युरोपांत खालावल्यावर डच लोक इकडे आले; पण त्यांनीं हिंदुस्तानाशीं फारसा संबंध ठेविला नाहीं. सीलोन व मसाल्याचीं बेटें या भागांत त्यांनीं आपला अंमल बसविला. त्यांच्या मागून इंग्लिश आले. त्यांची व पोर्तुगीजांची सुरतेजवळ झटापट होऊन, इंग्लिश विजयी झाले व पोर्तुगीजांचें महत्व हळूहळू कमी होऊं लागलें. नंतर फ्रेंच आले. त्यांनीं व्यापारी धोरणाबरोबर येथील राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें, व आपणांस येथें सहज राज्यस्थापन करितां येईल असा सिद्धांत बांधिला.

१७४० ते १७५४ पर्यंत फ्रेंचांनीं या बाबतींत किती यश संपादन केलें, व दक्षिणेंतील राज्यांवर त्यांनीं आपला किती दरारा बसविला, हें पाहिलें, म्हणजे त्यांची अटकळ अगदीं बरोबर होती, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. पण येथील योग्य माहिती फ्रेंच सरकारास नसल्यानें व त्यांच्या शत्रूंनीं येथील कारभाराबद्दल फ्रान्सांत भलताच ग्रह पसरविल्यानें, फ्रेंच मुत्सद्यांनीं हिंदुस्तानांत उभारलेला राज्याचा डोलारा, आपला तोल संभाळूं शकला नाहीं. त्यांनीं स्थापन केलेल्या सिद्धांतांचा त्यांचे प्रतिस्पर्धि इंग्लिश यांनीं मात्र फायदा घेतला, व फ्रेंचांचा पाडाव करून 'निर्वीरमुर्वीतलं' अशी स्थिति झाल्यावर, येथील राजकारणांत हळूंहळूं आपला प्रवेश करून घेतला. नंतर पानिपतच्या लढाईनें मराठे व मोंगल ह्या दोन प्रमुख सत्ता जर्जर झाल्यावर, इंग्लिशांचा अंमल बसण्यास फारसा विलंब लागला नाहीं.

इंग्लिशांचें व्यापारी धोरण सुटून ते राजकीय धोरणाकडे कसे वळले ही हकीगत पाहूं.

सोळाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिनें लंडन येथील कांहीं व्यापाऱ्यास पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याची सनद दिली. येथें त्यांची इतर देशच्या युरोपियन व्यापाऱ्यांबरोबर चढाओढ सुरू झाली, व क्रमानें प्रत्येकाचा पाडाव होऊन इंग्लिश कंपनी यशस्वी झाली. तिनें प्रथम व्यापारासाठीं वखारी स्थापन केल्या. परचक्रांपासून व देशांतील धामधुमींपासून वखारींचं रक्षण व्हावें, म्हणून शिबंदी, दारूगोळा व तटबंदी यांची तजवीज केली. आपल्या ताब्यांतील प्रदेशांत आपलें नाणें सुरू करून न्याय देण्याची तजवीज केली. इतके प्रकार स्वतंत्र देशांत कधींहि चालूं शकत नाहींत. पण यावेळीं हिंदुस्तानांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नसल्यानें, ज्याला राज्य मिळविण्याची सधी सांपडेल तो फायदा घेत होता. सर जोशुया चाइल्ड या मुंबईच्या गव्हर्नरशिवाय कोणींहि राज्य मिळविण्यासंबंधीं पहिल्या १५० वर्षांत प्रयत्न केला नाहीं.

१७४४ नंतर फ्रेंचांनीं आपली सत्ता वाढविण्यास सुरुवात केल्यामुळें, त्यांची सत्ता वाढूं न देण्याबद्दल इंग्लिशांना प्रयत्न करावे लागले. पण हे प्रयत्न करण्यांत, आपला व्यापार कायम राहावा हेंच सुरुवातीस ध्येय होतें. पुढें दैवयोगानें बनाव चांगला बनत चालल्यावर, आपण होऊन चालत आलेल्या राज्यलक्ष्मीचा त्यांना स्वीकार करावा लागला !

इंग्लिशांच्या यशाची मीमांसा.

इंग्लिश कंपनी इंग्लिश व्यापाऱ्यांनीं स्थापन केली असून तिचे हिताहित-संबंध बघण्याचें काम लोकांकडेच असे. सनद देणें व तींत वेळोवेळीं फरक करणें या पलीकडे या कंपनीस राजाची मदत होत नसे. उलट, देशांतील उलाढाल्या व क्रांत्या यांच्या कचाट्यांत सांपडून कंपनीचें दिवाळें वाजूं नये, म्हणून निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांना भरपूर पैसे भरून खूष ठेवावें लागे. यामुळें राजघराणीं बदलून, क्रांति होवो, धार्मिक बाबतींत रणें माजोत, कंपनीला योग्य हक्क मिळण्याच्या बाबतींत कधींहि अडथळा आला नाहीं. कंपनीच्या नोकरांच्या दृष्टीपुढें, कंपनीचें व्यापारी हित संभाळणें ही मुख्य गोष्ट असे, व कंपनीच्या डायरेक्टरांकडून येणारी पैशाची मागणी पुरवली, म्हणजे इतर बाबतींत येथील परिस्थितीप्रमाणें वागण्यास ते पूर्ण मुखत्यार असत. अशा प्रकारचें स्वातंत्र्य असल्यानें, कंपनीच्या कारभारांत धाडसी माणसांची परंपरा निर्माण झाली. पुष्कळ वेळां डायरेक्टरांच्या मर्जीप्रमाणें न वागतां, येथील परिस्थिति ओळखून वागल्यानेंच, इंग्लिशांच्या राज्याचा विस्तार झाला असें इतिहासकारांचें म्हणणें आहे.

उलटपक्षीं, फ्रेंच कंपनी फ्रेंच सरकारनें स्थापन केली. कंपनीस लागणारी सर्व मदत राजाकडूनच होत असे. पण येथील बदलणारी परिस्थिति फ्रेंच सरकारास ताबडतोब कळत नसल्यामुळें, फ्रान्सहून सुटणारे हुकूम पाळणें हें पुष्कळदां कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें चुकीचें ठरे; त्यांतून एखाद्या माणसानें

येथील परिस्थिति ओळखून वागण्याचा विचार केल्यास, त्याजला परत बोलावण्यांत येई, व त्याच्या खऱ्या कामगिरीची योग्य जाणीव नसल्यानें, त्याजवर तुरुंगवास सोसण्याचा प्रसंग येई. ही गोष्ट डुप्ले, लाबरडोने व लाली यांच्या फ्रान्समधील हकीगतविरून लक्षांत येईल.

१८ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास फ्रान्स देश युरोपांत लढायांत गुंतला असल्यानें, तेथील सरकारांस हिंदुस्तानांतील कंपनीस वेळोवेळीं सैन्य व पैसा यांची भरपूर मदत करतां येणें शक्य नसे, व त्यामुळें येथील अधिकाऱ्यांना सोन्यासारखे प्रसंग हातचे घालवून, अपयश पदरांत घ्यावें लागे. कंपनीसाठीं सरकारचा पैसा खर्च होत असल्यानें, येथील फ्रेंच नोकर खर्चाच्या बाबतींत बेफिकीर असत, व कामगिरीबद्दल काय बक्षिस मिळतें हें समजल्यानंतर, स्वतःच्या धडाडीनें काम करण्याची कोणांतच हौस उरत नसे. यांशिवाय आरमाराच्या बाबतींत इंग्लिशांच्या मानानें फ्रान्सची बाजू अगदींच लंगडी होती. या सर्व गोष्टींचा विचार करतां, फ्रान्सला यश न मिळतां तें इंग्लंडच्या वांट्याला कां गेलें याचा अंदाज करतां येईल.

सारांश, दोन्ही कंपन्यांची उभारणी भिन्न तत्त्वांवर झाल्यानें इंग्लिश कंपनीस यश मिळालें.

साधारणपणें ब्रिटिश सत्तेचे हिंदुस्तानांतील वाढीच्या दृष्टीनें तीन मुख्य भाग पडतात. पहिलीं १५० वर्षें व्यापारी धोरण, पुढील शंभर वर्षें राज्यप्राप्तीसाठीं प्रयत्न व तेथपासून आतांपर्यंत शांततेची राज्यव्यवस्था.

पहिल्या दीडशें वर्षांच्या काळांत इंग्लिश लोकांचें आपल्या व्यापाराकडे विशेष लक्ष असे. या काळांत येथील मालाच्या वखारींवर प्रेसिडेंट हा अधिकारी असून त्याच्या हाताखालीं (१) मर्चंट, (व्यापारी) (२) फॅक्टर, (दुकानदार) व (३) रायटर, (कारकून) अशा प्रकारचे नोकर असत. कंपनीच्या नोकरांनीं शिस्तीनें वागण्याबद्दल कडक नियम केलेले असत.

कंपनीनें १६०० ते १७०० पर्यंत मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणीं मुख्य ठाणीं स्थापन केलीं होतीं.

१७४० नंतर डुप्लेनें सुरू केलेली राजकीय उलाढाल लक्षांत घेऊन, आपण कांहींतरी हातपाय हलविल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें पाहून इंग्लिशांना युद्धांत पडावें लागलें व यांतहि प्रथमतः व्यापाराची सुस्थिति राहावी हाच उद्देश होता. पुढें क्लाइव्हसारखे वीर निर्माण होऊन, त्यांनीं एकंदर कारभाराला नवीनच वळण लावलें, व १७५७ सालच्या प्लासीच्या लढाईनें इंग्लिशांची सत्ता बंगाल प्रांतांत व नंतर इतर प्रांतांत दृढमूल झाली. १७६० मध्यें बांदिवाशच्या लढाईनें फ्रेंचांच्या सत्तेचें उच्चाटन झालें, व या लढायांच्या खर्चानें कंपनीस बरेंच कर्ज झालें.

तेव्हां कंपनीनें मदतीसाठीं पार्लमेंटकडे विनंतिअर्ज पाठविला. त्याचा विचार होऊन कंपनीची मागणी पार्लमेंटनें कबूल केली; पण कंपनीच्या कारभारांत अव्यवस्था आहे असें त्यांना आढळून आलें. तेव्हां अशी अव्यवस्था होऊं नये, म्हणून त्यांनीं १७७३ सालीं रेग्युलेटिंग ॲक्ट नांवाचा कायदा पास करून, कंपनीच्या कारभारावर आपली देखरेख असण्याची व्यवस्था केली. दर २० वर्षांनीं कंपनीनें पार्लमेंटाकडून सनद बदलून घ्यावी, असें एक त्या कायद्यांत कलम होतें. त्यामुळें पार्लमेंटास हळूहळू कंपनीकडून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचें एक साधनच मिळालें, व १८५८ सालीं, बंडाच्या निमित्त कारणानें, पार्लमेंट सरकारनें हिंदुस्तानांतील सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली.

१७५७ सालापासून १८५८ सालापर्यंत साधारणतः सर्व हिंदुस्तानभर कंपनीचा अंमल स्थापन झाला होता.

१८५८ सालापासून आतांपर्यंत सरहद्दीवरील कांहीं किरकोळ युद्धांखेरीज हिंदुस्तानाला स्वाऱ्यांपासून त्रास झाला नाहीं. या काळाला सामान्य

लोकांत रामराज्य म्हणण्याचा त्यामुळेंच प्रघात पडला आहे. या काळांत देशांत हळू हळू इंग्रजी विद्येचा व सुखसाधनांचा पुष्कळ प्रसार झाला, व इंग्लंडच्या इतिहासाच्या अभ्यासानें, लोकांत राजकीय हक्कांची जाणीव उत्पन्न होऊं लागली.

या वर्षीं राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. यासच हिंदुस्तानची पहिली राजकीय सनद म्हणतात. या जाहीरनाम्यांत इतर अटी आहेत. पण सामान्य लोकांच्या हक्कांच्या दृष्टीनें, एकच कलम महत्वाचें आहे. तें कलम पुढें दिल्याप्रमाणें, ' लोकांचा धर्म व आचारविचार यांत कसलीहि ढवळा-ढवळ केली जाणार नाहीं ! व जात आणि धर्म लक्षांत न घेतां, केवळ व्यक्तींच्या लायकीप्रमाणें, सरकारी नोकऱ्या दिल्या जातील. '

यानंतर, १८६१ सालीं, पार्लमेंटनें नवीन कायदा केला. या कायद्यानें हिंदुस्तानाविषयक कायदे करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलच्या कौंसिलास देण्यांत आला. या कौंसिलांत कार्यकारी सभासदांशिवाय थोडे इतर सभासद नेमून घेण्याची त्यास परवानगी मिळाली. तसेंच मुंबई, मद्रास, बंगाल व अयोध्या–आग्रा या चार इलाख्यांत प्रत्येकीं एकेक कायदेमंडळ स्थापन करण्यांत आलें; पण सर्व सभासद सरकारनियुक्तच असावे असें ठरलें. हा राजकीयदृष्ट्या पहिला हप्ता होय.

१८८२, सालीं गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांनीं लोकांच्या वाढत्या महत्वाकांक्षा तृप्त करण्यासाठीं, ' स्थानिक स्वराज्याचें ' थोडेसे हक्क दिले व लोकसत्तात्मक शिक्षण मिळविण्याची तरतूद केली.

यानंतर लवकरच १८८५ सालीं, कांहीं उदारधी इंग्रज गृहस्थांच्या नेतृत्वाखालीं, राजकीय हक्क मागण्यासाठीं हिंदी लोकांनीं ' कॉंग्रेस ' नांवाची सभा स्थापन केली, व वेळोवेळीं निरनिराळे ठराव पास करून, आपल्या वाढत्या राजकीय आकांक्षांची सरकारास जाणीव करून देण्यास सुरुवात केली. अशी

सुरुवात केल्यावर १८९२ सालीं वरिष्ठ व प्रांतिक कौंसिलांत जास्त सभासद नेमण्याची सरकारनें व्यवस्था केली. अशा रीतीनें मर्यादित स्वरूपांत कां होईना, पण लोकांना अल्पसा राजकीय हक्कांचा दुसरा हप्ता मिळाला. या वेळीं नेमण्यांत येणारे सर्व सभासद, सरकारी अगर सरकारनियुक्तच असत, व प्रश्न विचारण्याच्या बाबतींत बरेच निर्बंध पाळावे लागत.

यापुढील राजकीय हप्ता १९०९ सालीं मिळाला. या सुधारणेचा कायदा पास झाला तेव्हां मोर्ले हे स्टेट सेक्रेटरी व मिंटो हे गव्हर्नर जनरल होते; म्हणून या सुधारणांस 'मोर्ले–मिंटो सुधारणा' म्हणतात. या हप्त्यानें कायदेमंडळांतील संख्या वाढली, प्रांतिक मंडळांत लोकनियुक्त प्रतिनिधींचें बहुमत झालें, मुख्य प्रश्नांना पुरवणीप्रश्न विचारतां येऊं लागले व कार्यकारी मंडळांतहि लोकपक्षीय प्रतिनिधीसाठीं एक जागा राखून ठेवण्यांत आली. या कायद्यानें पूर्वीपेक्षां बराच मोठा हप्ता लोकांच्या पदरांत पडला, तरी लोकांच्या आकांक्षाहि फार जोरानें वाढत गेल्यामुळें, त्यांना हा हप्ताहि अपुरा वाटला.

१९०९ नंतर आपणास लवकरच दुसरा हप्ता मिळणार असेल, अशी हिंदुस्तानांतील कोणाहि भविष्यवाद्याला कल्पना करतां आली नसती. पण १९१४ सालीं जें महायुद्ध सुरू झालें, त्या युद्धांत हिंदुस्तानानें इंग्लंड देशास अनंत हस्तांनीं १५० कोटि पौंडांची मदत केल्यामुळें, हिंदुस्तानची राजनिष्ठा कसोटीस लागली व त्या वेळच्या ब्रिटिश मुत्सद्यांस हिंदुस्तान देशाला जास्त हक्क देण्याचें आश्वासन जाहीर करणें अपरिहार्य झालें. अशा अकल्पित रीतीनें अवघ्या १० वर्षांच्या अंतरानें, हिंदुस्तानाला पुनः हप्ता मिळण्याची संधि आली.

या सुधारणा मिळाल्या त्यावेळीं स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यू हे असून गव्हर्नर जनरलचे जागीं लॉर्ड चेम्सफर्ड होते. त्यामुळें या सुधारणांस ' मॉंटफर्ड ' सुधारणा म्हणतात.

या कायद्यानें पूर्वीच्या व्यवस्थेंत बराच बदल झाला. इंडिया–कौन्सिलचा खर्च इंग्लंडच्या तिजोरींतून खर्ची पडूं लागला. प्रांतिक कार-

भारांत द्विदल पद्धति सुरू झाली. कायदेमंडळांत प्रतिनिधींची संख्या वाढली. पूर्वीपेक्षां बरेच जास्त प्रश्न विचारतां येऊं लागले. लोकनियुक्त प्रतिनिधींचें सर्व मंडळांत बहुमत झालें. सर्व खात्यांत हिंदी लोकांना जास्त जागा मिळण्याची योजना आंखण्यांत आली. स्थानिक कारभारांतहि जास्त विस्तृत अधिकार मिळाले व मतदानाचा हक्कहि जास्त विस्तृत करण्यांत आला. हे हक्क कसे वापरतां येतात तें पाहून, पुढील हक्कदान करण्यासंबंधीं योजना ठरविण्याची या कायद्यानेंच व्यवस्था केली आहे. तीस अनुसरून, पार्लमेंटनें येथील कारभाराच्या चौकशीसाठीं 'सायमन कमिशन' नांवाची कमिटी नेमली आहे, व त्या कमिटीच्या रिपोर्टावर हिंदुस्तानास पुढील हक्क मिळणें अवलंबून आहे.

अशा रीतीनें हिंदुस्तानांत आतांपर्यंत राजकीय हक्कांची वाढ झाली आहे.

इतर देश व वसाहती.

आपण ब्रिटिश साम्राज्याचे मुख्य भाग घेऊन त्यांचा शोध, वसाहत, वाढ व राज्यवस्था कशी आहे हें पाहिलें. पण त्या साम्राज्यांत मोठ्या घटकांचीं लहान भावंडें कोण कोण आहेत, व त्यांचा संसार कसा चालला आहे हें पाहावयाचें राहिलें आहे. तेव्हां आपण आतां या वसाहतींचे लहान मोठेपणावर भाग न पाडतां त्यांच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें वर्गीकरण करूं.

मागील भागांत जबाबदार, राजशासित व संरक्षित हे वसाहतींचे प्रकार आले आहेत; पण याशिवाय एकतंत्री, परावलंबी व कंपन्यांच्या ताब्यांत असणारे भाग आहेत. कांहीं भाग परराष्ट्रांपासून मुदतीनें व्यापारी व राजकीय सोयीसाठीं घेतले असून, ते अद्याप ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत आहेत. अशा प्रकारें मुख्यतः वसाहतींचे सात प्रकार आहेत.

मागील भागांत जबाबदार राज्यव्यवस्था असणारे प्रदेश आले आहेत; पण राजशासित व संरक्षित राज्यव्यवस्था असणारे सर्व देश आले नाहींत. या राजशासित वसाहतींत बहुतेक अधिकार गव्हर्नरच्या ताब्यांत असतात, व त्याजला दिलेलीं कार्यकारी व कायदेमंडळें बहुतेक सरकारी अगर सरकार-नियुक्त प्रतिनिधींचीं बनलेलीं असतात अशी व्यवस्था असणाऱ्या भागांना 'निर्भेळ राजशासित वसाहत' म्हणतात. पण कांहीं राजशासित वसाहतींतून अलीकडे लोकांना कांहीं प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला आहे. येथील गव्हर्नराला सल्लागार मंडळ दिलें असलें, तरी त्याला स्वतःच्या मनाप्रमाणें वाटेल त्या गोष्टी करतां येतात. अशा प्रकारच्या वसाहतींत सीलोनची गणना करतां येईल.

अशा प्रकारची व्यवस्था असणाऱ्या पश्चिम आफ्रिकेंतील चार वसाहती पूर्वीं आल्या आहेत. त्यांशिवाय सीलोन, हाँगकाँग, स्ट्रेट्स् सॅटलमेंट्स्, हाँडयूरस, ब्रिटिश गायेना, माल्टा, सायप्रस, मॉरिशस व वेस्ट इंडीजमधील कांहीं वसाहती यांतहि राजशासित राज्यव्यवस्था आहे.

बर्म्युडा, बाहामा व बॅरबॅडॉज् या वसाहती वर दिलेल्या वसाहतीं-प्रमाणें **राजशासित** वसाहती समजतात. परंतु त्या वसाहतींत कार्यकारी व कायदेमंडळाशिवाय **असेंब्ली** नांवाची तिसरी सभा असते.

दक्षिण आफ्रिकेंत बेचुआनालँड व बसूटोलँड, पश्चिम आफ्रिकेंतील सीरालिऑन जवळील शेरब्रोबेट, गोल्ड कोस्टच्या उत्तरेस अशंटी व नॉर्दर्न टेरिटरीज्, पूर्व आफ्रिकेंत किनाऱ्याजवळील केनया वसाहतीच्या ताब्यांतील लहान पट्टी, झांझीबार व पेंबा हीं बेटें, व सोमालीलँड, इजिप्तजवळील सुदान प्रांत, संयुक्त मलाया संस्थानें व न्यूगिनी हे सर्व भाग संरक्षित वसाहतींच्या सदरांत येतात.

या वसाहतींत विशेष प्रकारची व्यवस्था असते असें सांगण्यापेक्षां तेथील लोकांनीं कोणत्या गोष्टी करूं नयेत याबद्दल निर्बंध घातलेले असतात, असें म्हणणें जास्त सयुक्तिक होईल.

अशा ठिकाणीं तेथील लोकांची मूळचीच व्यवस्था होतां होईल तों कायम ठेवितात, व देखरेख करण्यासाठीं तेथें मुख्य वसाहत सरकारकडून रेसिडेंट अगर कमिशनर नेमतात. तेथील राजांनीं परराज्याशीं दळणवळण ठेवूं नये, ब्रिटिशांच्या संमतीशिवाय युद्ध अथवा तह करूं नये, आपापसांत लढूं नये, बाहेरून दारूगोळा वगैरे युद्ध सामुग्री आणूं नये, व क्रूरपणाच्या व अमानुष चाली बंद कराव्या, अशा प्रकारच्या अटी घातलेल्या असतात. या गोष्टींशिवाय, तेथील लोकांस त्यांच्या सोयीप्रमाणें कारभार चालविण्याची मुभा असते.

स्वतः होऊन ब्रिटिश सरकार त्या प्रांतांवर नवीन सुधारणा लादण्याचा प्रयत्न करीत नाहीं; पण जसजशी या वसाहतींत सुधारणा होत जाईल, तसतशी तेथें जास्त देखरेख ठेवण्याची व्यवस्था करतें. या वसाहतींची आपल्या देशांतील संस्थानिकांशीं कांहीं अंशीं तुलना करतां येईल.

कांहीं भागांची व्यवस्था अद्याप कंपनीकडे सोंपविलेली आहे. पश्चिम आफ्रिकन व पूर्व आफ्रिकन कंपन्या, यांनीं हिंदुस्तानांतील ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणें, आपलीं अधिकारसूत्रें पार्लमेंटच्या स्वाधीन केलीं; पण दक्षिण आफ्रिकन कंपनी व बोर्निओ कंपनी, यांच्या ताब्यांत अद्याप उत्तर ऱ्होडेशिया व उत्तर बोर्निओ हे प्रांत असून, तेथील व्यवस्था त्यांच्या मार्फत चालते. पण कांहीं दिवसांनीं या कंपन्यांकडून हे प्रदेश पार्लमेंट सरकार आपल्या ताब्यांत घेईल यांत शंका नाहीं. ऱ्होडेशियापैकीं पूर्वी कंपनीच्या ताब्यांत असणारा दक्षिण ऱ्होडेशिया याला, १९२२ सालीं स्वातंत्र्य दिल्याची हकीगत मागील भागांत आलीच आहे.

आतां पूर्ण परतंत्र वसाहतींचा विचार करावयाचा. या सदरांत जिब्राल्टर, सेंटहेलिना, एडन, असेन्शन हीं ठिकाणें येतात. येथें आरमाराच्या सोयीसाठीं सर्व व्यवस्था केली असून, अधिकारी लष्करी बाण्याचे नेमितात.

यांना त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांचें सल्लागार मंडळ असलें, तरी येथील गव्हर्नर हा आपले अधिकार अनियंत्रितपणानें वापरतो.

आतां हिंदुस्तानाचा विचार करावयाचा. या देशाला अलीकडे जरी थोडके हक्क मिळाले आहेत, तरी एकंदरीनें याजला परावलंबी देश (Dependency) म्हणतात. अद्याप येथील लोकांच्या हातांत राज्यव्यवस्थेसंबंधीं विशेष महत्वाचे अधिकार आले आहेत असें म्हणतां येत नाहीं; पण हळूंहळूं ते हक्क मिळण्याचा सुयोग येईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

वरील सर्व प्रकारांशिवाय, ब्रिटिश सरकारनें व्यापारी व राजकीय सोयीसाठीं, चीनसारख्या कांहीं देशांकडून थोडेसे भाग विकत अगर करारानें मिळविले आहेत. या ठिकाणीं ब्रिटिशांचा अधिकारी असतो, व त्या प्रांतांतील आपल्या देशाच्या हिताहित संबंधांस जपतो. चीनमध्यें वेहैवै, शांघाय व हाँगकाँग हे भाग व इराणी आखातांत बेहेरिन बेट व बुशायर हे भाग या सदराखालीं येतात.

अशा रीतीनें जबाबदार, राजशासित, संरक्षित, परावलंबी व एकमुखी (एकतंत्री) या प्रकारची व्यवस्था सामान्यतः निरनिराळ्या भागांत आढळते.

साम्राज्य परिषद.

वसाहती व इंग्लंड यामध्यें फार अंतर असल्यानें, दोन्ही देशांतील लोकांचा भेटीचा योग फारसा येत नाहीं, व भेटी झाल्याशिवाय प्रेमभाव वृद्धिंगत होत नाहीं. सबब, दूरदूरच्या वसाहतींमधील प्रमुख लोकांच्या गांठी पडून विचारविनिमय व्हावा, व साम्राज्य चिरस्थायी होण्याचें कार्य सुलभ व्हावें, एतदर्थ, साम्राज्यांतील प्रमुख लोक कांहीं वर्षांनीं इंग्लंडांत

बोलावण्याची अलीकडे पद्धति पडली आहे. या लोकांच्या सभेस 'साम्राज्य परिषद* ' हें नांव देण्यांत आलें आहे.

प्रथमतः १८८७ साली, महाराणी व्हिक्टोरिया यांच्या ५० व्या वाढ-दिवसानिमित्त इंग्लंडांत उत्सव साजरा होऊन, तो साम्राज्यांतहि साजरा केला गेला. त्यावेळीं, त्या उत्सवाप्रीत्यर्थ साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून कांहीं प्रमुख प्रतिनिधि बोलावण्यांत आले होते. त्यावेळीं त्यांच्या व इंग्लंडां-तील प्रधानमंडळांतील सभासदांच्या गांठी पडून, पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर वादविवाद व संभाषणें झालीं. त्यानंतर पुनः १८९७ साली, व्हिक्टोरिया राणीच्या ६० व्या वर्षीं हीरकमहोत्सव झाला, त्यावेळीं असाच भेटीचा योग आला. त्या भेटी झाल्यानें परस्परांस आपले विचार मोकळेपणानें परस्परांस कळविण्याची संधी मिळाली, व अशीच संधी कांहीं वर्षांनीं नियमितपणानें येत गेल्यास, साम्राज्यास हितावह होईल असें वाटून, दर पांच वर्षांनीं असा भेटीचा योग आणावा असें ठरलें.

त्यानंतर, परिषदेच्या सभा १९०२, १९०७ व १९१२ या साली झाल्या. या बैठकींस हिंदुस्तानांतून, हिंदुस्तानच्या वतीनें असे, प्रतिनिधी पाठवीत नसत. स्वतंत्र राज्यव्यवस्था असणाऱ्या देशांपुरतीच ही घटना होती.

ठरल्याप्रमाणें, पुढें १९१७ सालीं ही सभा भरावयाची, पण १९१४ च्या अखेरीस सुरू झालेलें महायुद्ध बंद न झाल्यामुळें, हिची बैठक लांबणीवर टाकावी लागली. या महायुद्धांत हिंदुस्तान देशानें इंग्लंडास १५० कोटी रुपयांची मदत केल्यानें, इंग्लिश लोकांस हिंदुस्तानचें कसें उतराई व्हावें असें होऊन गेलें होतें. तेव्हां त्या मनःस्थितींत, इंग्लंडकडून भरपूर असा नवीन सुधारणांचा हप्ता मिळून, हिंदुस्तानच्या वतीनें या साम्राज्यपरिषदेंत सभासद

* परिषद् = सभा.

साम्राज्यपरिषद् = साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांतून बोलाविलेल्या प्रतिनिधींची सभा.

पाठविण्याचा हक्क देण्यांत आला. प्रथमतः एक तरी लोकनियुक्त सभासद पाठवावयाचा, असा सरकारचा क्रम होता, व त्याप्रमाणें १।२ खेपांस तो क्रम चालला; पण पाठविलेल्या माणसांकडून शक्य तितका विशेष उपयोग झाला नाहीं म्हणून म्हणा, तें धोरण चालूं राहिलें नाहीं. तरी पण हिंदुस्तानचे तीन प्रतिनिधि या सभेंत पाठविण्याची पद्धति मात्र सरकारनें कायम ठेविली आहे. या परिषदेस पाठविलेल्या तीन सभासदांपैकीं एक युरोपिअन, एक संस्थानिक व एक बिनसरकारी इसम अशी निवड करण्यांत येते. १९१७ सालीं भरावयाची ती परिषद १९१९ सालीं युद्धसमाप्तीनंतर भरली, व तेव्हांपासून ती दर दोन वर्षांनीं भरण्याचा प्रघात पाडण्यांत आला. या पद्धतीप्रमाणें आतां अलीकडे ती परिषद् बिनबोभाट १९१९, १९२१, १९२३, हीं सालें भरत आली; पण १९२५ सालीं कांहीं कारणामुळें, विशेषतः वेंब्ली-प्रदर्शन वगैरेसारख्या बऱ्याच इतर गोष्टींत इंग्लंड गुंतल्यामुळें, ती सभा १९२६ सालीं इंग्लंडांत भरली. त्यावेळीं हिंदुस्तानकरितां सरकारनें निवडलेले ३ सभासद तेथें हजर होते.

गेलें महायुद्ध सुरू झालें, त्या वेळीं इंग्लंडला युद्ध पुकारण्यापूर्वी, आपल्या वसाहतींचा या बाबतींत सल्ला घेण्यास मुळींच वेळ मिळाला नाहीं. युद्ध सुरू केल्यामुळें, मदतीसाठीं, साम्राज्यांतील वसाहतींच्या सरकारांकडे धांव घ्यावी लागली. आणीबाणीचा प्रसंग ओळखून, त्या वेळीं साम्राज्यांतून भरपूर मदत आली. पण इंग्लंडनें साम्राज्याचा सल्ला न घेतां, अशा प्रकारें युद्ध जाहीर करणें हें योग्य नव्हे, असें वसाहतींचें बहुमत ठरलें. अशा प्रकारें पुनश्च प्रसंग न यावा, म्हणून साम्राज्य प्रतिनिधींनीं इंग्लिश पार्लमेंट सभेप्रमाणें साम्राज्य पार्लमेंट इंग्लंडांतच बनवावी, व त्या सभेचा अशा बाबतींत ठरणारा निर्णय बंधनकारक व्हावा, अशा प्रकारच्या सूचना पुढें आणल्या; पण तूर्त तरी त्या शक्य कोटींतील नाहींत, असा ब्रिटिश मंडळाकडून त्यास जबाब मिळाल्यामुळें, तें तसेंच भिजत घोंगडें पडलें आहे. पुढें कांहीं दिवसांनीं ही योजना अमलांत येईल असें वाटतें.

पण व्यापारविषयक वाटाघाटींना बरेंच यश आलें. साम्राज्यांत होणाऱ्या मालास, साम्राज्यांतील निरनिराळ्या देशांत जकातीचे दर थोडे हलके असावेत, व इतर युरोपियन देशांपेक्षां 'Buy British Goods' म्हणजे ब्रिटिश माल वापरण्यासंबंधीं सर्वांनीं एकजात जूट करावी, अशा प्रकारचे ठराव होऊन बहुतेकांस ते पसंत पडले. साम्राज्यांतलि वसाहतींतून आज जोंपर्यंत कच्चा मालच उत्पन्न होत आहे, व उद्योगधंद्यांची विशेष वाढ झालेली नाहीं, तोंपर्यंत ही गोष्ट सर्वांना श्रेयस्करच आहे, यांत कांहीं संशय नाहीं. पण वसाहतींत उद्योगधंद्यांची वाढ झाल्यावर ही स्थिति कायम राहणें शक्य होणार नाहीं.

मागील साम्राज्यपरिषदेंत खालीं दिलेल्या मुद्यांवर चर्चा झाली.

(१) परराष्ट्रीय धोरणाचा विचार.

(२) आंतरराष्ट्रीय व्यापार.

(३) वसाहतींची स्थापना (अर्थात् साम्राज्यविस्तार).

(४) संशोधन. (नवीन पदार्थ कोणते सांपडतात याची पहाणी करणें).

(५) साम्राज्यविषयक चित्रपट दाखविण्याची व्यवस्था करणें. (सिनेमा).

वरील मुद्यांपैकीं २ रा मुद्दा, व्यापाराच्या सवलतीसंबंधाचा, पूर्वीचाच कायम आहे. साम्राज्यांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें संशोधन करून, संपत्ति किती वाढवितां येईल हें पाहणें, ही नवीन गोष्ट सामील करण्यांत आली आहे. तसेंच या साम्राज्याचें वैभव किती आहे, या साम्राज्यात राहाणारे निरनिराळ्या देशचे लोक शांततेचा कसा अनुभव घेत आहेत, व शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें सर्वांना आगगाड्या, तारायंत्रें, वगैरे गोष्टींच्या सुखसोयीचा कसा लाभ झाला आहे, या गोष्टी चित्रपटांच्या साहाय्यानें, लोकांच्या मनावर बिंबविण्याची व्यवस्था करण्यासंबंधीं विचार ठरून, योजना अंमलांत येणार आहे.

राष्ट्रसंघ.

(League of Nations)

ब्रिटिश साम्राज्याची वाढ होत असतां, जगांतील इतर प्रमुख राष्ट्रांना आपणांस वसाहती असाव्या असें वाटूं लागलें. त्यांत फ्रान्स देशाचा या दिशेनें किती ठिकाणीं प्रयत्न फसला, हें मागील भागांत आलें आहे. पण फ्रान्स देशाच्या, आज जगावर बऱ्याच ठिकाणीं, व विशेषतः आफ्रिकेच्या उत्तर भागांत, बऱ्याच वसाहती आहेत. गेल्या महायुद्धानंतर जर्मनीच्या वसाहतींपैकीं कांहीं भाग फ्रान्सच्या वांट्यास आला असून, आशियांतहि त्या राष्ट्रास इंग्लंडबरोबरच थोडीशी वांटणी मिळाली आहे. देशाच्या बाहेर स्वतःच्या वसाहती असल्या, म्हणजे व्यापार–धंदा वाढतो, व देशाच्या ऐश्वर्यांत भर पडते. या उद्देशानें फ्रान्सप्रमाणेंच गेल्या शतकाच्या अखेरीस, जर्मनीनें अशा प्रकारची महत्त्वाकांक्षा धरली, व शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर देशाच्या संपत्तींत भर टाकून, इंग्लंडसारख्या प्रमुख राष्ट्राचा हेवा करण्यास सुरुवात केली. पण बरींच वर्षें त्यांना लढाई करण्यास कारण मिळालें नाहीं. सरतेशेवटीं, गेल्या महायुद्धाला सुरुवात झाली. यांत जर्मनीचा मुख्य डाव म्हटला म्हणजे, फ्रान्सला पायबंद लावून, इंग्लंडशीं दोन हात करावयाचे हा होता. पण बेल्जमनें मध्यंतरीं लढून बराच वेळ खाल्ल्यानें, त्याचे बरेच डाव हुकले. या युद्धाच्या मुळाशीं साम्राज्य संपादन करणें हा गूढ हेतु होता, हें सर्वांस माहीत आहेच. अशा रीतीनें हल्लींच्या काळांत युद्धें झाल्यास, माणसें व पैसा यांचा किती नाश होतो, व जगाची प्रगति कशी थांबते, हें सर्वांच्या अनुभवास आलें; तेव्हां यापुढें अशीं युद्धें होऊं न देण्यासाठीं, निरनिराळ्या प्रमुख राष्ट्रांनीं एक संघ निर्माण करावा, व जुटीच्या सामर्थ्यानें एखाद्या फाजील महत्त्वाकांक्षी राष्ट्राच्या उद्दामपणास आळा घालावा, यासाठीं ' राष्ट्रसंघ ' स्थापण्याची कल्पना अवतीर्ण झाली.

या प्रकारची कल्पना पूर्वी अस्तित्वांत नव्हती असें नाहीं. पूर्वींही ‘ हेग ’ येथें ‘ शांतता परिषद ’ (Peace Conference) नांवाची अशीच एक सभा स्थापन करण्यांत आली होती, पण ती शांतता स्थापण्याच्या बाबतींत पंगू ठरली.

सातवे एडवर्ड बादशहा हयात असतां, त्यांनींहि एकदां युरोपांतील प्रमुख राजांच्या गांठी घेऊन, युद्ध होण्याचें घाटत असतां शांतता प्रस्थापित केली, म्हणून त्यांस ‘ शांतता प्रस्थापक ’ ही बहुमानाची पदवी मिळाली.

सारांश, कल्पना जुनी असली, तरी आज तिच्यांत पुष्कळच फेरफार करण्यांत येऊन, ती कार्यक्षम व्हावी एतदर्थ, बरेच प्रयत्न केले आहेत.

हा संघ १९२० सालीं स्थापन झाला. हा स्थापन करण्याच्या कामीं अमेरिकेचे त्या वेळचे प्रेसिडेंट वुड्रो वुइल्सन यांनीं प्रमुख भाग घेतला होता. या थोर पुरुषानें इतर प्रमुख राष्ट्रांच्या मदतीनें एक करारनामा तयार केला. व तो मान्य असल्याबद्दल निरानिराळ्या राष्ट्रांच्या सह्या घेतल्या. याप्रमाणें ३२ राष्ट्रांनीं सह्या केल्यावर राष्ट्रसंघाच्या कामास सुरुवात झाली. प्रत्येक राष्ट्रानें शांतता राखावी व इतर राष्ट्रांना त्या कामीं मदत करावी; राष्ट्राराष्ट्रांतील तहांस मान द्यावा; तंटा उत्पन्न झाल्यास राष्ट्रसंघाकडे तक्रार करावी, व आंतरराष्ट्रीय कायदा पाळावा; अशा प्रकारें एखाद्या राष्ट्राकडून वर्तन होत नसल्यास आपसांतील तंटे प्रेमानें व तडजोडीनें मिटवून, शांतता प्रस्थापित करावी, हें राष्ट्रसंघाचें मुख्य काम आहे. या संघाची एकंदर २६ कलमें आहेत. पैकीं ७ संघाच्या अन्तर्घटनेसंबंधीं आहेत. ८ व ९ या कलमांत राष्ट्रांनीं युद्धसामुग्री कशी कमी करावी, यासंबंधीं नियम आहेत. १० ते १७ पर्यंत प्रत्येक राष्ट्रानें आपलें आरमार कसें कमी करावें याबद्दल नियम आहेत. १८ व्या कलमांत राष्ट्राराष्ट्रांत भांडणें झाल्यास तीं कशीं मिटवावीं, तह कसा घडवून आणावा, व त्यानंतर परस्परांनीं परस्परांशीं कसें वागावें या संबंधीं उल्लेख आहे. तसेंच दोन राष्ट्रांमध्यें होणारा तह गुप्त न ठेवतां तो

राजिस्टर करून प्रसिद्ध केला पाहिजे अशी अट आहे. याशिवाय मजुरांची स्थिति, स्त्रिया व मुलें यांचे हक्क, मादक द्रव्यें, मागसलेल्या जाती, या बाबतींत प्रत्येक राष्ट्रानें काय धोरण ठेवावें यासंबंधीं कलमें आहेत. दिवसेंदिवस या संघाला नवीन राष्ट्रें येऊन मिळत आहेत. अशा रीतीनें आजच्या जगांतील सर्व राष्ट्रें या संघांत सामील होतील असें सुचिन्ह दिसत आहे.

या राष्ट्रसंघाचे ५ भाग आहेत. (१) न्यायकोर्ट, (२) असेंब्ली, (३) कौंसिल, (४) सेक्रेटरीएट, व (५) मजूरसंघ. प्रत्येक भागांत काम कशा रीतीनें चालतें हें पाहूं. न्यायकोर्टांत निरनिराळ्या राष्ट्रांनीं निवडलेले १५ न्यायाधीश असतात. त्यांपैकीं ११ मुख्य व ४ मदतनीस. जगांतील सर्व न्यायपद्धतींचा कायद्यांत समावेश व्हावा, अशी दृष्टि ठेवण्यांत आली आहे. निकाल देण्यास मुख्य अडचण म्हटली म्हणजे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अभाव. सर्व राष्ट्रांच्या संमतीनें जसजसे असेंब्लींत कायदे पास होतील, तसतशी या कायद्यांची संख्या वाढत जाऊन निकाल देण्याचें काम सुलभ होईल.

(२) **असेंब्लीः**—या सभेची बैठक वर्षांतून एकदा जिनिव्हा (स्वित्सर्लंड) येथें एक महिनाभर भरते. या सभेंत निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा खुल्या दिलानें विचार होऊन ठराव पास होतात. येथील काम फ्रेंच व इंग्लिश या भाषांतून चालतें, व इतर राष्ट्रांच्या प्रतिनिधींस समजण्यासाठीं दुभाषे ठेवलेले असतात. जो तो आपल्या मातृभाषेंतून भाषण करतो. परस्परांत दळणवळण वाढल्यानें बरेचसे तंटे प्रेमानें तुटतात. या सभेनें आतांपर्यंत बरींच महत्वाचीं कामें केलीं आहेत.

(३) **कौंसिलः**—असेंब्ली व कौंसिल या दोन भिन्न सभा आहेत. कौंसिलांत एकंदर ८ सभासद असावे, असा ठराव आहे. यांपैकीं, इंग्लंड, फ्रान्स, इटली व जपान या चार प्रमुख राष्ट्रांचा एक प्रतिनिधि कायमचा

नेमलेला आहे. बाकी ४ कोणत्या देशांचे प्रतिनिधि घ्यावे हें असेंब्लीनें ठरवावयाचें असतें. हल्लीं स्पेन, ब्राझील, बेल्जम व चीन या देशांचे प्रत्येकीं एकेक असे दुसरे चार प्रतिनिधी या सभेंत आहेत. एकूण ८ प्रतिनिधी झाले. या दोन सभांत असेंब्लीपेक्षां कौंसिलचें महत्व जास्त दिसतें. राष्ट्रा-राष्ट्रांत तंटा उत्पन्न झाल्यास ती तक्रार प्रथम कौंसिलपुढें आली पाहिजे. या दोन सभांचें कार्यक्षेत्र जरी कायद्यानें निश्चित ठरलेलें नाहीं, तरी असेंब्ली ही एकंदर कार्यांची दिशा ठरविणारी व विचार करणारी सभा असून, कौंसिल-कडे मुख्य अंमलबजावणीचें काम असतें. वहिवाटीनें परस्परांचे संबंध जास्त स्पष्ट होत जातील.

(३) **सेक्रेटरीएटः**—असेंब्लीनें जे ठराव केले असतील, ते अंम-लांत आणणें, त्यासंबंधीं पत्रव्यवहार करणें, वगैरे कामें या ऑफिसनें कराव-याचीं असतात. यांतील अधिकारी ३०।३५ राष्ट्रांतून आणलेले आहेत. यांची संख्या ४०० पर्यंत आहे. हें अंगच्या हुषारीवर येथें निवडून येतात हें उघड आहे.

(४) **मजूरसंघः**—या संघाच्या बैठकीला प्रत्येक राष्ट्रानें प्रति-निधी पाठवावयाचे असतात. त्यांनीं मजुरांच्या स्थितीसंबंधीं विचार करावयाचा असतो, व त्यांचें जीवित सुखकारक व्हावें, याबद्दल नियम करावयाचे अस-तात. हे नियम प्रत्येक राष्ट्रानें पाळावे असें नैतिक बंधन आहे.

आज जग हें एक कुटुंब होऊं पाहत आहे. तेव्हां या जगाच्या संसा-रांत भांडणें मिटविण्यासाठीं राष्ट्रसंघासारख्या संस्थेची अत्यंत जरुरी आहे. जग हें एक कुटुंब आहे, व आपण त्याचा एक घटक आहोंत, अशी कल्पना प्रत्येक राष्ट्रानें मनांत बाळगल्यास, तें इतरांशीं प्रेमानें वागेल व सर्वत्र शांत-तेचें साम्राज्य पसरेल, अशी आपण भावी आशा करूं या.

उपसंहार.

हा ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास वाचल्यानें, आपणांस असें दिसून येईल कीं, हें ब्रिटिश साम्राज्य उभें करण्यास, इंग्लिश लोकांना अनेक सफरी, अनेक उलाढाली व उद्योग करावे लागले. आज इंग्लंडचें सर्व जगभर पसरलेलें साम्राज्य रक्षण करण्याचें त्यांचें मुख्य साधन 'आरमार' हें होय. पण या साधनानेंच केवळ भागणार नाहीं. इंग्लिशांच्या अंगीं दिसणारे पराक्रम, साहस, राष्ट्रभावना, एकी, मुत्सद्दीपणा, तसेंच शिस्त, वक्तशीरपणा, दीर्घोद्योग व चिकाटी हेहि गुण प्रमुखत्वानें उपयोगी पडले आहेत. आज कित्येक वर्षें जगाचा कारभार हांकीत असल्यानें, राजकारणाचें त्यांना जणूं काय बाळकडूच पाजलें आहे, असें वाटतें. कोणत्याहि देशांत बिकट परिस्थिति उत्पन्न होऊं न देतां, एखाद्या कुशल कर्णधाराप्रमाणें राज्यनौका सुयंत्र चालविण्यांत ते पटाईत झाले आहेत.

या लोकांच्या सहवासानेंच, आपणांत एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली. इंग्लिश भाषेस वाघिणीचे दुधाची उपमा देतात. तें दूध पीत गेल्यानें, आपणांस अलीकडे आपली ओळख पटत चालली आहे. सार्वजनिक हिताकरितां, स्वार्थी भावना बाजूस सारण्यास, आम्ही आज थोड्या प्रमाणावर शिकूं लागलों आहोंत. पण अद्याप आम्हांस एकी, दीर्घोद्योग, वक्तशीरपणा वगैरे पुष्कळ गोष्टी राज्यकर्त्यांपासून शिकावयाच्या आहेत. इंग्लिशांच्या आंगचे सद्‌गुण अंकित केल्यानेंच आम्ही स्वतः राज्य सांभाळण्यास लायक होणार आहोंत.

कोणतीहि गोष्ट आपणांस दुसऱ्यांनीं दिली, तरी ती आपणांस योग्य रीतीनें वापरतां आली पाहिजे; नाहीं तर एखाद्या लहान मुलाच्या हातीं तरवार दिल्याप्रमाणें होईल. म्हणून आपणांस मिळणारे अधिकार वापरण्यास आपण समर्थ आहोंत, असें आपण आपल्या कृतीनें दाखविलें पाहिजे. अशी परि-

स्थिति दृष्टोत्पत्तीस आली, म्हणजे आपणांस कानडा, ऑस्ट्रेलिया वगैरे स्वतंत्र वसाहतींचें 'स्वराज्य' मिळाल्याशिवाय खास राहणार नाहीं.

ब्रिटिश जनतेचा हिंदुस्तानच्या बाबतींत दिवसेंदिवस दृष्टिकोन बदलत चालला आहे, हें चालू शतकांत मिळालेल्या दोन सुधारणांच्या हप्त्यांवरून स्पष्ट होत आहे. यापुढें हिंदुस्तानला ' डोमिनियन स्टेटस् ' म्हणजे 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य ' पाहिजे, अशी लोकांची मागणी आहे. ती प्राप्त करून घेणें सर्वस्वीं आपणांवर अवलंबून आहे. म्हणून आपसांतील क्षुद्र भेदभाव विसरून, आपण एकमुखी मागणी केल्यास ती मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, असा दृढ विश्वास वाटतो. पण मिळाल्यावर तें जतन करण्यास लागणारे सद्गुण पैदा करण्याच्या तयारीस लागलें पाहिजे.

महाराणी व्हिक्टोरिया यांचा जाहीरनामा, ही आपणांस मिळालेली राजकीय हक्कांची पहिली सनद होय. हिचाच पुरस्कार सातवे एडवर्ड व पंचम जॉर्ज, यांनीं वेळोवेळीं केला आहे. मागील महायुद्धांत हिंदुस्तानची राजनिष्ठा पूर्ण कसोटीस लागली. तीवर खूष होऊन पार्लमेंटसभेनें आपणांस जास्त अधिकार दिले. सारांश, इंग्लंडशीं राजकीय बाबतींत सहकार्य करून सहानुभूति संपादिल्यानें, आपला पुढील राजकीय मार्ग सुकर होत जाईल असें वाटतें.

शेवटीं, आपण दयाघन प्रभूला अशी विनंति करूं या कीं, इंग्लंडच्या छत्राखालीं हिंदुस्तान देशाची भरभराट होत जावो, व आम्हाला स्वराज्याचे हक्क लवकर मिळोत !

प्रश्न.

१. इंग्लंड देशाच्या राज्यव्यवस्थेंत पार्लमेंट सभा, प्रधानमंडळ व राजा यांचा परस्परांचा काय संबंध आहे तें सांगून पार्लमेंट सभा व प्रधान-मंडळ यांची घटना व कर्तव्यें सांगा.

२. ब्रिटिश बेटांत रोमन राज्य किती दिवस होतें ? त्याचे इंग्लंड-वर काय परिणाम झाले, ते थोडक्यांत लिहा.

३. इंग्लिश लोक कोणत्या वंशाचे आहेत ? त्यांच्या अंगीं दिसणारे निरनिराळे गुण कसे आले ?

४. ब्रिटिश बेटांच्या राज्यपद्धतीचें वर्णन करून, ती कितपत लोक-सत्ताक आहे तें सांगा.

५. युरोपांतील धर्मसुधारणेच्या चळवळीची हकीगत लिहा; व तिचा इंग्लंडला काय फायदा झाला तें सांगा.

६. युरोपांतील धर्मसुधारणेबद्दल तुम्हांस काय माहिती आहे व धर्मसुधारणेचा वसाहतीच्या वाढीस काय उपयोग झाला तो सांगा.

७. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार अठराव्या शतकापर्यंत किती झाला होता ? एकोणिसाव्या शतकांत त्याची वाढ कोठें कोठें व केव्हां केव्हां झाली ?

८. ब्रिटिश साम्राज्याचे लहान घटक कोणते ? त्यांचा साम्राज्याला कोणत्या प्रकारें उपयोग होतो ?

९. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करतांना, कोणत्या इतर राज-सत्तांशीं झगडावें लागलें ?

१०. साम्राज्याचा विस्तार करणाऱ्या किंवा त्याचे भाग शोधून काढणाऱ्या पुरुषांपैकीं, तिघांची कामगिरी सांगा.

११. ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळत नाहीं असें कां म्हणतात ?

१२. 'विविधता' हा ब्रिटिश साम्राज्याचा विशेष आहे, ही गोष्ट सिद्ध करा.

१३. साम्राज्य परिषदेबद्दल तुम्हांस काय माहिती आहे ती द्या.

१४. कानडा, मॉरिशस्, नायजिरीया व सिलोन, या ब्रिटिश साम्राज्यांतील भागांच्या राज्यव्यवस्थेचें वर्णन करा.

१५. कानडा व ऑस्ट्रेलिया या वसाहतींतील राज्यव्यवस्थेची तुलना करा.

१६. कानडा देशाची पूर्वींची स्थिति सांगा, व त्या वसाहतीची वाढ कशी झाली हें थोडक्यांत लिहा.

१७. 'अमेरिका हातची गेली खरी, पण कानडा मिळाला' या म्हणण्याचा अर्थ काय ?

१८. कानडा प्रांतास राजकीय हक्क केव्हां व कसे मिळाले हें थोडक्यांत लिहा.

१९. कानडा, न्यूझीलंड व सीलोन हे देश, ब्रिटिश साम्राज्यांत केव्हां व कसे सामील झाले तें सांगून, तेथील राज्यव्यवस्थेचें वर्णन करा.

२०. अमेरिका स्वतंत्र होण्यापूर्वीं, वसाहतींसंबंधीं काय कल्पना होत्या ? व त्यानंतर त्या कल्पनांत काय फरक पडला, व तो कां पडला, हें सांगा.

२१. अमेरिकेंतील इंग्लिश वसाहती व इंग्लंड यांमधील युद्धाचीं कारणें सांगून, त्या युद्धाचे काय परिणाम झाले तें लिहा.

२२. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाबद्दल थोडी हकीगत लिहा. या युद्धापूर्वींच्या व नंतरच्या वसाहतींच्या कल्पनेंत काय फरक झाला ? नवीन कल्पनेपासून इंग्लंडचा काय फायदा झाला ?

२३. अमेरिका स्वतंत्र झाल्यावर कानडाची राजकीयदृष्ट्या कशी वाढ झाली तें सांगा.

२४. अमेरिकेंतील १३ वसाहती इंग्लंडपासून कां स्वतंत्र झाल्या ? त्या देशाच्या स्वातंत्र्य युद्धाची हकीगत वर्णन करा.

२६. तुर्कांनीं कॉंस्टँटिनोपल जिंकून घेतल्यानें, युरोपच्या व्यापारावर काय परिणाम झाला ? युरोपांतील कोणत्या राष्ट्रांनीं जलमार्ग शोधून काढण्याचे प्रयत्न केले ? त्यांत त्यांना कितपत यश आलें ?

२७. वसाहती स्थापन होण्यास कोणकोणतीं कारणें झालीं, या-संबंधीं त्रोटक माहिती द्या.

२८. ऑस्ट्रेलिया, इजिप्त व सुदान हे प्रांत ब्रिटिश अंमलाखालीं कसे आले तें सांगा.

२९. ऑस्ट्रेलियाची शासनपद्धति व हिंदुस्तानची शासनपद्धति यांची महत्वाच्या बाबींबद्दल तुलना करा.

३०. ऑस्ट्रेलिया प्रांतांत प्रथम कोठें वसाहत झाली ? त्या देशांत वसाहत वाढण्यास कोणतीं कारणें झालीं तीं द्या.

३१. ऑस्ट्रेलियाचा कोणत्या इंग्लिश खलाशानें शोध लावला ? त्या ठिकाणीं वसाहत केव्हां व कशी झाली ? तेथील वसाहत वाढण्यास कोणतीं मुख्य कारणें झालीं तीं सांगा.

३२. आफ्रिकेचा दक्षिण भाग इंग्लिशांच्या ताब्यांत केव्हां आला ? तेथील बोअर लोक दक्षिण आफ्रिका सोडून कां जाऊं लागले ? त्यांनीं कोठें राज्यें स्थापिलीं ? बोअर लोकांसंबंधीं माहिती लिहा.

३३. पश्चिम आफ्रिकेंत ब्रिटिशांच्या ताब्यांत कोणत्या वसाहती आहेत ? तेथील मूळच्या वसाहतींना गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या आज्ञा-पत्रानें कोणते भाग जास्त जोडण्यांत आले ?

३४. या वसाहतींपैकीं एका वसाहतीची राज्यव्यवस्था देऊन तीस काय म्हणतात तें सांगा.

३५. पूर्व आफ्रिका हा भाग कंपनीच्या ताब्यांत आल्यापासून, तो पार्लमेंटच्या ताब्यांत जाईपर्यंतची हकीगत लिहा.

३६. इजिप्तच्या खेदिवाचें राज्य ब्रिटिशांच्या हातीं कसें आलें, याबद्दल त्रोटक माहिती लिहा.

३७. दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांचा इतिहास थोडक्यांत देऊन त्यांचा इंग्लिश लोकांनीं केव्हां व कसा पाडाव केला तें लिहा.

३८. न्यू फाउंडलंड, न्यू झीलंड व ऱ्होडेशिया हे प्रदेश ब्रिटिश साम्राज्यांत केव्हां व कसे सामील झाले तें सांगून, त्या प्रदेशांतील राज्य-व्यवस्थेचें वर्णन करा.

३९. केप कॉलनींतून बोअर लोक टोळ्याटोळ्यांनी उत्तरेकडे कां निघून गेले त्याचीं कारणें सांगा.

४०. दक्षिण आफ्रिकन संघाची राज्यव्यवस्था लिहा.

४१. आफ्रिकेंतील प्रांत ताब्यांत घेण्याबद्दलची युरोपियन राष्ट्रांची चळवळ कां व केव्हां सुरू झाली ?

४२. डॉ० लीव्हिंग्जटन्, स्टॅन्‌ले व मंगोपार्क यांच्या आफ्रिकेंतील कामगिरीचें महत्व वर्णन करा.

४३. पूर्व आफ्रिकन कंपनीनें थोडक्याच दिवसांत आपला ताबा सोडून, तो सबंध प्रांत पार्लमेंटाकडे कां सोंपविला ? या वसाहतींत कोणते भाग येतात ? तेथील राज्यव्यवस्थेस काय नांव द्याल ?

४४. गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या आज्ञापत्रानें इंग्लंडला आफ्रिकेंत कोणते प्रांत मिळाले ?

४५. हिंदुस्तान व ब्रिटिश वसाहती यांच्या राज्यव्यवस्थेमधील फरक स्पष्ट करा.

४६. स्थानिक स्वराज्य म्हणजे काय तें सांगून, ' शहर ' ' जिल्हा' व ' मोठें खेडें ' यांतील स्थानिक स्वराज्य चालविणाऱ्या संस्थांची घटना व कामें, यासंबंधीं माहिती द्या.

४७. हिंदुस्तानच्या कच्च्या आराखड्यांत, लॉर्ड वेल्सलीच्या वेळचें ब्रिटिश हिंदुस्तान दाखवा.

४८. १९२० अखेर पास झालेल्या मॉंटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांच्या कायद्यानें, हिंदुस्तानच्या राज्यव्यवस्थेंत काय फेरफार झाला तें सांगा.

४९. हिंदुस्तानांत साम्राज्याचा विस्तार करण्याच्या कामीं, कोणीं विशेष कामगिरी केली ? त्या कामगिरीचें थोडक्यांत वर्णन करा.

५०. हिंदुस्तानास ब्रिटिश साम्राज्याचा घटक म्हणविण्यास कां भूषण वाटतें ? (१९२१)

५१. हिंदुस्तानच्या राज्यपद्धतींत झालेल्या नवीन सुधारणा लिहा.

५२. हिंदुस्तानच्या राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं सांगून प्रत्येकाची माहिती द्या.

५३. हिंदुस्तानांत इंग्लिश व फ्रेंच यांच्या जयापजयाची मीमांसा करा.

५४. मॉंटफर्ड सुधारणेपूर्वींची मुंबई इलाख्याची राज्यव्यवस्था सांगून, तिच्यांत सुधारणेमुळें कोणते फेरफार झाले तें सांगा.

५५. सायमन कमिशन कां नेमण्यांत आलें आहे ? यास दुसरें कोणतें नांव आहे ? (स्टॅटयुटरी कमिशन) यासंबंधानें तुम्हांस काय माहिती आहे ?

५६. लोकलबोर्ड, म्युनिसिपालिटी व ग्रामपंचायत यांचे अधिकारी व कामें सांगा. यांचा खर्च कसा चालतो ?

५७. पुढील गोष्टींसंबंधीं तुम्हांस काय माहिती आहे ती लिहाः—

(१) कायदे कौंसिल.

(२) सोंपीव खातीं.

५८ मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानें आपणांस कोणते हक्क मिळाले ?

५९. सीलोन ही कोणत्या प्रकारची वसाहत आहे ? या बेटाला दिलेल्या राजकीय हक्कांसंबंधीं माहिती लिहा.

६०. सीलोनच्या राज्यव्यवस्थेंत, डू–नो–मोअर कमिशनच्या शिफारसीवरून झालेले राजकीय फेरफार थोडक्यांत सांगा.

६१. सेसिलऱ्होडस, डेव्हिड लिव्हिंग्जटन, लॉर्ड वुइल्यम् बेंटिंक यांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ?

६२. पुढील गोष्टींवर स्पष्टीकरणार्थ टीपा लिहाः—

(१) गुलामांचा व्यापार.

(२) धर्मयुद्धें.

(३) धर्मसुधारणा.

(४) वसाहतींविषयीं कल्पना.

(५) स्पेनचें अजिंक्य आरमार.

(६) वसाहती स्थापन होण्याचीं कारणें.

६३. पुढील गोष्टींसंबंधीं थोडी माहिती लिहाः—

(१) स्पेनच्या अजिंक्य आरमाराची इंग्लंडवर स्वारी.

(२) सर फ्रॅन्सिस ड्रेक, कॅपटन् कुक्, व सर वॉल्टर रॅले.

६४. लॉर्ड किचनेर, लॉर्ड रिपन, पॉल क्रूगर व मंगोपार्क यांपैकीं कोणाहि तिघांची तुम्हांस जी माहिती असेल ती थोडक्यांत द्या.

६५. लॉर्ड बेंटिंक, लिव्हिंग्जटन, नेल्सन व विल्बरफोर्स यांचीं नांवें इतिहासप्रसिद्ध होण्याचीं कारणें द्या.

६६. ख्रिस्तोफर कोलंबस याचें थोडक्यांत चरित्र लिहा. (१९२८)

परिशिष्ट–अ.

ब्रिटिश वसाहतींची स्थापना.

तुर्क लोकांचा चांद कॉन्स्टँटिनोपल शहरावर चमकूं लागल्यानें, पूर्वेकडील देशांबरोबर चालणारा व्यापार त्यांचे हातीं आला, व त्यामुळें त्यांजबरोबर लढाई करणें हा एक व पर्यटनें करून नवीन मार्ग शोधून काढणें, हा दुसरा असे दोन मार्ग युरोपियन राष्ट्रांना मोकळे राहिले. पण त्यांतील पहिला त्यांना अशक्य वाटला; त्यामुळें त्यांनीं जारीनें दुसऱ्या मार्गाकडेच आपलें लक्ष वळविलें, व त्या प्रयत्नांत त्यांना विजयश्रीनेंहि माळ घातली.

या पर्यटनांत पोर्तुगाल व स्पेन या देशांनीं पुढाकार घेतला होता. आफ्रिकेंतील गुलाम व तेथील कच्चा माल युरोपखंडास पुरवून, स्वतः श्रीमत होणें हा त्यांचा उद्देश होता. पोर्तुगीजांनीं गुलामांच्या व्यापारांत अरबांचें अनुकरण केलें. १५ व्या व १६ व्या शतकांत जलपर्यटनांत स्पेन व पोर्तुगाल यांनीं अघाडी मारली. या वेळीं इंग्लंड हा देश अंतस्थ व्याधींनीं गांजून गेला असल्यामुळें, त्याला आपल्या देशाबाहेरील चळवळीकडे फारसें लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. आपापसांतील युद्धें व धार्मिक बाबतींत उत्पन्न झालेले पक्ष, या दोन व्याधि इंग्लंडच्या मागें लागल्या होत्या.

या दोन शतकांत पोर्तुगाल देशानें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याचा शोध लावून, हिंदुस्तान देश गांठला व तेथें सर्व किनाऱ्यावर आपला अम्मल बसविला. स्पेननें अमेरिकेचा बराचसा संपन्न असा भाग व्यापून टाकिला, व तेथून सोन्याचांदीनें भरलेलीं जहाजें स्वदेशीं रवाना करून, देशाला श्रीमंत करून सोडलें. कारण त्या वेळच्या अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें, ज्या देशांत सोनेंनाणें जास्त तो देश श्रीमंत असें समजत असत. या तत्त्वाला अनुसरूनच इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करतांना, इंग्लंडच्या हद्दीच्या बाहेर अमूक एक ठराविक रकमेहून जास्त रक्कम पाठवूं नये, असा

त्या वेळच्या प्रधानमंडळानें ठराव केल्याचें इतिहासज्ञांस माहीत आहेच. परंतु हळूहळू ही संपत्तीची खरी कल्पना नाहीं, असें अर्थशास्त्रज्ञाचें मत बनत जाऊन 'अनिर्बंध व्यापारी तत्त्वाचा' उदय झाला. सोनेनाणें या स्वरूपांतच फक्त संपत्ति वाढली, तर त्या देशांतील लोकांचे अंगीं आळस शिरून तदनुषंगानें अनेक दुर्गुण तेथें वास करूं लागतात, व त्यामुळें जवळच्या एकाद्या चिमुकल्या पण उद्योगी व बुद्धिमान राष्ट्राचा त्यावर लवकरच पगडा बसतो, असें नवीन मत प्रचलित झालें.

प्रथमतः पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांनींच नवीन देशांचा शोध लाविल्यामुळें, दुसऱ्या युरोपियन राष्ट्रांनीं आपल्या भागांकडे वळूं नये व सर्व फायदा आपणांसच मिळावा, असें त्यांस वाटणें स्वाभाविकच होतें. तेव्हां इतर राष्ट्रांना प्रतिबंध करण्याकरितां ख्रिस्तीधर्मगुरु जो पोप त्याजकडे त्यांनीं धाव घेतली. यावेळीं सर्व ख्रिस्ती राष्ट्रांत पोपच्या शब्दाला फार मान असे, व तो म्हणेल ती पूर्व दिशा समजत. त्याचा हुकूम मोडण्याचें एकाद्या देशानें धारिष्ट केल्यास त्या देशावर इतर देशांकडून बहिष्कार घालून पोप त्यास *वठणीस आणीत असे. म्हणून त्यांनीं पोपमार्फत अटलांटिक महासागराच्या पश्चिमेकडील भाग पोर्तुगीजांस व पूर्वेकडील स्पेन देशाच्या ताब्यांत राहाण्याबद्दल व इतर युरोपियन राष्ट्रांनी त्या बाजूस बिलकूल न फिरण्याबद्दल फर्मान मिळविलें, व अटलांटिक महासागरावर या दोन राष्ट्रांशिवाय इतरांना फिरकण्याची बंदी केली.

इंग्लंड देशाला सोळाव्या शतकाच्या उत्तरभागांत थोडेसें अंतःस्वास्थ्य प्राप्त होऊं लागल्यावर. इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत इंग्लिश लोकांनीं या बाबतींत लक्ष घालण्यास सुरवात केली. याचे पूर्वीं त्यांनीं अटलांटिक

* १६ व्या शतकापासून धर्मसुधारणच्या काळाला सुरुवात झाल्यावर पोपचें महत्व अतिशय जोरानें कमी होत गेलें.

हासाराच्या उत्तर भागानें वायव्य व ईशान्य मार्गांनीं पूर्वेकडे जाण्यास प्रयत्न केले होते. त्यांत त्यांना लॅब्रॅडोरचा किनारा व त्याजवळील मासे मारण्याचा धंदा एवढाच फायदा झाला; या दिशेनें केलेल्या प्रयत्नांत त्यांना पैशांच्या व माणसांच्या बाबतींत फारच नुकसान सोसावें लागलें. पण या दिशांनीं निराश झाल्यामुळें व स्पेन व इंग्लंड या देशांत धार्मिक चुरस उत्पन्न होऊन भांडणास सुरुवात झाली. इंग्लिश खलाशांनीं स्पेनचीं जहाजें लुटून आणण्याचा तडाखा चालविल्यानें प्रकरण विकोपास गेलें. पुढें १५८८ च्या आरमारी विजयानें इंग्लंड देशाला अटलांटिक महासागराचा मार्ग कायमचा मोकळा झाला. त्यावेळीं संपादन केलेलें आरमारी वर्चस्व इंग्लंडनें आजतागाईत कायम ठेविलें असून ब्रिटिश साम्राज्यविस्ताराची तीच खरी गुरुकिल्ली आहे.

युरोपियन राष्ट्रांनी हा मार्ग शोधून काढण्याचें मुख्य कारण पूर्वेकडील देशांशीं चालणारा व्यापार हें होय. मसाल्याच्या जिनसांसाठीं तुर्कस्तानच्या तोंडाकडे पाहावें लागूं नये हा त्यांचा मुख्य उद्देश. प्रथम या व्यापाराचा मक्ता पोर्तुगालकडे आला. त्याचा त्या देशानें एक शतकपर्यंत निर्वेधपणें उत्तम रीतीनें उपयोग करून घेतला. युरोपखंडांतील त्यांची सत्ता खालावल्यावर डच लोक या व्यापाराचे मालक बनले व इतर कोणांसहि आपल्या भागांत फिरकूं न देण्याची त्यांनीं पूर्ण खबरदारी घेतली. आजतागाईत डच लोकच या मसाल्यांच्या बेटांचे मालक आहेत, असें आपणांस दिसून येईल.

डच लोकांमागून इंग्लिश व फ्रेंच लोक इकडील व्यापार मिळविण्याची खटपट करूं लागले. पोर्तुगीजांचा मुख्य उद्देश व्यापार व नंतर धार्मिक प्रसार. डच लोकांचा मुख्य उद्देश व्यापार व त्याकरितां राजसत्ता. पण इंग्लिशांनीं प्रथम व्यापारी धोरण ठेवून हळूहळू राज्यविस्ताराचें धोरण

स्वीकारलें. पूर्वींच्या युरोपियन राष्ट्रांच्या अनुभावाचा फायदा घेऊन धर्मप्रसार ही बाब त्यांनीं अगदीं बाजूला ठेवली.

इ. सन १४९७ सालीं केबट यानें+लॅब्रॅडोरचा किनारा शोधून काढल्यावर तेथील कच्चा माल, विशेषतः केंसाळ प्राण्यांची कांतडी आणून युरोपखंडांत विकण्यासाठीं त्यांनीं हडसन बे नांवाची एक कंपनी स्थापन केली. शिवाय किनाऱ्याजवळ सांपडणारे कॉड वगैरे मासे पकडण्यासाठीं त्यांचे जहाजांचे काफिले रवाना होऊं लागले. या व्यापाराच्या व उद्योगाच्या निमित्तानें हळूहळू इंग्लिश लोक न्यू फाउंडलंड वगैरे भागांत वसाहत करूं लागले. या निमित्तानें प्रथमतः या भागाकडे लोकांचा ओघ वाहूं लागला.

पुढें इलिझबेथ राणीच्या कारकीर्दींत रॅले नामक प्रसिद्ध मुत्सद्यानें व्हर्जिनिया येथें वसाहत स्थापन करण्याचा अनेकवार प्रयत्न केला; पण खाण्याची ददात व रेड इंडियन लोकांचे हल्ले, यांमुळें ती वसाहत ह्या पद्धतीनें त्यांना कायमपणें टिकवितां आली नाहीं.

यानंतर हळूहळू फ्रेंच लोक वसाहती करूं लागले व ते कदाचित ह्या प्रांत बळकावून बसतील व आपण मागें पडूं या चुरशीनें इंग्लिश लोक या भागांत वसाहत करण्यास जाऊं लागले. पण मुख्यत्वेंकरून देशांत ट्यूडर कारकीर्दींत (विशेषतः इलिझबेथच्या कारकीर्दींत) शांतता नांदूं लागल्यानंतर लोकवस्ती झपाट्यानें वाढूं लागली.

या लोकवस्तीस कोठें तरी देशाबाहेर जागा पाहिजे असें वाटूं लागलें. देशांतल्या देशांत राहून दारिद्र्यांत दिवस काढण्यापेक्षां, परदेशांत जाऊन जास्त सुखांत कालक्रमणा करणें धाडसी लोकांनीं पसंत केलें. त्यामुळें अमेरिकेंतील वसाहती सुरू झाल्या. शिवाय अमेरिकेंत खंडोगणती सोनें सांपडतें असा एक

+ उत्तर अमेरिकेंत कानडाच्या पूर्वेस हा भाग आहे.

सार्वत्रिक समज पसरल्यानें, या धाडसी प्रवाशांना जास्तच उत्तेजन मिळालें. पण या लोकांच्या योगानें खऱ्या व कायमच्या अशा फारशा वसाहती स्थापन झाल्या नाहींत.

फ्रेंचांशीं चुरस उत्पन्न झाल्यानें, इंग्लिशांना कांहीं भागावर आपला ताबा प्रस्थापित करावा लागला असें वर सांगितले. पण हे भाग ताब्यांत घेतल्यावर, तेथें वसाहत करण्याची जबाबदारी उत्पन्न झाली. तेव्हां दक्षिणेकडील संपन्न भागांत सरकारनें, लढाया व इतर आपत्तींनीं खालावलेल्या सरदारांना पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याकरितां, या भागांचा उपयोग केला. यावेळीं गुलामांचा व्यापार सर्रास सुरू असल्यामुळें, या जमिनीची मेहनतमशागत करण्यास ते गुलामांचा उपयोग करीत; व त्यांचे मदतीनें पुष्कळ पिकें काढीत. वसाहत होऊन देशांतील सरदारवर्गही संपन्न होऊं लागला. अशा रीतीनें एका दगडानें दोन पक्षी मारण्याचें श्रेय त्यांना मिळालें. पण पुढें गुलामांचा व्यापार बंद झाल्यावर, या धनिक लोकांची फारच तारांबळ उडाली. तेव्हां देशांतील गोरगरीब लोकांना गुलामांच्याऐवजीं शेतीचें काम करण्यास पाठविण्यांत आलें. त्यामुळें इंग्लंडांतील वस्तीही बरीच पातळ झाली, व त्यायोगानें देशाच्या पुढें नित्य उभा असलेला आर्थिक प्रश्न सहज सोडवितां आला.

गरीब लोकांप्रमाणेंच उत्तर–अमेरिकेच्या दक्षिणेकडील भागांत तेथील श्रीमंत शेतकरीवर्गाला मदत करण्यासाठीं सरकारनें फ्लॉरिडा वगैरे प्रांतांत कैदी पाठविण्यास सुरवात केली. हे चांगले धष्टपुष्ट असल्यानें व यांजकडून सक्तीनें काम घेतां आल्यामुळें, गुलामगिरी मोडल्यावर वसाहतां वाढण्यास फार मदत झाली. हा क्रम सतत १७८३ सालापर्यंत अबाधितपणें कायम राहिला. पण या वर्षीं अमेरिकन वसाहतींनीं स्वातंत्र्य मिळविल्यावर, या इंग्लिश कैद्यांना आपल्या देशांत पाठविण्याची त्यांनीं बंदी केली. यापूर्वीं स्वदेशांत अपमानकारक स्थितींत आयुष्य घालविण्यापेक्षां मुदत संपल्यावर-

सुद्धां ते कैदी या नवीन देशांतच आपखुषीनें राहाण्याचें पत्करीत असत. त्यामुळे वसाहतींची वस्ती वाढण्यास मदत होई. अमेरिकेनें कैदी येऊं देण्याचें बंद केल्यावर, इग्लंडनें ऑस्ट्रेलिया देशांत कैदी पाठविण्यास सुरुवात केली, व तो देश या कैद्यांनीच राहाण्यालायक हळूंहळूं बनविला. या देशांत दरसाल कैदी पाठविण्याचें काम १७८३ ते १८२१ पर्यंत सतत सुरू होतें. अशा रीतीनें इंग्लंडची ऑस्ट्रेलिया ही वसाहत कैद्यांनीं बनविली ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

जोंपर्यंत कच्चा माल आणून युरोपांत विकणें अगर अमेरिकेंत फावड्यानें गोळा करण्याइतकें सोनें सांपडतें, या गोष्टीवर विश्वास ठेवून लोक वसाहत करण्यास येत, तोंपर्यंत वसाहतींची व्हावी तशी वाढ झाली नाहीं. पण सोळाव्या शतकाचे मध्याचे सुमारास युरोपांत जी एक धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली, त्या योगानें या वसाहतींचें दैव उघडलें.

युरोपखंडभर प्रस्थापित झालेल्या खिस्तीधर्माचे आद्यगुरु पोपसाहेब यांची गादी इटली देशांत रोम शहरीं असे. सर्व युरोपियन राष्ट्रांना यांचा फार दरारा वाटत असून, यांच्या हातीं धर्माचे बाबतींत 'कर्तुमकर्तु' सर्व सत्ता होती. बायबल हा धर्मग्रंथ सुशिक्षित अशा लोकांनाच फक्त समजणाऱ्या लॅटिन भाषेंत लिहिलेला असल्यामुळें, व तो धर्मोपदेशकांनाच फक्त वाचतां येत असल्यामुळें, लोकांना त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा लागे. त्या वेळेस त्या छापण्याची कला अवगत नसल्यानें, सर्वांना हा ग्रंथ मिळून त्यांत काय लिहिलें आहे, हें समजणेंही दुरापास्त होतें. त्यामुळें पोप व त्याचे अनुयायी यांचा जुलूम लोकांना असह्य झाला होता. ते वाटेल त्या गोष्टी सांगून लोकांपासून पैसे उकळीत आहेत, असें हळूहळू पुस्तकाच्या प्रसाराबरोबर लोकांच्या निदर्शनास येऊं लागलें; त्यामुळें या सत्तेस विरोध करण्याची वृत्ति उत्पन्न झाली. अशा रीतीनें प्रथमतः विरोध करणारा थोर पुरुष 'मार्टिन लूथर' हा होय. याजवर पोपनें बरेंच आकांडतांडव केलें,

व या नवीन मताचा उच्छेद करण्याचें जारीनें प्रयत्न झाले. पण सत्पक्ष नेहमी खराच ठरणार, या भावनेनें प्रेरित झालेल्या लोकांची संख्या कमी न होतां दिवसेंदिवस वाढतच गेली; व बायबलमध्यें सांगितलेल्या गोष्टींवरच फक्त आम्ही विश्वास ठेवूं, पोप वगैरे कोणास जुमानणार नाहीं, अशा निश्चयानें या लोकांनीं मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. या लोकांनीं देशत्याग केला, अनेक प्रकारचा छळ सोसला, पण स्वधर्म व स्वतःचीं बनलेलीं मतें यांना केव्हांही सोडलें नाहीं. अशा कणखर वृत्तीचे लोक देशांतील छळ सोसण्यापेक्षां अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरून, स्वतः जमीन कसून भाजीभाकरी मिळविण्यास प्रवृत्त झाले, तेव्हां वसाहतींना खरी ऊर्जित दशा आली, व या देशांतील धर्मच्छलानें बनलेल्या नवीन वसाहती कधींहीं नामशेष झाल्या नाहींत. युरोपांतील घरदार, चीजवस्त सर्व सोडून देऊन, नवीन वसाहतींचा मार्ग स्वीकारल्यानें त्यांना स्वतःचा देश पारखा झाला, ही गोष्ट खरी, पण ते या वसाहतींत येऊन कायमचे रहिवासी बनल्यानें, या अमेरिकन वसाहतींत नवजीवनाचा झरा उत्पन्न होऊन, त्यांची खरी भरभराट होण्यास सुरवात झाली. येथें ते सोन्याचांदीकरितां आले नसून येथेंच मिळेल ती मीठभाकरी गोड करून रहाण्याचा व तेथें येणाऱ्या आपत्तींशीं झगडण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यामुळें वसाहती झपाट्यानें वाढल्या.

अमेरिकेनंतर आपण आफ्रिकेकडे वळल्यास आपणांस असें दिसेल कीं, या खंडाचा किनाऱ्यांकिनाऱ्यानें जरी शोध झाला होता, तरी अन्तर्भाग १९ व्या शतकाच्या मध्यकालापर्यंत पूर्णपणें अज्ञात होता. तेव्हां हा अन्तर्भाग शोधून काढणें ही पहिली गोष्ट, व त्यानंतर तो वसाहतींस योग्य असल्यास त्या स्थापणें ही दुसरी गोष्ट करणें क्रमप्राप्तच झालें.

या देशाच्या अन्तर्भागाचा शोध लावण्याचें ज्या धाडसी प्रवाशांनीं श्रेय संपादन केलें, त्यामध्यें डॉ. लिव्हिंग्जटन, स्टॅनले व मंगोपार्क यांची

प्रामुख्यानें गणना होते. यांनीं धर्मप्रसारार्थ व आपल्या राज्याची सीमा वाढविण्याच्या स्तुत्य उद्देशानें, अत्यंत बिकट व त्रासदायक प्रवास केले व त्यासंबंधीं सर्व माहिती युरोपखंडांत प्रसिद्ध केली. त्यामुळें या देशाचें वास्तविक स्वरूप लोकांच्या लक्षांत येऊन १८८५।८६ सालाचे सुमारास तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेण्याची युरोपांतील राष्ट्रांची एकच दंगल उडून गेली. डॉ० लिव्हिंग्जटनसारख्या मिशनरी मनुष्याचा मुख्य उद्देश देशाच अंतर्भाग शोधून काढून, तेथील रानटी लोकांना स्वधर्माची [illegible] असा होता. अशा प्रकारें निःस्वार्थी भावनेनें प्रेरित झालेल्या प्रवाशांना स्वतः त्रास व संकटें सोसावीं लागलीं ही गोष्ट खरी; पण त्यामुळें त्यांच्या देशाचें नांव प्रख्यात होऊन त्यांस विस्तृत प्रदेशाचा प्रत्यक्ष लाभ झाला.

जसजसा साम्राज्याचा विस्तार होत चालला, तसतसें तें रक्षण करण्याच्या साधनांचाहि विचार करणें भाग पडलें. या साधनांपैकीं आपल्या निरनिराळ्या भागांना जाण्याच्या वाटेवर गलबतांना सामुग्री व कोळसा पुरविण्यासाठीं नाक्यांचीं ठिकाणें असणें जरूर वाटूं लागलें. त्यामुळें राज्यास बळकटी आणण्यासाठीं अशीं नाक्याचीं ठिकाणें जिंकून अगर विकत घेऊन तेथें आरमारी बंदोबस्त करावा लागला. अशा वसाहतींना आरमारी वसाहती हें सार्थ नांव मिळालें. या ठिकाणीं अत्यंत कडक असा लष्करी अम्मल असतो. अशा वसाहतींत जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस, असेन्शन, हेलीना, एडन, व सिंगापूर वगैरे प्रमुख ठिकाणें येतात.

प्रथम शोध, मग व्यापार व मग वसाहती अशी ही वसाहतींच्या स्थापनेची त्रयी आहे. या शोधांच्या व वसाहतींच्या मागें लागल्यानें देशाचा विस्ताराच्या दृष्टीनें जसा फायदा झाला, तसाच इंग्लिश लोकांच्या अंगचे धारिष्टादि गुण विकास पावण्यासहि त्यामुळें वाव मिळाला. आज एक देश शोधला, उद्यां दुसरा, परवां तिसरा असा युरोपियन लोकांचा जगभर व्याप वाढला आहे, व तदनुषंगानें त्यांच्या आंगच्या अनेक गुणांचा विकास होण्यास

भरपूर जागा मिळाली आहे. आजहि विमानांतून एका दमांत ३००० मैलांचा प्रवास करणारे लिंडबर्गसारखे धाडसी वैमानिक पुरुष या युरोपियन राष्ट्रातच निर्माण होत आहेत.

अशा रीतीनें अनेक देश जिंकून अगर तेथें वसाहती स्थापन करून इंग्लंड देशाला अनंत फायदे झाले आहेत. त्याला आपल्या देशांत वाढणाऱ्या लोकवस्तीचा ओघ बाहेर वळवितां आला, व्यापाराचें क्षेत्र वाढलें, खालावलेल्या सरदार घराण्यांना ऊर्जित दशा प्राप्त करून देतां आली, देशांतील बदमाष लोकांना देशाबाहेर पाठवितां आल्यानें, देशाचा त्रास चुकून त्यांच्यामार्फत उलट वसाहती स्थापन करतां आल्या, देशांतील लोकांना नशिबाची परीक्षा पाहण्यास विस्तीर्ण क्षेत्र सांपडलें, धर्मच्छलानें त्रास झालेल्या लोकांना शांततेनें आयुष्य घालविण्यास स्थान मिळालें, अपार खनिज संपत्तीचीं भांडारें हातीं लागलीं, व देशाचें वैभव व दर्जा वाढून लोकांच्या कर्तृत्वशक्तीस भरपूर अवसर मिळाला.

सर्व युरोपियन राष्ट्रांच्या मनांत वसाहतींबरोबरच राज्यविस्तार ही प्रबळ भावना होती, व ती इंग्लंडच्या मनांतही होती याबद्दल शंका नाहीं. पण त्यापेक्षां स्वतःचें **स्वातंत्र्यरक्षण** ही जास्त प्रबळ भावना होती असें म्हणतां येईल. या वसाहती स्थापून राज्यविस्तार करण्याचें काम इंग्लंडनें केलें नसतें, तर तें कोणत्याहि दुसऱ्या युरोपियन राष्ट्रानें केलेंच असतें! त्यामुळें त्यांचें सर्वांगीण सामर्थ्य वाढून तीं राष्ट्रें इंग्लंडला डोईजड होऊन बसलीं असतीं व त्यामुळें नेपोलियनसारख्या एखाद्या महत्वाकांक्षी पुरुषानें इंग्लंडसारखें चिमुकलें पण स्वातंत्र्यप्रिय राष्ट्र तेव्हांच चिरडून टाकलें असतें. तेव्हां वसाहती स्थापन करण्यांत इंग्लडचा पैसा व व्यापार साधणें हाच केवळ मुख्य हेतु नसून, स्वतःचें स्वातंत्र्यरक्षण हाच प्रमुख हेतु होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे. वसाहती वाढल्याबरोबर भाषेचा फैलाव झाला; व एका भाषेनें व एकाच

रक्तमांसानें निगडित झालेल्या इंग्लिश वसाहती, मायदेशास चिकटून राहाण्यास स्वार्थानें कां होईना, तयार झाल्या.

वसाहती स्वतःच्या पायावर उभ्या राहूं लागल्या, म्हणजे पक्व फळाप्रमाणें मूळ देशापासून गळून पडतील अशा प्रकारची कल्पना जरी अमेरिकेच्या बाबतींत खरी ठरली, तरी त्यावेळेपासून इंग्लंडच्या बदललेल्या दृष्टिकोनानें आतां तशी भीति उरली नाहीं, हें नुकत्याच झालेल्या युरोपियन महायुद्धानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहेच.

सारांश, वसाहती स्थापन होण्यास खालीं दिलेलीं मुख्य कारणें आहेत.

(१) युरोपियन राष्ट्रांशीं स्पर्धा व शोध.

(२) मसाल्याचे पदार्थ मिळविण्याची अत्यंत जरुरी.

(३) कच्च्या मालाची जरुरी.

(४) गुलामांचा व्यापार व त्यांची मदत.

(५) सोनें, चांदी वगैरे खनिज संपत्तीची आशा.

(६) कैद्यांस बाहेर पाठविण्यास जागा.

(७) खालावलेल्या सरदारांस श्रीमंत करण्याचें साधन.

(८) धर्मच्छल.

(९) आरमारी ठिकाणें—साम्राज्य रक्षणार्थ.

(१०) स्वातंत्र्यरक्षणासाठीं विस्तार.

परिशिष्ट–ब.—प्रांतिक कौन्सिलांतील प्रतिनिधींची संख्या.

वर्गीकरण	मुंबई	मद्रास	बंगाल	सं. प्रांत अ. आग्रा	पंजाब	बिहार ओरिसा	मध्यप्रांत	आसाम	वरिष्ठ कौंसिल: कौंसिल ऑफ स्टेट	वरिष्ठ कौंसिल: असेंब्ली
	१११	११८	१२५	११८	८३	९८	७९	५३	६०	१४४
लोकनियुक्त	८६	...	...	...	...	...	...	...	३३	१०३
सरकारनियुक्त	२५	...	...	...	...	...	...	...	२७	४१
	प्रांतिक–कौन्सिलांत प्रतिनिधी पाठविणाऱ्या मतदारांची संख्या								एकूण मतदार	
मतदारांची संख्या.	५४८४१९	१२५८१५६	१०२१४१८	१३४७२७८	५०५३६१	३२७५६४	१४४७३७	२०३१९१	५३५६१२४	

राज्ययंत्र.

- बादशहा
  - (हाउस ऑफ लॉर्ड्स्) सरदार मंडळ ७२८
  - लोकसभा (हाउस ऑफ कॉमन्स अथवा पार्लमेंट) ६१५
    - कॅबिनेट २० सुमारें
      - भारत मंत्री
        - इंडिया कौंसिल १२
          - गव्हर्नर जनरल (वरिष्ठ सरकार) (व्हाइसराय)
            - नरेंद्रमंडळ (खास संस्थानिकांकरितां)
            - कार्यकारी मंडळ ६
            - कौंसिल ऑफ स्टेट ६० (३३+२७) लो. स.
            - असेंब्ली १४४ (१०३+४१) लो. स.
            - प्रांतिक सरकार (गव्हर्नर)
              - कार्यकारी मंडळ (मुंबई)
                - सरकारी ४
                - दिवाण ३ लोकप्रतिनिधींमधून
              - कायदेमंडळ (मुंबई) १११ (८६+२५) लो. स.
              - कलेक्टर (जिल्हा)
                - मामलेदार (तालुका)
                  - पाटील
                  - कुलकर्णी अगर तलाठी (खेडेगांव)
      - वसाहत मंत्री
        - सर्व वसाहती